नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

२७५३

१.२.३.४.

वर्ष १३ वे - अंक १ला जानेवारी १९४०
" " २रा एप्रिल - १९४०
" " ३रा जुलै - १९४०
" " ४था ऑक्टोबर १९४०

अनुक्रमणिका

महाराष्ट्र-साहित्य-परिषद्

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका

[त्रैमासिक]

५३

संपादक—के. नारायण काळे
बी.अे., अेल्‌अेल्.बी.

पौष १८६१

वर्ष १३ वें] जानेवारी १९४० [अंक १

अनुक्रमणिका

महाराष्ट्र-साहित्य-परिषद्

अध्यक्ष

श्री. नरसिंह चिंतामण केळकर, बी.अे., अेल्अेल्.बी.

उपाध्यक्ष

प्रो. दत्तो वामन पोतदार, बी. अे.
श्री. पांडुरंग वामन काणे, अेम्.अे., अेल्अेल्.अेम्.
श्री. नारायण गोविंद चापेकर, बी.अे., अेल्अेल्.बी.
श्रीमंत माधवराव विनायक किबे, अेम्.अे.
प्रो. नारायण सीताराम फडके, अेम्.अे.

निधिधारक

रा. ब. दामोदर गणेश पाध्ये, अेम्.अे., जे.पी.
डॉ. नीळकंठ भालचंद्र भाटवडेकर, बी.अे., अेम्.बी.बी.अेस्.

कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष

प्रो. वामन मल्हार जोशी, अेम्.अे.

खजिनदार

प्रि. धनंजय रामचंद्र गाडगीळ, अेम्.अे., अेम्.लिट्.

संपादक

श्री. केशव नारायण काळे, बी.अे., अेल्अेल्.बी.

चिटणीस

डॉ. अमृत नारायण भालेराव, अेल्.सी.पी.अेस्.
रा. सा. रघुवेल लुकस जोशी

सभासद

श्री. कृष्णाजी गणेश लिमये, अेम्.अे., अेल्अेल्.बी.
श्री. विठ्ठल दत्तात्रेय घाटे, अेम्.अे., बी.टी., टी.डी.
श्री. दिनकर विनायक काळे, अेम् अे.
प्रो. रामचंद्र श्रीपाद जोग, अेम्.अे.
प्रो. विष्णु भिकाजी कोलते, अेम्. अे., अेल्अेल्.बी.
श्री. यशवंत रामकृष्ण दाते, बी अे., अेल्अेल्.बी.
श्री. वासुदेव दामोदर गोखले, अेम्.अे., बी.टी.

सभासदांस विनंती

नवीन वर्षास आरंभ झाला आहे. घटनेंतील नियमाप्रमाणे वर्गणी आगाऊ भरावी लागते तिकडे सभासदांनी लक्ष्य देण्याची कृपा करावी. ज्या सभासदांकडे थकबाकी आहे त्यांनी विलंब न करितां आपली सारी वर्गणी पाठवून कार्यालयास साहाय्य करावें अशी आग्रहपूर्वक विनंती आहे.

चिटणीस

म. सा. परिषद्

अनुक्रमणिका

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका

वर्ष १३ वें] अनुक्रमणिका [अंक १ ला

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका

अस्थिदेह

[रुग्णालयामध्ये मांडून ठेवलेला हाडांचा सांपळा पाहून]

येथ अुभा कोणाचा अस्थिदेह हा !
कोणाचा भग्नजीवनावशेष हा !

अन्ति जयां लाभतसे चन्दनी चिता
त्यांचे का अस्थिदेह येति मिळवितां !
स्निग्धजनीं जो फुलांत जीव राखिला
हातीं का कोणा तद्देह लागला !
यत्नखाग्रही न परें पाहिलें कुणीं
प्राणान्तीं येत काय तो प्रदर्शनीं !

लाभला न कोणी ज्या आपुला असा,
अुरला नच कोणीही ज्यास वारसा,
कष्टुनही अनशन ज्या जीवनीं सदा
अस्थि हीच झाली यद्देहसंपदा
निर्धनता हीच जात गोत नी कुळी,
आकाशें केली ज्यावरति साअुली,
त्याचा हा येथ अुभा अस्थिपंजर
ज्ञानदान करण्यास्तव जीवनोत्तर !
प्राणान्तीं आज सुखें येति चालुनी
काचेचें गेह दक्ष नित्य रक्षणीं !

अुदर रितें होतें हें जवळ जोंवरी
केलें नच कोणीही जवळ तोंवरी !
पोटाची देणार न करुन जाण ती
जगताच्या प्रेमा नच तोंवरी तुटी !
वणवणला अन्नास्तव दशदिशांवरी
जाळियला देह क्षुद्दाहकान्तरीं
अुरलें नच देहीं मग अुदर तें कुठें
लाभतसे म्हणुन थोर आसरा इथें !

देहाचें ज्ञान करून घ्यावयाप्रती
आयुर्विद्यार्थिवृन्द जमत भोंवतीं
अेक अेक बघती हे अस्थि निरखुनी
वळविला न नेत्रहि ज्यावर जितेपणीं
रोगांचें शतसहस्र ज्ञान मिळवुनी
भिषगभिज्ञ झटतिल हे जीवरक्षणीं
रोग रित्या अुदराचा का कधी परी
त्यां कळेल, अस्थिमात्र देह जो करी !

जगतिं असे जीव क्षुद्रोगजर्जर
तत्प्रतीक येथ खडे हें खरोखर !

— वसंत वैद्य

कै. डॉ. माधवराव पटवर्धन, अेम्. अे., डी. लिट्.

पुत्रांश्च कीर्तिं च वधूं च मित्रान् त्यक्त्वा प्रविष्टोसि चितां सुविद्य ।
शोचाम्यहं त्वत्सुगुणप्रकर्षान् प्रसादपांडित्यसुशीलयुक्तान् ॥

मराठी स्वराज्यस्थापनेच्या वेळीं गुजरातेंतील सुरतेने शिवाजीमहाराजांना लूट देअून मदत केली, त्याप्रमाणे गुजरातेंतील बडोद्याच्या मराठी संस्थानाने मराठी भाषेला माधवराव पटवर्धनांची देणगी दिलेली फार मोठी आहे. अवघ्या पंचेचाळीस वर्षांच्या अल्प अमदानींत माधवरावांनी अेक जाडा विद्वान्, अभ्यासू कोशकार, भावनाप्रधान कवि, सचा मित्र, व थोर सद्‌गृहस्थ अित्यादि अनेक नात्यांनी चमकून आपलें नांव चिरंजीव केलें.

माधवरावांच्या व माझ्या वयांत अंतर पंचवीस वर्षांचें; परंतु "तेजसां न हि वयः समीक्ष्यते" ह्या न्यायाने व त्यांच्या मोकळया स्वभावामुळे, त्यांचा माझा ओळखीच्या पलीकडे संबंध जडला. विद्वान्, स्वाभिमानी, स्वतःच्या कुवतीची जाणीव असलेला, पण तितकाच निगर्वी, असा माधवरावांसारखा साहित्यिक तरुण पिढींत माझ्या माहितीचा नाही.

वयाच्या अैन पंचविशींतील परीक्षेकरता अभ्यासलेल्या फारशी भाषेचा त्यांचा अट्टहास थोडा फाजील असला तरी स्वाभाविक होता; आणि कारणान्तराने पुढे तो जरी लुप्त झाला, तरी फारशी-मराठी शब्दकोश, अथवा अुमरखय्यामच्या रुबायतांसारखी सर्वश्रेष्ठ वाङ्मयकृति, त्यामुळेच त्यांच्या हातून निर्माण झाली. माधवरावांचा स्वभाव भावनाप्रधान तितकाच चिकित्सक व शान्त असल्यामुळे, कोणतीहि गोष्ट त्यांना अेकदा पटली, की आपलें पूर्वीचें मत बदलण्यास ते बिलकूल माघार घेत नसत. त्यामुळेच परशिअन भाषेचे पोवाडे गाणारे माधवराव, कट्टे मराठीभाषाभिमानी झाले. परकी शब्दांच्या धुडगुसाने मराठी भाषेचा संकोच होत आहे, अशी त्यांस यथार्थ भीति वाटत होती. परकी शब्दांचा स्वीकार भाषेला समृद्ध करण्यासाठी करावा, परंतु मारण्याकरिता करूं नये, अेवढाच त्यांचा हेतु होता. सावरकरापेक्षाहि ह्या कामीं माधवरावांना अधिक यश आलें, ह्याचें कारण स्वभाषेचा अभिमान हें होय; परकी भाषेचा द्वेष हें नव्हे. औंध येथे भाषाशुद्धीवर त्यांचें अेकदा भाषण झालें. ह्या व्याख्यानांत खुद्द श्रीमंतांना, त्यांनी आपण अिंग्रजीअैवजी मराठी सही करण्यास काय हरकत आहे म्हणून सुचविलें, व श्रीमंतांनीहि तें तत्काळ मान्य करून मराठी सह्या करण्यास सुरुवात केली. मराठी भाषा समृद्ध करण्याच्या अुत्कटतेने म्हणा किंवा पराशिअन भाषेच्या आवडीने म्हणा, मराठींत— आणि ती सुद्धा काव्यांत— माधवरावांनी परशिअन शब्दांची पखरण पाडली हें खरें, पण "मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मीय आम्ही असूं," असें अितरांस बजावण्यासहि त्यांनी कमी केलें नाही.

वृत्तीनें माधवराव सोशिक असूनहि स्वतःच्या कर्तृत्वावर पुढे आल्यामुळे त्यांचा स्वभाव साहजिकच स्वाभिमानी बनला होता. त्यामुळे डेक्कन अेज्युकेशन सोसायटीमधील सुखाची नोकरी, केवळ मतभेदासाठी सोडून त्यांनी भावे स्कूल, अंमळनेर शाळा वगैरेंसारख्या शाळांतील

अनुक्रमणिका

पायपिट्या पत्करल्या; पण दीनपणा धारण केला नाही. दुसऱ्यांच्या कामांत ते स्वतः कधी लुडबूड करीत नसत. त्याचप्रमाणे दुसऱ्यानेहि आपल्या कामांत विनाकारण लुडबूड केलेली त्यांना आवडत नसे.

माधवराव म. सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळांत होते. परंतु कोल्हापुराहून येअून दर सभेला हजर राहणें त्यांच्या अवाक्याच्या बाहेर असल्याने, त्यांच्या सल्ल्याचा अप्रत्यक्षपणेंच अुपयोग होत असे. ते वर्षभर 'साहित्य-पत्रिके'चे संपादकहि होते. ह्या वेळींहि संपादकाचें मुख्य काम जरी ते स्वतः पाहात, तरी किरकोळ बाबी त्यांनी रा. चिंतोपंत कऱ्यांवर सोपविल्या होत्या. ह्या वेळची अेक गोष्ट सांगण्यासारखी आहे. माधवरावांचा अ आ च्या बाराखडीचा अभिनिवेश प्रखर असूनहि, ती बाराखडी परिषदेने मान्य केली नसल्यामुळे, 'पत्रिके'त ती घुसडण्याचा अुपद्याप त्यांनी केव्हाहि केला नाही. अभिमानाला बळी पडून संस्थेच्या नियमांचें अुलंघन करण्याची वृत्ति त्यांच्या मनाला शिवली नाही. ह्यांत माधवरावांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य दिसून येतें.

माधवरावांचें चरित्र अत्यंत अुज्ज्वल व आचरण अतिशय शुद्ध असल्यामुळे, त्यांनी कोणत्याहि लोकापवादाची क्षिति बाळगली नाही. ते भावनाप्रधान कवि होते, त्यामुळे 'विरहतरंगा'-सारखीं काव्यें त्यांनी साहजिकच लिहिलीं. पण हाडाने ते सनातनीच होते. त्यामुळे नवीनांचें औत्सुक्य दाखवितांना त्यांनी जुन्याचा तोल सोडला नाही. तरुण पिढीच्या अिच्छा-आकांक्षा व्यक्त केल्या, पण जुन्याला हिणकस लेखलें नाही. बडोद्याच्या साहित्य-संमेलनांत पावित्र्यविडंबनाचा ठराव चर्चेला आला, तेव्हा रा. माधवरावांनी अतिशय समतोलपणाचें भाषण करून कोणत्याहि गोष्टींतील सुवर्णमध्य गांठण्याची आपली वृत्ति सर्वांच्या परिचयास आणून दिली. जो हिशेबीपणा व जी व्यवहारदक्षता त्यांनी वाङ्मयांत सोडली नाही, त्या चोख हिशेबीपणाचें व व्यवहारदक्षतेचें पालन रोजच्या व्यवहारांत त्यांनी अत्यंत काटेखोरपणाने केलें. अेका पैचेहि ते कोणाचे लिंपाळे नसत. कवि किंवा वाङ्मयसेवक हे व्यवहारशून्य असतात, अशा सामान्य समजुतीला ते अेक अपवाद होते.

'छंदोरचना' ग्रंथाने माधवरावांची विद्वत्ता, स्वतंत्र बुद्धि, संशोधनवृत्ति व परिश्रमशीलता अित्यादि गुण लोकांच्या प्रत्ययास आणले. तथापि ह्याहिपेक्षा त्यांचा दुसरा अेक अलौकिक गुण प्रकट झाला. तो म्हणजे निर्विकारिता हा होय. खुपरेकरशास्त्र्यांनी 'छंदोरचने'वर थोडीशी बोचक टीका केली; तिला माधवरावांनी जें अुत्तर दिलें आहे, तें अितकें निर्विकार मनाने, की, मला वाटतें, अशा तऱ्हेचें स्वपक्षसमर्थन क्वचितच वाचावयास सांपडेल.

माधवरावांच्या निधनामुळे मराठी साहित्याची फारच मोठी हानि झाली आहे. मृतात्म्यांचा शिष्टाचारपूर्वक गौरव करण्याचाच केवळ ह्या लेखाचा हेतु नसून "चरित्र त्यांचें शिका जरा" हें तरुण साहित्यिकांना सांगण्याचा आहे.

ना. गो. चापेकर

कै. डॉ. मा. त्रिं. पटवर्धन, अेम्. अे., डी. लिट्.,

(अश्रु-मुक्ता-माला)

"प्रत्येक प्रतिभाशाली व्यक्ति ही स्वतःचें विशिष्ट तत्त्वज्ञान निर्माण करीत असते. हें तत्त्वज्ञान त्या व्यक्तीच्या भोंवतालची परिस्थिति, त्या परिस्थितींतून यशःसिद्धीचा मार्ग काढण्यासाठी तिला करावी लागणारी धडपड आणि या साऱ्या संघर्षाचें त्या व्यक्तीच्या मनावर होणारे संस्कार यांतून आविर्भूत होत असतें. हें तत्त्वज्ञान ज्या प्रमाणांत व्यापक आणि सकस असेल त्या प्रमाणांत ती व्यक्ति आपल्या समाजाच्या विचारांवर परिणाम करूं शकते. या दृष्टीने पाहिलें तर डॉ. माधवराव पटवर्धन यांची गणना पहिल्या प्रतीच्या साहित्यिकांत करावी लागेल. त्यांचें सारें आयुष्य अन्याय आणि विषमता यांच्याशीं झगडण्यांत गेलें; व त्यांच्या वाङ्मयांत या संघर्षाची सारी तीव्रता, प्रखरता आणि कटुता भरलेली आहे."[1]

"डॉ. पटवर्धनांची साहित्यसेवा द्विविध आहे. 'माधव-ज्यूलियन्' आणि डॉ. पटवर्धन या दोन सर्वस्वीं भिन्न अशा व्यक्ति अेकाच शरीरांत वास करीत होत्या. 'माधव-ज्यूलियन्' ही व्यक्ति काव्यात्म होती आणि डॉ. पटवर्धन ही व्यक्ति बुद्धिवैभवशाली होती. अन्तःकरण आणि मन, भावना आणि बुद्धि, विकार आणि विचार यांचा अभूतपूर्व संगम माधवरावांच्या प्रतिभेंत झालेला होता. 'माधव ज्यूलियन्'च्या काव्यात्म अन्तःकरणांत भावना आणि विकार प्रबल होते, तर डॉ. पटवर्धनाच्या मनांत विचारवैभव अुदंड होतें. सकृद्दर्शनीं परस्परविरोधी दिसणाऱ्या वैकारिक आणि वैचारिक वृत्तींचा परिपाक 'माधव-ज्यूलियन्'च्या कवितेंत आणि डॉ. पटवर्धनांच्या संशोधक प्रबंधांत दिसून येतो."[2]

"काव्यक्षेत्रांतील अशी अेकहि बाजू नाही, की त्यांत माधवरावांची गति अप्रतिहतपणें चालली नाही. भावना, भाषा, विचार, अलंकार, छंद अशा सर्व बाजूंनी मराठी काव्यांत त्यांची कामगिरी महनीय आहे. व या सर्व बाबतींतहि त्यांची प्रगति व त्यांचा विकास समप्रमाण झालेला आपणांस दिसून येतो. भावनेंत पाहावें तर मुळांत प्रेमासाठी तहानलेली असंतुष्ट अशी त्यांची काव्यकल्पना, मध्यंतरीं नाना तऱ्हांचे बहुरंगी प्रेम-प्रसंग अनुभवून, शेवटीं प्रशान्त व संतुष्ट अशा प्रेमांत व वात्सल्यांत विहार करीत आहे. भाषेंत पाहावें तर आपल्या रूपाचें आविष्करण करण्यासाठी खटपटीने व क्वचित् बेडौल शब्द हुडकणारी त्यांची शारदा, फारशी, अिंग्रजी वगैरे नाना देशचीं वस्त्रें पांघरून, शेवटीं पूर्ण मराठी, डौलदार पण सहज व अकृत्रिम अशा वेषांत सफाअीने वावरत असलेली आपल्यास दिसते. छंदांकडे पाहिलें, तर साध्या जातिवृत्तांपासून प्रारंभ करून अवघड, चमत्कृतिजन्य व दुर्लभ चाली गाअून, आता त्यांची काव्य-

[1] श्री. ग. त्र्यं. माडखोलकर (पूर्णिमा). [2] अरुण - (आशा).

अनुक्रमणिका

देवता मराठींतील साध्या व सभ्य अशा मात्रागणवृत्तांत घरच्याप्रमाणे बेगुमान वावरत आहे. व अलंकारांच्या दृष्टीने पाहावें, तर पूर्वी भीत भीत अेखादें शेवंती-मोगऱ्याचें फूल लाजत घालणारी त्यांची काव्यप्रतिभा, मध्यंतरीं सापडेल तें फूलपान– कोरांटी, गुलबक्षी, डेलिया, दवणा, मर्वा डोक्यांत घालून, डोक्याची बाग करून मिरवितां मिरवितां शेवटीं अेखादी सुबक वेणी, अगर अेखादेंच सवर्ण गुलाबपुष्प घालून साध्या डौलाने वावरत आहे. अशा सर्व तऱ्हेने त्यांची प्रगति सप्रमाण व समप्रमाण झालेली आपणांस दिसते. व या प्रगतीमागे जितकी स्फूर्ति त्याहूनहि जास्त प्रयत्न होता– की ज्या साहसी व बेदरकार प्रयत्नाच्या योगानेच ते आज अितक्या लवकर आपणांतून निघून गेले.''[3]

''ही माधवरांवाची काव्यक्षेत्रांतील कामगिरी झाली. परंतु त्याहिपेक्षा अधिक महत्त्वाची त्यांची कामगिरी संशोधनक्षेत्रांतील आहे. ह्या क्षेत्रांत काम करण्याची हौस त्यांना कशी अुत्पन्न झाली, हें सांगणें कठीण आहे. व्यवसायानिमित्त झालेल्या पुण्याच्या वास्तवाने कदाचित् ही स्फूर्ति त्यांना झाली असावी. राजवाडे, केतकर अित्यादि संशोधकांचा अुद्योग त्यांच्यासमोर चाललेला त्यांना दिसला असेल. परंतु संशोधन-शास्त्राचे प्रत्यक्ष धडे कोणापासून न घेतां, त्यांनी आपण होअूनच हें शास्त्र आत्मसात् केलें. संशोधनक्षेत्रांत तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. अेक साधनें गोळा करणें ही, दुसरी गोष्ट त्या साधनांच्या आधारावर तर्कशुद्ध अशीं अनुमानें बांधणें ही, आणि तिसरी गोष्ट साधनें मिळेनाशीं झाल्यानंतर केवळ आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर सिद्धप्राय सिद्धान्त मांडून दाखविणें ही. अशा या तीन गोष्टी मुख्य आहेत. साधनें गोळा करणें हें मोठ्या प्रयासाचें, चिकाटीचें काम आहे; ह्याला अखंड व विस्तृत वाचन, चौफेर आणि चौरस अशी दृष्टि असावी लागते. बौद्धिक सचोटी असावी लागते. छंदोरचना व फार्शी-मराठी कोश या ग्रंथांकडे पाहिलें असतां साधनें गोळा करण्यासाठी केलेल्या श्रमांची कल्पना येते. साधनांवरून योग्य तीं अनुमानें काढतां येण्यासाठी त्या सर्व साधनांचें योग्य वर्गीकरण करावें लागतें; तसें जर तें झालें नाही, तर तीं अनुमानांना बाधा करतात. फारशी-मराठी कोशांत दिलेलीं अवतरणें शोधून काढतांना त्यांना सर्व अुपलब्ध अैतिहासिक पत्रसंभार वाचावा लागला असेल. ह्या अवतरणांमुळेच तो कोश जरी अपुरा वाटत असला तरी मनोरंजक वाटतो. छंदोरचनेंत तर साधनें गोळा करण्याची परमावधि केली आहे. साधनें अितकीं गोळा झालीं की त्यांचें वर्गीकरण करणें त्यांच्या आवाक्याबाहेरचें झाल्याचें क्वचित् ठिकाणीं दिसतें व म्हणूनच की काय पारंपरिक वर्गीकरण सोडून त्यासंबंधी आपलें स्वतःचें 'तंत्र' त्यांना निर्माण करावें लागलें. हळूहळू त्याला विद्वन्मान्यता मिळेल अशी खात्री आहे.

''वर जीं संशोधनशास्त्राचीं तीन तत्त्वें सांगितलीं, तीं तिन्ही मर्यादित स्वरूपांत कां होअीना माधवरावांच्या वरील दोन्ही ग्रंथांत दिसून येतात. हीं तिन्ही तत्त्वें आत्मसात् केल्याचीं अुदाहरणें अितर संशोधकांत क्वचितच आढळतात. डॉ. भांडारकर हे अेकटेच संशोधक असे होते की त्यांना ह्या तिन्हीं गोष्टी पूर्ण अवगत होत्या. राजवाड्यांना पहिली आणि तिसरी ह्या दोनच गोष्टी अवगत होत्या. डॉ. केतकरांना तिसरीच गोष्ट अवगत होती. दत्तोपंत आपट्यांना मधली दुसरी गोष्टच पूर्ण अवगत आहे. राजारामशास्त्री भागवत पहिली आणि तिसरी जाणतात.

३ प्रो. द. ल. गोखले – (सह्याद्रि).

भाण्डारकरांनीच फक्त तिन्ही आत्मसात् केल्या होत्या. माधवरावांचें संशोधन वर अुल्लेखिलेल्या संशोधकांच्या मानाने मर्यादित असलें, तरी त्यांत तिन्ही गोष्टींचा पडताळा येतो."[४]

"माधवरावांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व मनमिळाअू होता. 'शत्रूपेक्षां मित्राची मिळकत व्हावी व तीच संपदा समजावी' असें माधवराव नेहमी म्हणत. ते दिसण्यांत तरतरीत व वागण्यांत आकर्षक वाटत. शरीराने साधारण स्थूल व राहणींत साधारण अैटबाज; मनाने व वागण्यांत साधारण बेडर; बुद्धीचे कुशाग्र आणि चित्ताचे सावध; अंतःकरणाचे कृपाळू आणि वादविवादांत हट्टी; ध्येयाने पिंजऱ्यांतले पक्षी आणि अुत्सवांत हौशी; मतांनी नव्याकडे झुकलेले आणि अभिप्रायांत कित्येकदा तऱ्हेवाअीक. विविध अनुभवांची विश्लेषणात्मक मौज अनुभवणारे आणि अेखाद्यांत कांही विशेष असेल, तर त्याला बरोबरीने वागविण्याचा प्रयत्न करणारे, अशा तऱ्हेचे अनेक गुण माधवरावांच्या अंगीं आत्मसात् झालेले होते."[५]

"माधवराव केवळ होतकरू तरुण कवींशींच नव्हे तर नाना प्रकारच्या, नाना दर्जाच्या व वृत्तींच्या माणसांशीं समरस होअून जात. बोर्डीला सहज हवा खाण्यास ते चवतीस सालीं आमच्याकडे आले, तर त्या वेळीं तेथे जो रिफ्रेशर कोर्स चालू होता, त्यासाठी आलेल्या तीनशें शिक्षकांमध्ये ते गुंगून गेले. चार दिवस ते त्यांच्यांतच अुठत बसत होते, आणि मनोभावाने शिक्षणशास्त्र व शिक्षणकला यांविषयी चर्चा करीत होते. तितक्याच मनोभावाने गरीब, अडाणी शेतकरी किंवा अर्धपोटीं राबणारी मोलकरीण यांच्याशीं त्यांना समरस होतां आलें. आमच्या पुण्याच्या घरीं खाली अेका खोलींत भागू नांवाची गरीब बाअी पुण्यास दुष्काळांत पोट भरण्यास आली होती. ती पहाटेस अुठून दळण दळीत असे व जात्यावरचीं नाना प्रकारचीं गाणीं गोड आवाजाने म्हणत असे. माधवराव हीं गाणीं लक्षपूर्वक अैकत. 'छन्दोरचने'मध्ये माधवरावांनी तिच्या ओव्या तिच्या नांवावर अुद्धृत करून अडाणी भागूला मराठी वाङ्मयांत अमर केलें आहे."[६]

"आपल्या मुलाची मुंज केली नाही, याबद्दल प्रो. वासुदेवराव पटवर्धनांचें माधवरावांनी कौतुक केलें; पण स्वतःच्या मुलाची मुंज करण्याचें त्यांनी ठरविलें. हा फरक होण्याच्या मागे त्यांचा कोणता अभिमान होता, त्याची सांगोपांग चर्चा करण्याची ही वेळ नाही. ही भद्रंभद्री होती असें म्हणण्यापेक्षा, रवींद्रनाथ ठाकूर यांच्या गोरा (गौर मोहन) या कादंबरींतील गोराची आत्यंतिक अभिमानी वृत्ति होती. त्यांच्या कांही जिव्हाळ्याच्या मित्रांनासुद्धा या फरकाचें रहस्य अुलगडलें नाही. 'माधवराव कांही दिवसांनी गंधटिळा लावून, बाराबंदी घालून, पुणेरी जोडा पायांत फरफटत हिंडतील' या थट्टेच्या अुद्गारांचें माधवरावांनी 'शक्य आहे' असें समर्थन केलें. 'Life is a change' हें तत्त्व त्यांच्या रोमरोमीं बाणलें होतें. पण ह्या फरकामागे अनेक सिद्धान्तांचीं, पुराव्याचीं पथकें अुभीं होतीं. राजारामशास्त्री भागवतांच्या मागून मुलीची मुंज करणारे आपण होणार अशीहि त्यांची प्रबळ अिच्छा होती. त्यांच्या पुरोगामी विचारांमुळे अेका काळीं पुण्यांत त्यांना कोणी जवळ करीत नव्हतें. अपमतलबी धूर्तांनी त्यांच्या भोंवतीं असेंच विकट वातावरण केलें होतें की, साधा लेचापेचा माणूस केव्हाच लंबे झाला असता."[७]

---

४ प्रो. कृ. पां. कुलकर्णी (विविधवृत्त). ५ (ध्रुव). ६ सौ. वत्सलाबाअी घाटे (सह्याद्रि).
७ प्रो. श्री. बा. रानडे (सह्याद्रि).

कै. डॉ. मा. त्रिं. पटवर्धन (अश्रु-मुक्ता-माला)

"दुसरा अेखादा दुबळ्या मनाचा असता तर त्याला वेड लागलें असतें; पण माधवराव खंबीर मनाचे होते. त्या दिव्यांतूनहि ते पार पडले. मात्र या दिव्यांत माधवरावांचें हृदय भाजून निघालें. त्यांना जगाचा कांही वेगळाच अनुभव आला. ज्या स्त्रीजातीस आपल्या प्रतिभाबलाने त्यांनी अुंच कल्पनारम्य अशा भूमिकेवर बसवून, तिची मनोभावाने पूजा केली होती, त्या स्त्री-जातीचे त्यांना अनेक वाअीट अनुभव आले. आधुनिक सुशिक्षित स्त्रीला प्रेमापेक्षां मान, प्रतिष्ठा व पैका अधिक आवडतो, असें त्यांना दिसून आलें. माधवराव स्त्रीद्वेष्टे बनले नाहीत; परंतु स्त्रियांपासून चार पावलें दूर मात्र राहूं लागले. सुधारकांचा त्यांना अशाच प्रकारचा अनुभव आला. या लोकांत पांचसात वर्षें ते प्रत्यहीं अुठत बसत. त्यांच्याविषयी त्यांना आदर असे. आगरकरांवर त्यांची निस्सीम भक्ति होती व वासुदेवराव पटवर्धन या त्यांच्या ज्येष्ठ सहकाऱ्याच्या करारी व सडेतोड पण निर्व्याज वृत्तीबद्दल, त्यांना अभिमान वाटत असे. पण प्रसंग आल्यावर त्यांना आढळून आलें की, आगरकर-वासुदेवरावांसारखीं माणसें विरळा. सामान्यतः सुधारक वर्गाचें जीवन कोतें, अुथळ व दांभिक पण दिखाअू अशा प्रकारचें त्यांच्या प्रत्ययास आलें.

"या २३-२५ सालांतल्या अनेकविध अनुभवांमुळें- छळामुळे नाही- माधवरावांच्या आयुष्यास २६ सालापासून वेगळें वळण लागलें. माधवराव झुंजार होते. प्रतिपक्षाचे वार छातीवर घेण्यांत, व अुलट त्यांच्यावर प्रहार करण्यांत, माधवरावांना क्लेश वाटले नाहीत. शत्रूंच्या वारांपेक्षा मित्रांचा भित्रेपणा, कोतेपणा, अवसानघातकीपणा व विश्वासघात त्यांना अधिक जाणवला. माधवरावांनी यापुढे वेगळें कार्यक्षेत्र निवडून काढलें. प्रेमकाव्य आणि काव्यात्म जीवन, यांकडे झुकणाऱ्या मनोवृत्तींना व आकांक्षाना, त्यांनी आपल्या दुर्दम्य अिच्छाबलाच्या जोरावर पांडित्यक्षेत्राकडे वळविलें."[८]

"माधवराव फार थोर होते. त्यांची खरी योग्यता जाणावयाला त्यांचे अगदी जिव्हाळ्याचे मित्रच फक्त समर्थ आहेत. त्यांची कर्तव्यनिष्ठा व त्यांचा प्रेमळपणा न विसरण्याअितका मोठा होता. त्यांचें दिनू-सुधावर फार प्रेम होतें. शेवटच्या दुखण्यांत या मुलांना पाहिलें, की त्यांचें अंतःकरण गदगदून जात असे. त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या व लाल होत. पण त्यांचा संयम अितका दांडगा होता की, त्यांनी तें कधी कोणास दिसूं दिलें नाहीं. त्यांनी आपलें मन पुरें जिंकलें होतें."[९]

---

८ श्री. विठ्ठलराव घाटे (सह्याद्रि). ९ श्री. लीलाबाअी पटवर्धन (सह्याद्रि)

अनुक्रमणिका

अिंग्रजींतून आलेले कांही नवीन शब्दप्रयोग

(1) To take decision— निर्णय घेणें (!)

(2) To take on the Committee कमिटीवर घेणें (!)

(१) 'कॉंग्रेसमंत्रिमंडळानें... हा निर्णय घेतला,' 'कॉंग्रेस वर्किंग कमिटी काय निर्णय घेते अिकडे सर्वांचे डोळे लागले आहेत' अशा तऱ्हेचे वाक्यप्रयोग अलीकडे वृत्तपत्रांतून व पुष्कळांच्या बोलण्यांतून अैकूं येत आहेत. 'निर्णय घेतला' हें अिंग्रजीचें शब्दशः भाषान्तर युक्त आहे काय ! 'निर्णय केला' असेंच लिहिलें पाहिजे व बोललें पाहिजे. वृत्तपत्रांतून घाअी-घाअीनें अिंग्रजी वळणाची भाषा केव्हा केव्हा येते व तिचे प्रतिध्वनि लोकांच्या बोलण्यांतच अैकूं येतात. मराठी संप्रदायांत ही भर नसून हा शुद्ध अत्याचार होय.

(२) 'अहो, अमक्या अमक्याला कमिटीवर घेतला' हा दुसरा भाषाप्रयोग वरील-प्रमाणेच मराठीच्या प्रकृतीला मानवणारा नाही. पण तिच्यावर तो लादला जात आहे. 'समितींत घेतला आहे' असें म्हणणें योग्य होणार नाही काय ! 'गोम्या खोलीवर गेला आहे' असें कॉलेज-विद्यार्थी बोलतांना अैकूं येतात त्यांतलाच हा प्रकार.

(3) To go on strike— संपावर जाणें (!)

(4) To take back the strike— संप परत घेणें (?)

(३) संपाची कल्पना जशी नवीन तशी त्यासंबंधी नवीन शब्दयोजना प्रचारांत येअूं पाहात आहे. 'अमक्या कारखान्यांतले लोक संपावर गेले आहेत' असें वृत्तपत्रांतील शब्दशः अिंग्रजीचें भाषान्तर लांबलचक होतें अेवढेंच नव्हे तर तें मराठीला अगदी सोडून होत आहे. '...संप केला' हें भाषान्तर मराठीला धरून नाही का होणार ? (४) तसेंच 'संप थांबविला' अेवढ्यानें काम भागण्यासारखें नाही काय ?

नीळकंठ शंकर नवरे

अनुक्रमणिका

श्री. शेजवलकर म्हणतात*—

"...आजच्या घटकेस महाराष्ट्रांत अनेक—बहुतेक विषयांत नामांकित म्हणण्यासारखे पंडित कोणी नाहीत. पदव्यांचा सुळसुळाट आणि मूलग्राही ज्ञानाचा सुकसुकाट अशी याबाबत विद्यमान स्थिति आहे. तोंडदेखलें बोलतांना सभेंत परस्पर अेकमेकांची विद्वान् म्हणून स्तुति करतांना आढळतात, तेच खासगी संभाषणांत त्यांच्या विद्वत्तेची टवाळी करतांना दिसून येतात ! यावरून खरा प्रकार निदर्शनास येतो. ही स्थिति प्राप्त होण्याचें कारण सुलभ देशभक्तीचें आणि वावदूक मुत्सद्देगिरीचें महाराष्ट्रांत फुटलेलें पेव. महाराष्ट्राचें राजकारण व समाजकारण शब्दपंडितांच्या, साहित्यिकांच्या व तोंडपाटलांच्या ताब्यांत गेलें त्याचाच हा विपरीत परिणाम होय.

पेशवाअी कोसळल्यानंतर आरंभींचीं पन्नास वर्षें राष्ट्राच्या पुनर्घटनेची दिशा महाराष्ट्रांत योग्य तीच होती. जेत्यांचें ज्ञान आत्मसात् केल्याशिवाय स्वातंत्र्याच्या तात्त्विक भूमिकेवरून त्यांच्याशीं समानतेच्या लंब्याचौड्या बाता करणें व्यवहारदृष्ट्या निरुपयोगीच नव्हे तर समाज-बाधक आहे अशी त्या पिढीची खात्री पटली होती. नुसत्या स्वाभिमानावर अुभारलेलें राजकारण पोकळ आणि बिनबुडाचें असतें हें त्या पिढीला कळून चुकलें होतें. पण त्यानंतर अिंग्रजी शिकलेल्या नूतन पदवीधरांची जी पिढी पुढे आली ती पेशवाअीची भीतिप्रद आठवण विसर-लेली होती. मिल्मेकॉले आणि स्पेन्सरजॉन्सन् यांचे ग्रंथ पढलेल्या या पिढीला अिंग्रजांचें वैशिष्ट्य कशांत आहे या गोष्टीचें विस्मरण झालें. अिंग्लिश विश्वविद्यालयांतून जे ग्रंथ शिकविले जातात तेच येथे पढणारे जे अस्मादिक ते त्या गौरकायांपेक्षा कोणत्याहि बाबतींत कमी प्रतीचे वा कमकुवत नाहीत असें त्यांना वाटूं लागलें. अर्थात् त्यांनी असा आक्रोश सुरू केला कीं, या देशास कांहीअेक झालेलें नाही, त्याची नाडी साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांही अेक विकार नाही, आमच्या परक्या प्रभूंनी आमची तशी खोटीच समजूत करून दिली आहे ! सभा-सम्मेलनें, लेख-व्याख्यानें यांचा हलकल्लोळ अुडवून दिला म्हणजे अिंग्रज पळून जातील असें त्यांच्या बुद्धीला वाटत होतें कीं काय न कळे ! तोफा-विमानें व मोटार-आग-गाड्या राहोत पण साध्या सुया-टांचण्या वा चाकू-चमचे सुद्धा ज्यांना करतां येत नाहीत त्यांनी स्वराज्याच्या बाता झोकणें किती शहाणपणाचें आहे याबद्दलचा त्या पिढीचा अविचार तिची तर्कशून्यता स्पष्ट दाखवितो. ज्या समाजाचें आधुनिक औद्योगीकरण झालेलें नाही त्याला आजच्या जगांत आपलें असलेलें स्वातंत्र्यहि टिकवितां येणार नाही, मग ज्यांचें स्वातंत्र्य आधीच नष्ट झालेलें आहे त्यांनी आधी आर्थिक, औद्योगिक, व सामाजिक पुनर्घटना घडवून आणल्याशिवाय स्वातंत्र्याची वा स्वराज्याची वार्ताच कशाला !

हिंदुस्थानांतील अितर प्रांतांपेक्षा वर सांगितलेल्या पढतमूर्खपणाची बाधा महाराष्ट्राला अधिक झाली. कारण पेशवाअीपासून महाराष्ट्रांत ब्राह्मणांचें जें अवास्तव प्राबल्य झालें होतें तें

* "श्री. शेजवलकर यांचे लेख" या श्री. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांच्या आगामी लेखसंग्रहांतील "शय्येवरून" नामक प्रस्तावनेमधून उद्धृत. "शेजवलकर यांचे लेख" लेखक— त्र्यंबक शंकर शेजवलकर. प्रकाशक— ह. वि. मोटे, मुंबई. किंमत २ रु.

अिंग्रजी राजवटींत प्रथम अिंग्रजी शिकल्यामुळे तसेंच टिकलें होतें. स्वराज्य असतांना औद्योगीकरण व आधुनीकरण करण्याचें योग्य वेळीं न सुचल्यामुळे ज्यांचें राज्य गेलें होतें त्यांना स्वराज्याचें ओझें डोक्यावरून अुतरल्यानंतर तरी तें कसें सुचावें ! ते वडिलांची कीर्ति सांगणारे पढतमूर्खच राहिले होते. लेखनकलेच्या व छापखान्याच्या वाढीचा दुरुपयोग त्यांनी हा पढतमूर्खपणा वाढविण्यांतच केला. काल्पनिक अितिहासाचें बंड महाराष्ट्रांत फार मोठ्या प्रमाणावर फैलावलें. शुद्ध करमणूक व खोटें समाधान येवढाच असल्या लेखनाचा अुद्देश असता तर त्याचा फारसा दुष्परिणाम झाला नसता, पण स्वराज्यनाशामुळे ज्यांच्या शहाणपणाचा व मुत्सद्देगिरीचा भ्रम पार अुतरलेला होता त्यांना पुनः या खोट्या अितिहासाने झपाटलें. ब्राह्मणांच्या खालोखाल या भुताचा झपाटा मराठ्यांस बाधला. कारण वडिलांच्या कीर्तीवर मिशीला पीळ भरण्यांत तेहि मागे नव्हते. महाराष्ट्राप्रमाणे ज्या प्रांतांत ब्राह्मण-क्षत्रियादींचें प्राबल्य नव्हतें त्यांना हें भूत फारसें नडलेलें नाही. परकी अिंग्रजांचें वैशिष्ट्य त्यांच्या धंदे-अुद्योगांत व व्यापार-वसाहतींत आहे, हें वाणियांच्या आगेबुद्धीने ओळखलें म्हणूनच गुजरात पुढे सरसावली. आपल्या प्रभूंच्या अनुकरणाने गुजराथी वनिये प्रथम हिंदुस्थानचे दुय्यम आर्थिक मालक बनले आणि नंतर त्यांनी मराठ्यांच्या 'जन्मजात' राजकारणाकडे दृष्टि वळविली. त्याबरोबर गर्वाने फुगलेल्या पश्चात्बुद्धीच्या महाराष्ट्रीय ब्राह्मणांचें राजकारण पत्त्यांच्या बंगल्यासारखें अेकदम कोलमडून पडलें ! तावत्कालपर्यंत आपल्या तोंडपाटिलकीची व लेखन-बहाद्दुरीची वास्तविक योग्यता किती हें त्यांच्या लक्षांतच अुतरलें नव्हतें ! तरी पण अजूनहि अेखाद्या कादंबरीकाराच्या काल्पनिक वर्णनांतून शनिवारवाड्याचें रसभरित वर्णन अुतरून घेअून 'पेशव्यांचे अिमले' सजवण्याच्या खटाटोपांत येथील 'पुढारी' दंग आहेत आणि त्यांना 'अितिहास-लेखक' म्हणून प्रशस्तिपत्रें वा पारितोषिकें देण्याच्या अुद्योगांत अितर 'पंडित' भूषण मानीत आहेत ! यांपैकी कोणाच्या बुद्धीची तारीफ करावी याचाच तेवढा निर्णय उरला ! शास्त्रीबुवांच्या स्वाभिमानाच्या शिकवणीला हीं असलीं मधुर फळें आलीं !

शाळा-कॉलेजें, मासिकें-वर्तमानपत्रें, चित्रशाळा-किताबखाने असले पोट भरण्याचे अुद्योग सुरू करून पुनः त्यांना देशसेवा म्हणण्याचा जो प्रकार महाराष्ट्रांत रूढ झाला त्याचा दुष्परिणाम महाराष्ट्राला चांगलाच बाधला. प्रिन्सिपॉल गोळ्यांसारख्या देशभक्तीचा माज न चढलेल्या जागरूकाला ब्राह्मणांच्या या विद्येचें व सुलभ देशसेवेचें खरें स्वरूप व त्याचे भावी बाधक परिणाम स्पष्ट दिसले होते. तरीहि महाराष्ट्र त्यांच्या अिशाऱ्याने जागा झाला नाही ! अुलट त्यांच्यावर टीकेचा भडिमार झाला ! आजहि महाराष्ट्राचे प्रो. वा. गो. काळ्यांप्रमाणे जे खरे अभिमानी हितकर्ते आहेत ते गोळ्यांच्याच परंपरेंतील आहेत. पण त्यांना देशभक्त म्हणतांना आजहि कोणी आढळणार नाहीत ! देशभक्ति म्हणजे तोंडपाटिलकी, व्याख्यानबाजी, लेखनकामाठी अशीच समजूत प्रायः या भागांत रूढ आहे. शेतकऱ्याला पिळून फुकटची व्याख्यानबाजी करणारा जमीनदार, कुळांना पिळून हवेल्या बांधणारा सावकार, अशिलांना नाडून दौरा काढणारा वकील, परदेशी माल विकून थोडीशी वर्गणी देणारा दुकानदार, हे सर्वच महाराष्ट्रांत देशभक्त म्हणून अेका काळीं गाजूं शकले. या सर्वांची तळी अुचलून धरून टिमकी वाजविणारे वर्तमानपत्रकार वा लेखक हे स्वयंभू पुढारी बनले. या सुखवस्तु अकार्यकृत् साहित्यिक 'पुढाऱ्यां'च्या हातांत राजकारण गेलें त्याचाच आरंभीं सांगितलेला प्रकार हा दुष्परिणाम होय.

आज महाराष्ट्राचे कान कोणाच्या हातांत आहेत ? कोणाचें कोणत्या विषयांतील कोणत्या तऱ्हेचें लिखाण वाचलें जात आहे ? संपादक कोण आहेत, लेखक कोण आहेत, प्रकाशक कोण

आहेत ! लोकशिक्षणाचे श्री. जांभेकर यांच्या कार्यपद्धतीबद्दल मतभेद असेल पण त्यांचें मुख्य विधान खोटें आहे काय ! महाराष्ट्रांत उच्च लिखाणाची चहा उरलेली नाही हें विधान असत्य म्हणतां येअील काय ! विविधज्ञानविस्तार कां बंद पडला ! प्रगति बंद पडली तर तिचें पुनरुज्जीवन शक्य होत नाही. पण मोतिरामशेट रांगणेकर हे तुतारी, वसुंधरा, चित्रा, आशा, लागोपाठ अनेक मी मी म्हणणाऱ्या मालकांना लाथ देअून चालू करूं शकतात, यशस्वी करूं शकतात, स्वतः नामांकित होअूं शकतात ! खेरीज अशांनाच जग टरकतांना दिसतें, त्यांनाच मोठमोठे वंदन करतांना दिसतात ! ज्या प्रोफेसरांची रेवडी हे संपादक अुडवितात त्यांकडूनच अशा संपादकांना विद्यालयांतील समारंभांचें आमंत्रण येत असतें ! अितिहासाच्या प्रोफेसरांना अितिहासमंडळांतील कार्यक्रमास हजर राहण्यास वेळ मिळत नाही पण ते अनंत काणेकरांच्या व्याख्यानासाठी दोन तास मोडूं शकतात ! या प्रकारांतील अिंगित काय असावें ! अिंगित असें की 'खोटें नाणें खऱ्या नाण्याला बाजारांतून घालवून लावतें' हा अर्थशास्त्रांतील चलनी नाण्यांबद्दलचा सिद्धान्त अितर क्षेत्रांतहि खरा ठरत आहे !

अेखाद्या समाजांतील लोक विशिष्ट कार्यासाठी किती द्रव्य खर्चूं शकतात याला मर्यादा असते. समाजाचा सांस्कृतिक दर्जा व अभिरुचि यांबरोबर त्याची आर्थिक परिस्थिति या खर्चाची मर्यादा मुख्यतः ठरविते. महाराष्ट्रांतील आजचा समाज वर्षाकांठीं जें द्रव्य, ग्रंथ व नियतकालिकें विकत घेण्यासाठी खर्च करतांना दिसतो त्याचा बहुतेक भाग समाजाचें स्वतःच्या फायद्यासाठीं अनहित करणाऱ्या लोकांकडून अुचलिला जात आहे. अर्थात् हे अनहित करणारे लोक अनेक समाजहितसाधक कार्यांचीं पत्रकें कपाळावर चिकटवूनच आपला कार्यभाग साधीत असतात. कोणी आपणाला विशिष्ट थोरांची परंपरा चालू ठेवणारे संबोधितात, कोणी संस्कृतिसंरक्षक म्हणवितात, कोणी शुद्ध राजकीय वा आर्थिक मताचें नांव घेतात, कोणी समाजसुधारक होतात तर दुसरे अितर साहित्य(कसलें !)सेवक, मनोविनोदक, कलाशिक्षणशास्त्रप्रचारक बनतात. पण बहुतेकांचा निष्कर्ष अेकच. ते पोटाला मिळवितात, घरदार करतात, बंगलेवाड्या अुठवितात, जमीनजुमले वा दागदागिने खरीदतात, किमान मोटारी अुडवून जिवाची तात्पुरती मुंबअी (!) करतात ! (मात्र बहुतेक आयुष्य मुंबअींत जाअूनहि आम्हांला अजून या वाक्प्रचाराचा अर्थ कळूं शकलेला नाही !)

मग काय या लोकांनी पोटाला बिब्बा घालून काम करावयाचें ! तसें कांही नाही. आमची तक्रार त्यांच्या द्रव्यार्जनाबद्दल नसून आपलीं कामें करण्याच्या नालायकीबद्दल आहे. ज्यांना पंचवीस वर्षें संपादकवर्गांत राहून अेकहि नामांकित वाटण्याजोगा राजकीय लेख लिहितां येत नाही त्यांना त्या जागांवर बसण्याचा अधिकार काय ! तर येवढाच की ते विशिष्ट कंपूंत किंवा गटांत किंवा सार्वजनिक संस्थेंत मूग गिळून राहण्याची कार्यैकनिष्ठा दाखवितात. या कंपूंत प्रवेश मूळच्या निकाम्यांशीं समरस होणारांचाच होत असतो. समरस होतां येत नसलें तरी किमान तसें बाह्यतः भासवण्याचें ढोंग पाहिजे ! राजनीतिशास्त्राचें प्राथमिक पुस्तकहि समजण्याची ज्यांच्या मेंदूची कुवत नाही असे राजकारणी संपादक महाराष्ट्रभर पसरलेले आहेत ! या शास्त्रांतील शब्दांचीं फुलें ते मुक्तहस्ताने अुधळीत असतात पण अर्थज्ञान भोपळ्याअेवढें ! राजकारण या शब्दाचा बटवडा महाराष्ट्रांत फार मोठ्या प्रमाणावर अभिमानपुरःसर चालतो पण त्या विषयाचें अितकें कमी शास्त्रज्ञान अितर कोणत्याहि प्रांतांत नसेल ! आणि या संपादकांचें, पुढाऱ्यांचें, खरें अंतरंगहि स्पष्ट दिसण्यास अडचण पडत नाही. त्यांच्या भाषणांत वा लेखांत रामदासांचें 'राजकारण' येअील, महाभारतांतील राजधर्मपर्वान्तर्गत श्लोकांची खैरात

होअील, कालिदास-भवभूति येतील; पण प्लेटो व ॲरिस्टॉटल, सिजविक वा लास्की यांचीं नांवें सहसा येणार नाहीत! खरेंच! त्यांचा राजनीतीशीं काय संबंध? असलाच तर तो महाभारताशीं समन्वय दाखवण्यापुरता! याच लोकांनी महाराष्ट्राची वाट लावली आहे.

हे शब्द अनेकांस कटू लागतील पण वस्तुस्थितीच अशी आहे. यांच्या राजकीय ज्ञानाचे वाभाडे काढणें कठीण नाही. त्याला 'राजाचें अिंग्रजी' ग्रंथाचे लेखक फाअुलर बंधु यांच्यासारखें (ग्लाडस्टन, मोर्ले यांच्या अिंग्रजीच्या चुका शोधून काढण्यांस) लेखसंग्रह घेअून बसलें की पुरे! जी राजनीतिशास्त्राच्या ज्ञानाची गत तीच अर्थशास्त्राची, समाजशास्त्राची व अितर ज्ञानाची! जर ह्या पंडितांचें डोकें गिरणींत शिरलें तर दुसऱ्याच दिवशीं यांचे हात तुटलेले दिसतील, विमानांत घुसलें तर यांच्या विमानांचा चुराडा झालेला दिसून येअील, आगगाडींत गेलें तर टक्कर झाल्याचें अैकूं येअील! पण सामाजिक शास्त्रांत तसें थोडेंच भय आहे? देशाचें राजकारण वा समाजकारण नासूनहि हे पुनः राष्ट्रदीप, स्वातंत्र्यवीर, धर्मवीर, लोकनायक, देशबंधु, किमान देशभक्त वा समाजसेवक ठरतातच!

डोकें ढिलें व ज्ञान तकलुपी असल्याने या समाजधुरीणांची विचारसरणी वा आचार-पद्धति मोठी विचित्र बनते. कोणत्याहि विषयांत यांची गति चालतांना दिसते! पण मूलग्राही ज्ञान अेकाचेंहि असावयाचें नाही. शब्दपांडित्य व वावदूकपणा भरपूर पण निश्चितपणा अेकाहि गोष्टींत नसावयाचा. वेदान्त्याप्रमाणे यांना अेकांत अनेक व अनेकांत अेक दिसत असतें! म्हणजे असें की बदमाषांत साधु व मूर्खांत शहाणा यांना दिसतो तसाच साधूचा मोंदू व शहाण्याचा गाढवहि यांना दिसूं शकतो. अितिहासाच्या क्षेत्रांत हे शिरले तर ह्यांना विशिष्ट नको असलेल्या महात्म्याची हे अशी कसून छाननी करतील की तो अखेर बदमाषच ठरावयाचा! अुलट मूर्खांच्या मूर्खपणाची मांडणी ते अशा सफाअीने करतील की तो महान् मुत्सद्दी हटकून ठरावा! महाराष्ट्रसारस्वतकार भावे यांनी मागे मराठ्यांचें राज्य रावबाजीने घालविलेलें नसून तें प्रतापसिंहाच्या देशद्रोहामुळे गेलें असें सिद्ध करून दाखविलें होतेंच! चरित्रें लिहितांना शहाण्याच्या शहाणपणाला ते अितकीं अितर कारणें सहायभूत झालेलीं दाखवितील की तो शहाणा होता म्हणण्यापेक्षा केवळ शहाणा ठरला अेवढेंच मानण्याकडे कल जावा; अुलट बद-माषाच्या बदमाष बनण्याला अितक्या गोष्टी कारणीभूत झाल्या असें म्हणतील की त्याच्या बदमाषीला संक्षेप मिळत मिळत तो फक्त दुर्दैवी सज्जन अुरावा! वाचकाच्या मनावर असा ठसा अुठावयाचा की शहाणा आणि मूर्ख, सज्जन आणि शठ, हे जवळजवळ अेकसारखे अस-तात! व्यक्ती सोडून घडामोडी घेतल्या तर पानिपतच्या युद्धाबद्दल हे म्हणतील की त्यापासून मराठ्यांची कांही फारशी हानि झाली नाही किंवा त्याचे परिणाम चिरंतन नव्हते! अितिहास सोडून नीतीच्या क्षेत्रांत अुतरलें तर हे म्हणतील की चांगलें व वाअीट हीं पाहाणाराप्रमाणे, कालानुसार, विशिष्ट प्रसंगाप्रमाणे तशीं ठरतात. ज्याला त्याला आत्मस्वातंत्र्य दिलें पाहिजे. मनःपूतं समाचरेत्। परिणाम — प्रत्येकजण आपलें मन पूत झालेलें आहेच व आपणाला वाटेल तें निवडण्याचें स्वातंत्र्य आहेच असें समजून वागत चालला! अेक बायको असून दुसरी केली तरी योग्य, कारण नसतां बायकोला सोडचिठ्ठी दिली तरी योग्य, व्यभिचार केला तरी तोहि सकारण, ग्रॅजुअेट बाअीने अेखाद्या मॅट्रिक अुनाडाशीं लग्न केलें तरी नीतिधैर्यच, आपल्या लहरी-खातर अनेकांचीं आयुष्यें कोणीं नासलीं तरी तोहि पराक्रमच! आमचे नीतिशास्त्रज्ञ या सर्वांचें वकीलपत्र घेण्यास व अभिनंदन करण्यास तयार! ज्यांचीं आयुष्यें खराब झालीं त्यांचीं मनें कमकुवत, त्यांना कोणत्याहि गोष्टीबाबत कांहीहि वाटण्याचें कारण नाही! स्वातंत्र्यामुळे सुत

शक्ती कार्यप्रवृत्त झाल्या पण कार्याकार्यविवेक जाग्यावर न अुरल्यामुळे त्या प्रवृत्ती समाजविध्वंसक ठरल्या. प्रत्येक व्यक्तीचें विचारस्वातंत्र्य जारी झाल्याने समाजाचें असें कांही कार्यमान राहिलें नाही. अर्थात् दुराचाऱ्यांना पुष्कळशा पळवाटा खुल्या झाल्या. त्याचाच परिणाम सामाजिक बेबंदशाहींत दिसून येतो. खेरीज आर्थिक पुनर्घटनेवांचून सामाजिक व नैतिक घटनांस आधी हात घातला गेल्यामुळे तर ही स्थिति फारच चेळाकली आहे.

याच निर्नायकीचें प्रतिबिंब वाङ्मयांत दिसल्यावांचून कसें राहील ! ज्यांच्या डोक्याची कुवत आर्थिक, सामाजिक, नैतिक वा राजकीय प्रश्न समजण्याची नाही, किंवा ज्यांचा तितका अभ्यास नाही, किंवा ज्यांना त्यांतील पौर्वापौर्व व परस्परसंघर्ष यांची सरणी लावतां येत नाही असे भाअी, कवी, कादंबरीकार, लघुकथालेखक, लघुनिबंधलेखक या अज्ञात-अगम्य प्रदेशांत पदक्षेप करते झाले. अर्थात् प्रमेयांना सिद्धान्तांचें, तर्कांना सत्याचें, अनुमानांना अितिहासाचें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य झालें. अितक्याहि मूर्खपणाच्या जोडीला खरें अितिहासज्ञान असतें तर त्यांच्या मर्कटलीलांना कांही पायबंद बसता. पण त्याच्या अभ्यासाचें तर या सर्वांनाच वावडें. अितिहास माणसाला शहाणपणा शिकवितो हें बेकनचें वचन या सर्वांनाच नामंजूर. त्यांच्या पितामहश्री मार्क्सने अितिहासाचें सार आधीच तयार करून ठेवलेलें असल्याने या नवोद्भटांना मूळ अितिहासाचें प्रयोजनच अुरलेलें नाही. दुसरे जे अितिहासवाचक वा अभ्यासक अुरले त्यांच्या अितिहासाची व्याप्ति पूर्वजवढाअीपुरती. या अिष्टहेतुसिद्धीसाठी ते अुत्सवमंडळें स्थापतील, फंड-देणग्या जमा करतील, त्याच्या खर्चांतून आपली अितिहासदुष्ट चोपडी प्रकाशित करतील आणि अेवंच खऱ्या अितिहासाभ्यासकांचें आयुष्य खर्ची घालून केलेलें कार्य नाहीसें करण्याची कोशीस करतील ! स्वतः चांगलें कार्य करण्याअैवजी खोटें कार्य नाहीसें करण्यांतच कार्यकर्त्यांची शक्ति, भक्ति, संपत्ति खर्ची घालण्याची आपत्ति यामुळे ओढवत आहे !

कुंपणाने शेत खावें त्याप्रमाणे सध्याच्या देशभक्तांनी व समाजसेवकांनी समाज खाअून टाकला आहे. समाज पुढे लोटून प्रगति घडवून आणण्याअैवजी स्वतःला पुढे लोटून पुढारी बनण्यांत ते कृतकार्य झाले आहेत. तण माजून पीक बुडावें त्याप्रमाणे क्षुद्र झोंड, दुष्ट, लोभी यांच्या सुळसुळाटाने समाजहितसाधक कार्य बुडून जात आहे. लोंढ्याने शेत वहावावें त्याप्रमाणे जगांतील वेगवेगळ्या देशांत निरनिराळ्या कारणांसाठी अुत्पन्न झालेल्या लाटांच्या पुरांनी हा देश वाहून जात आहे. येथील समाजरचनाच अशी बनत चालली आहे की ज्यांनी शरीरदृष्ट्या, मनोदृष्ट्या, बुद्धिदृष्ट्या वा शीलदृष्ट्या प्रजासंवर्धन करावें त्यांवरच अविवाहित राहण्याची, लग्नें लांबविण्याची, संततिनियमन करण्याची किंवा मुलें मरतांना पाहण्याची पाळी यावी. जीं मुलें वाढण्यासारखीं त्यांना खायला मिळूं नये आणि ज्यांना पचवण्याची ताकद नाही त्यांच्या अेथे समृद्धि व्हावी; ज्यांना बुद्धि नाही, शिकण्याची अिच्छा नाही, ग्रहण करण्याची कुवत नाही, त्यांच्या शिक्षणावर पाण्यासारखा पैसा खर्च व्हावा आणि ज्यांची बुद्धि तरतरीत आणि शिकण्याची अिच्छा अदम्य त्यांना दहापांच रुपयांसाठी शिक्षण सोडणें भाग व्हावें. आमचे सुशिक्षित सधन नागरिक मूर्ख पोरांसाठी बंगले बांधून ठेवतील, तीन पिढ्या पुरण्याअितकें द्रव्य मागे ठेवतील पण शेजारचा गरीब बृहस्पति अुपाशी मरतांना अुघड्या डोळ्यांनीं पहातील. आणि वर म्हणतील की त्याच्यांत कांही दोष असले पाहिजेत, अेरवी तो अुपासावर कसा येअील ! मद्रासकडील लोक गणित व आंकडेशास्त्र यांत प्रवीण व तज्ज्ञ असतात पण त्यांच्यांतहि रामानुजन् ओळखून काढणारा अेतद्देशीय कोणी निघाला नाही, त्याला व्यापारी कंपनींतील अेक अिंग्रज अुपयोगीं पडला ! अिकडेहि अशीं अुदाहरणें सांपडतील. शिल्पकार करमरकरांना

कलेक्टर ऑट्टो रॉथफील्डनी ओळखिलें, जवळच्या ब्राह्मणांपैकी कोणी ओळखूं शकलें नाहीं! आमच्या समाजांत आज कोणत्याहि विषयांत विशेष गति असलेलीं कोणी मुलें असलीं तर तीं बहुधा ओळखल्याशिवाय सुकून जाण्याचा संभव फार! बरें, तो माहीत झाला तरी त्याचें चीज होईल ही आशा नको! तो अेक टीकेचा, थट्टेचा, विषय व्हावयाचा! ठराविक चाकोरींतून निश्चित मार्गानें तो स्वार्थतत्पर राहून वर आला तरच ठीक, नाहीं तर तो फुकटच जावयाचा! साहस, नवीन भरारी, अकल्पनीय मार्ग हीं आमच्या कारकुनी हिशेबी स्वभावाला मानवत नाहींत. अशा कारकुनी वृत्तीच्या कोत्या बुद्धीच्या माणसांच्या हातांत राजकारण आणि समाजकारण गेल्यानेच महाराष्ट्राचा घात झाला आहे.

वर जें विवेचन केलें त्यावरून असें दिसतें की या देशांत कोलंबस अथवा मॅगेलन्, शॅकल्टन अथवा अमंडसन, अेन्स्टैन् अथवा जेम्स जीन्स, नेपोलियन अथवा शिवाजी यांसारखे पुरुष अुदयास येण्याची शक्यता अुरलेली नाहीं, हा देश कारकुनी वृत्तीच्या लोकांनी अुपनगरें वसवण्याचा पराक्रम करण्याअितपच कार्यक्षम आहे. आपल्या समाजांत विडंबनानें विद्वत्तेची आणि विनोदानें विक्रमाची जागा पटकावली आहे. येन केन प्रकारानें, जुगारीनें, सावकारीनें टेकेदारीनें, मिरासदारीनें, परदेशी वस्तूंचा प्रचार करून, अनेक संस्थांचे विश्वस्त होअून, नटींची बडवेगिरी करून, द्रव्य मिळवणारांच्या हातांत समाजाचें यंत्र गेलें आहे. वैश्यांनी व शूद्रांनी ब्रह्मतेज व क्षात्रतेज लुप्त करून टाकलें आहे. शिक्षणासारख्या शुद्ध बौद्धिक क्षेत्रांतहि या गोष्टीचें प्रत्यंतर येतें. आपल्या विषयांत सतत परिश्रम करणाऱ्या प्राध्यापकांपेक्षा संस्थेसाठी द्रव्य मिळविण्यांत हुशार अशा अुचापती गृहस्थांच्या हातीं संस्थांचीं सूत्रें गेलीं आहेत. हे सूत्रधार स्वतःस अिष्ट त्या तऱ्हेनें संस्था हाकीत असतात. ऑलिव्हर ट्विस्ट्मधील अनाथालयाच्या चालकांप्रमाणें ते स्वतःच्या मजेंत चूर असतात आणि त्यांच्या संस्थांतील मुलें ज्ञानासाठी आक्रोश करीत असलीं तरी त्यांच्या वांट्यास नियमित घोकीव ग्रंथांच्या पेजेचे चमचा दोन चमचे आले म्हणजे फार झालें! खऱ्या विद्वान् माणसाला दीर्घ परिश्रम करूनहि मान्यता मिळणें किती मुश्किलीचें आहे याचा अेक मासला कै. माधवराव पटवर्धनांच्या हृदयद्रावक अुदाहरणावरून स्पष्ट झाला आहे! आधीच विद्वान् असलेल्या माणसानें पांच वर्षें परिश्रम करून सुस्पष्ट गुणांचा ग्रंथ तयार करावा, त्याच्या मान्यतेसाठी लहान मुलाप्रमाणें परीक्षेस बसण्यांत कमीपणा मानूं नये, तरी त्यांना मान्यता मिळतांना विश्वविद्यालयास आचके बसतात! माधवराव मनानें खंबीर, वृत्तीनें झुंजार तरीहि त्यांचें हृदय पोखरलें गेलें व त्यानें त्यांच्या आयुष्याचीं बरींच वर्षें कमी केलीं याबद्दल शंका वाटण्याचें कारण नाहीं. विशिष्ट रोगांची अुत्पत्ति मनाच्या अस्वस्थतेनें होते हें अेक वैद्यकीय सत्य आहे.

सद्गुणांवर विसंबून कार्य करण्याअैवजी सत्तेच्या जोरावर तें घडवून आणण्याची प्रवृत्ति निर्माण झाली म्हणजे समाजाच्या स्वास्थ्यास ओहोट लागला असें समजावें. तीच परिस्थिति आज आहे. कोणत्याहि क्षेत्रांत वर बसणारीं माणसें तीं विशिष्ट स्थानापन्न आहेत म्हणून त्यांना महत्त्व प्राप्त झालेलें आहे, तीं सुयोग्य आहेत म्हणून नव्हे. या माणसांना त्यांचें स्थान शेअर-बाजारासारख्या अुलाढाली करून प्राप्त झालेलें असतें, निढळाच्या घामाचा अुद्योग करून नव्हे. सट्टे करून श्रीमंत झालेल्या माणसालाहि लोक श्रीमंत म्हणतात व समाजांतील त्याच्या महत्त्वास त्या त्या मार्गांमुळे मुळीच बट्टा लागतांना दिसत नाहीं. निवडणूक नामक लोकशाहीचा जो विशेष आहे त्याचें खरें स्वरूप काय असतें हें आता पोरांनाहि कळावयास लागलें आहे. कोणताहि खटाटोप न करतां किती माणसें नुसत्या नामकरणानें निवडून येतील! मेकॉले

अनेक वर्षे अेडिन्बरोचा रेक्टर होता, पण त्याची निवडणूक आपोआप होत असे. अशी पुष्कळ वर्षे लोटल्यानंतर त्याला प्रत्यक्ष न ओळखणारी नवी पिढी पुढे आली. तेव्हा त्याच्या चहात्यांनी अेक वर्षी त्यास कळविलें की यंदा आपणांस थोडी हालचाल केली पाहिजे, नाही तर पूर्वीसारखें निवडून येण्याची शक्यता संशयांत आहे. त्याने सांगितलें की पूर्वीप्रमाणे आलों तरच ती निवडणूक, नाही तर मला लोभ नाही! असें सांगण्याची किती बड्या धेंडांची तयारी आपणांस दिसते! अेखाद्या खंद्या शिपायाप्रमाणे किंवा गुळाच्या ढेपेला डसलेल्या डोंगळ्याप्रमाणे ते जागांना चिकटून राहतील, तसेच मरतील; पण मेकॉलेचा विचार त्यांच्या चित्तांत डोकावणार नाही! अशी वृत्ति ज्या समाजांतील लोकांत नांदत आहे तेथे खऱ्या लोकशाहीची बूझ काय? ही स्थिति राजकीय, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक— सर्वच क्षेत्रांत सारखी विद्यमान आहे.

प्राध्यापक राधाकृष्णन् यांनी नुकतेंच जगाच्या आजाराचें निदान केलें. त्यांत तीन गोष्टींचें थैमान त्यांना आढळलें. शास्त्रज्ञान, मनःशक्ति आणि नागडा लोभ यांचा घनघोर संग्राम त्यांना दिसून आला. संपत्तीचा लोभ, सुखाचा लोभ, सत्तेचा लोभ, कीर्तीचा लोभ यांनीच अचाट शास्त्रज्ञान व जबरदस्त मनःशक्ति यांचा दुरुपयोग घडवून आणून जगांत अस्वस्थता निर्माण केली आहे. आपल्या देशांतील बेबंदशाहीचीं कारणेंहि वेगळीं नाहीत. फक्त आपला देश परतंत्र असल्याने त्यांत देशद्रोही बूटपुशांची भर पडली आहे. समाजव्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा आद्य हेतूच सज्जनांना संरक्षण देणें व त्यांचाच अुत्कर्ष होअून तेच व्यवस्थापक होतील अशी घटना घडवून आणणें हा आहे. तो ज्या समाजांत वा राज्यांत साधत नाही तें राज्य बिघडलें असें समजावें. मोठा लोभ तर राहोच, पण तनुनिर्वाहापुरताहि 'प्रपंच' न केला तरी अनर्थ घडावयाचा आपल्या समाजांत चुकत नाही असा आमचा अनुभव आहे. तो जर अपवादरूप नसून सार्वत्रिक असला तर त्या समाजाला भविष्याची आशा नाही असें म्हटलें पाहिजे.

समाजहितसाधक पुरुष वर आणण्याअेवजी त्यांना ठेचून जमिनींत गाडण्याकडेच आज समाजसत्तेचा दुरुपयोग होतांना दिसतो. आजची नवी पिढी या दुरुपयोगाच्या तंत्रांतच तरबेज होत आहे असें दिसतें! विनोदाचें रूपान्तर हलकट टवाळींत, टीकेचें रूपान्तर अन्याय्य विडंबनांत, सत्यान्वेषणाचें रूपान्तर असत्यपूर्ण बदनामींत मोठ्या प्रमाणावर होतांना दिसत आहे. या टवाळीला भिअून, विडंबनाने हृदयविदारण होअून, बदनामीला बिचकून जाअून अनेकांनी आपलीं कार्यक्षेत्रें सोडलीं आहेत. धर्मयुद्धाची शक्यता नाही म्हणून समरांगणाला पाठ दाखवून भागूबाअीचा शिक्का सहन करीत निघून जाण्याची पाळी भल्याभल्यांवर आली आहे. साहित्यिकांनी, लेखकांनी, टीकाकारांनी असले धंदे चालवून अुदरंभरण करावें, समाजाला अनिष्ट वळण लावावें, निर्मळ नव्या पिढीचीं मनें गढूळ करावीं, याहून बाअीट स्थिति कोणती? अमेरिकेंतील बदमाषांच्या कृतीचें हें अनुकरण झालें! वैमानिक लिंडबर्गसारख्यांवर तेथे देशत्यागाची पाळी आली त्याप्रमाणेच या देशांतहि सज्जनांवर आली तर त्याहून देशाची अधिक अपकीर्ति कोणती? या लाजिरवाण्या अप्रिय विषयाचें कीर्तन अेवढेंच पुरे.

वर अेवढें जें संकीर्तन केलें तें अत्यंत दुःखित मनाने, मोठ्या कष्टाने, केलें. कोणत्याहि संस्थेवर माझा दांत नाही. ज्यांच्या डोक्याला अेखादी टोपी बसली असें वाटेल त्यांनीहि ती गोष्ट वैयक्तिक दृष्टीया घेअूं नये असें मी नम्रपणाने विनवितों. माझे शब्द कचित् कडक

वाटतील पण माझें मन मीं बालकाप्रमाणे स्वच्छ ठेवलें आहे.

माझी खात्री आहे की जो निर्मळ मनाचा आहे त्याला माझें विवेचन पटेल. रागलोभ-मदमत्सरादिकांनीं पिडलेल्यांसमोर मी निर्बल आहें. पण महाराष्ट्रसमाजाची घसरट त्यांनाहि अमान्य करणें जड जाअील. डॉ. केतकरांसारख्यांच्या स्मारकाबद्दल अेखादी कमिटी नेमली गेली तरी ती जातमृत होतांना दिसते. त्यांचें लिखाण मौलिक असलें तरी तें छापतां येत नाही. आणि ज्यांच्यांत कांही असलेंच तर भाषेच्या विलासाखेरीज अन्य कांही नाही त्यांच्या लेखसंग्रहांचे वा समग्र लिखाणाचे संभार नित्य बाहेर पडत आहेत! लघुकथागुच्छांचा व काव्यांचा तर नुसता पाअूस पडत आहे! विनोदी लिखाणाच्या मान्यापुढे तर अुभें राहणेंहि शक्य नाही! ज्यांची बुद्धि ढिली, मन दूषित, वृत्ति कुत्सित, ध्येयवत्ता शून्य, चारित्र्य संशयित, आचरण लोभमोहमदान्वित, त्यांच्या लिखाणांत काय सांपडण्यासारखें आहे? त्यांकडून कोणता संदेश मिळण्यासारखा आहे? कार्यप्रवृत्ति कशी होण्याजोगी आहे? ते लेखक-संपादक-ग्रंथकर्ते म्हणून ज्ञात होतील, सभा-संमेलन-परिषदांतून मिरवूं शकतील, क्वचित् द्रव्य-दारागृहसमन्वितं होअूं शकतील; पण त्यांच्या भाषाविलासाचा अुपयोग समाज सुधारण्याकडे होअूं शकणार नाही, समाजाची संघटना करण्याकडे होणार नाही, अशिवाचा नाश करण्यांत होणार नाही, राष्ट्र तारण्यासाठी होणार नाही, जगांत शान्ति-सुख-समाधान-आनंद पसरविण्यांत त्याला यश प्राप्त होणार नाही.

शंका समाधान

दादर, मुंबअी १४. ता. १२-११-१९३९

रा. न. वि. वि.— साहित्य पत्रिकेचा आक्टोबरचा अंक पाहिला. त्यांत भट्टशंकर देवकृत अलंकारमंजूषा या मथळ्याचा काव्यतार्थ नारायणशास्त्री आठले, अुज्जयिनी, यांचा लेख आहे. त्यांत सदर ग्रंथाचा कर्ता भट्टशंकरदेव हा गुजराथेंतील रानेर या गांवीं जन्मला असें आहे. हें रानेर हें सुरतेजवळील रान्देर असावेंसें वाटतें. आज त्या गांवची वस्ती १५००० वर असून सुरतेपासून दोन मैल अंतरावर आहे. ते अुरःपत्तनीं (अुरफाड कीं काय?) निवास करीत असत. ओलपाड या नांवाचें गांवहि गुजराथेंत सुरत जिल्ह्यांत आहे. शोध व्हावा. कळावें ही विनंती.

आपला, भास्करराव जाधव

श्री. भास्करराव जाधव यांचें हें पत्र काव्यतीर्थ नारायणशास्त्री यांच्याकडे पाठविण्यांत आलें असतां त्यांचें पुढीलप्रमाणें अुत्तर आलें आहे.

प्रा. ग्रंथसंग्रह, अुज्जैन

कृ. रा. न. वि. वि.— आपलें ता. १५ चें पत्र पावलें. अलंकारमंजूषा हें पुस्तक आमचे संग्रहातर्फे छापून झालें असून लवकरच प्रसिद्ध होअील. रा. भास्करराव जाधव यांस प्रति पाहिजे असल्यास कळवावें. किंमत रुपये ४ ठेविली आहे. यांत प्रस्तावना व श्लोकांचें भाषान्तर अिंग्रजींत केलेलें असून पुस्तक संग्राह्य आहे. रा. जाधवांनी विचारलेल्या सर्व गोष्टींचा त्यांत अुल्लेख स्पष्ट रीतीने केला आहे. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला, एन्. व्ही. आठले

परीक्षणें

—*—

प्रि. गो. चिं. भाटे आणि त्यांचा ग्रंथराज

[(A ?) History of Modern Marathi Literature : 1800-1938.
पृष्ठसंख्या ७४५; मूल्य ८ रुपये]

प्रि. भाटे यांच्या ग्रंथश्रेष्ठाचा बोलबाला गेल्या वर्षांत महाराष्ट्रांत बराच झाला. प्रि. भाटेसाहेबांच्या अेकंदर ग्रंथरचनेंत (अेक 'प्रेम कीं लौकिक' वगळतां) स्वतंत्र, विशिष्ट असा ग्रंथ हाच असला पाहिजे. साहित्याची अितिहासरचना करावयास अितिहासकाराला त्या साहित्याचा अनेक दृष्टींनी अभ्यास करावा लागतो. अेक तर, त्याला अैतिहासिक विकासक्रमाची पूर्ण कल्पना हवी; दुसरें, साहित्यांतील अन्तर्गत वैचारिक वा वाङ्मयीन प्रवाहांचीं स्थित्यंतरें त्याला दाखवितां यावयास पाहिजेत; आणि तिसरी गोष्ट — जी सर्वांत अधिक महत्त्वाची आहे — म्हणजे तो स्वतः रसिक विवेचक असला पाहिजे. तात्त्विक टीकापद्धति (Philosophical Criticism), रसिक टीकारीति (Appreciative Criticism) आणि अैतिहासिक टीकादृष्टि (Historical Criticism) या तिन्ही गोष्टी त्याने अधिक अुण्या प्रमाणांत आत्मसात् केलेल्या असणें आवश्यक आहे. पण प्रस्तुत ग्रंथांत वरील सर्वच गोष्टींचा अभाव प्रामुख्याने दिसतो, हा आहे याचा विशेष ! आणि स्वतंत्र भाग म्हणजे आंतील अपुरी आणि चुकीची माहिती. अितर सर्व भाग म्हणजे अनेक लेखक व्यक्तींकडून लिहून आलेलीं त्यांच्याच लेखनाचीं, आणि प्रि. भाट्यांनी ब्रिटिश म्यूझिअममध्ये बसून सरसकट, समदृष्टीने लिहून काढलेलीं सापेक्षतः कमी महत्त्वाच्या लेखकांविषयीचीं टांचणें. तीं तशींच्या तशींच छापून काढून ग्रंथाचा बोंगा वाढविला आहे; आणि लेखकांच्या कृतींचें साहित्यदृष्टीने मूल्यमापन करण्याचा प्रयत्न साधारणतः न केल्यामुळे प्रमाणबद्धता म्हणून कांही गुण अितिहासग्रंथाला आवश्यक आहे ह्या रूढ कल्पनेचें भञ्जन करून आपलें व्यक्तित्व कायम राखिलें आहे.

याचा अुपयोग असा अेकच होण्यासारखा आहे (पण आहे या स्वरूपांत तोहि कमीच होणार). तो म्हणजे दुर्मिळ ग्रंथांच्या नामावलि आणि नामशेषहि नसलेल्या कांही ग्रंथकारांचीं नांवें आपणांस यांत मिळतील. पण फक्त नांवेंच हो ! त्यांसंबंधी विवेचनाचा अर्थातच अभाव आहे. पण अैतिहासिक साहित्यसूचिग्रंथ म्हणूनहि याचें महत्त्व कमी झालें आहे; याचें कारण म्हणजे कित्येक प्रसिद्ध लेखकांच्या प्रसिद्ध कृतींचीं नांवें सुद्धा त्यांनी निर्दिष्ट केलीं नाहीत. श्री. हरिभाअूंच्या अैतिहासिक कादंबऱ्या, श्री. न. चिं. केळकरांचे ग्रंथ यांचा नामोल्लेखहि नाही. आणि कारण काय तर म्हणे ते Voluminous writers (बहुप्रसव ग्रंथकार) आहेत; तेव्हा जागा फार व्यापली जाअील. अगदी सामान्य प्रतीच्या लेखकांच्या जंत्र्या जाड ठशांत पानेंच्या पानें छापून जागा खाल्ल्यावर राहील कशी जागा ! मुद्रणाची थोडीशीहि माहिती असलेला माणूस सहज दाखवूं शकेल की, पृ. १९४ ते २९० नि पृ. ५४० ते ६४० या २००

पृष्ठांतील निदान ५० पानें तरी १० पानांत सामावितां आलीं असतीं, आणि मग लेखकास आगरकर-टिळक यांसारख्यांच्या लेखनशैलीच्या आणि विचारांचा तौलनिक विचार करण्यास जागा मिळाली असती. हरिभाअू आपटे, केळकर यांसारख्या ग्रंथकारांची अशी गत झाली आहे; तर मराठी भाषेला ललामभूत अशीं अेकनाथांचीं भावरम्य पदें, कै. बा. अ. भिडे यांचे रविकिरणमंडळाच्या पुस्तकांवरील टीकालेख आणि विशेषतः त्यांचा महानुभावअखेरपर्यंतचा 'मराठी भाषेचा अितिहास'; कै. वा. गो. आपटे यांचीं 'मॉडर्न रिव्ह्यू'मधील परीक्षणें; कै. कवि अनंततनय यांचा 'तिलकविजय' आणि— अैका हो, वाचक !— 'मुसलमानी मुलखांतील मुशाफरींत' अिराणच्या कोपऱ्यांत ज्यांचे निनाद श्री. टिकेकर यांना अैकावयास आले ते बॅ. सावरकर यांचे 'तानाजी' नि 'बाजी प्रभू' यांचे पोवाडे यांचा अुल्लेखहि आढळत नाही. परवा ज्यांना आपण साहित्यसम्मेलनाचे अध्यक्ष केलें त्याच बॅ. तात्यारावांच्या तिन्ही नाटकांची आणि महाकाव्यशैलीचे आधुनिक मराठींतील अेकमेव द्योतक अशा 'कमला' (अथवा 'रानफुलें') आणि 'गोमांतक' ह्या काव्यांचीं नांवेंहि घाअीघाअींत लिहावयाचीं राहिलीं[1] ! ज्या ग्रंथांवर साहित्याची श्रेष्ठता अवलंबून त्यांचा नामनिर्देशहि नाही आणि त्यांचें रसावलोकनहि नाही असा हा 'अितिहास' ग्रंथ काय कामाचा ? कुणाला खरें तरी वाटेल का की, परप्रांतांत प्रमाणभूत होण्यासाठी लिहिलेल्या या ग्रंथांत स्वातंत्र्यशाहीर कै. गोविंद दरेकर यांचा नामोल्लेखहि नाही ? पण वस्तुस्थिति अशी आहे खरी. मग कुणीं कडक टीका केली म्हणजे या इतिहासकारांचे कायदेपटु बन्धु हवाला देतात की, त्यांना 'इतिहास' चांगला म्हणजे काय हें माहिती आहे !! शिंपिणीला चांगला शालू म्हणजे काय तें माहीत असलें तरी प्रत्यक्ष शिलाअी करतांना ती पासोडीच तयार करणार !

बरें, तर्कशास्त्राच्या प्राध्यापकांची वर्गीकरणपद्धति तरी तर्कदुष्ट नसावी ! तेंहि नाही. 'अर्वाचीन मराठी साहित्या'चा १८५६ ते १८६६ पर्यंतचा काळ 'मराठीचें विद्यापीठांत स्थान' ! अेक विशेष घटना नेहमीच 'युग' (Period) स्वरूप धारण करते असें नाही. तसेंच शाहीरवाङ्मयाचा काल वास्तविक Period (अैतिहासिक कालखंड) म्हणून मानावयास नको का ? पण अत्यंत महत्त्वाच्या या पुरातन साहित्याला तुरळक अुल्लेखावांचून जास्त महत्त्व हें अितिहासकार देत नाहीत. आधुनिक काळांत लोकसाहित्य मौलिक मानलें जातें. गुजराती-बंगालीचे अितिहासकार आपापल्या लोकगीतांची महती किती गात आहेत, आणि आमचे हे लेखक सगनभाअू होनाजी बाला-प्रभाकर यांच्या साहित्याला पुरें अर्धें पानहि देत नाहीत !— आणि अनंतफंदींना सबंध पान !! वास्तविक अद्ययावत् साहित्येतिहास लेखनांत यांत्रिक काल-युग-समय कल्पनेला फारशी जागा नसते. अंतर्गत प्रवाहांप्रमाणे खंड पाडले जातात. The Cambridge History of English Literature हा याचा अुत्कृष्ट नमुना आहे. पण आम्हीं हें सुचवितां कामा नये ! कारण लगेच लेखक आपल्या अिंग्रजीच्या प्राध्यापक सुपुत्राचें नांव ढाल म्हणून पुढे करतील. अितिहासलेखनाची व वर्गीकरणाची हीच का पद्धत चांगल्या अितिहासग्रंथांत असते ?

पण सर्वांत अधिक निराशा होते साहित्याच्या श्रेष्ठतेचा तारतम्याने घेतलेला आढावा शोधूं जातां ! नामदेवाच्या अभंगांचा शीखांच्या ग्रंथसाहेबांत समावेश; रघुनाथपंडितावरील

१ हिन्दुमहासभेचा सावरकरप्रणीत स्मृतिग्रंथ 'हिन्दुत्व' याचाहि अुल्लेख नसावा ना ?

२ आणि ग्रंथकार 'ललितकलामीमांसा' या ग्रंथाचे लेखक आहेत !!

'नैषधीय चरिता'चा सखोल परिणाम; राम जोश्यांच्या लावण्यांतील वेदान्त; आगरकरांचा बुद्धिवाद; टिळकांच्या 'गीतारहस्या'चें वैशिष्ट्य; चिंतामणरावांच्या 'दुर्दैवी रंगू'चें महत्त्व; कै. भालचंद्र (ग. ना. टिपनीस) यांच्या 'घटकेच्या नाटकाचें' आणि त्यांच्या शाहिरी थाटाच्या पण परमहृदयंगम कवितांचें मूल्यमापन हीं या दृष्टीने किती अगत्याचीं होतीं ! श्री. केळकरांच्या आयुष्याच्या रूपरेषेला दोहोंवर पानें खर्चून झाल्यावर त्यांना त्यांच्या साहित्याची आठवण होते (की ज्याच्याशीं "This History is *more concerned*") आणि मग सबंध आठ ओळी लिहून सांगतात काय की, ते Voluminous writer आहेत, Journalist आहेत आणि त्यांनी १०००० पानें लिहिलीं ! बस् ! हा त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा !!!

कांही ठिकाणीं तर चुका हास्यास्पद होतात. लावणी हा काव्यप्रकार अिंग्रजी amorous ballad चा मराठी पर्याय असतांना त्याला ते खुशाल Metre म्हणतात; आणि हा आपला शोध अुपयोगांत आणून श्री. तांब्यांच्या 'दासी' जातींतील 'डोळे हे जुलुमि गडे' या भावगीताला या त्यांच्या 'लावणी छंदां'त नेऊन बसवितात !! कै. वि. ल. भाव्यांची साहित्यसेवा परमोज्ज्वल आहे, पण 'महानुभावलिपी'चें कोडें अुलगडण्याचें श्रेय त्यांना कसें देतां येअील ? पण प्रि. भाव्यांनी तें त्यांना देअून कै. राजवाड्यांना हात दाखविला आहे ! ही कुठल्या गांवची माहिती ! रामदासांच्या प्रवृत्तिवादाचें (Doctrine of Action) तत्त्वज्ञानाच्या या पुरातन प्राध्यापकांनी Doctrine of Worldliness (अैहिकवाद) असें भाषान्तर केलें आहे !! आणि केकावलींचें भाषान्तर Cries of a Peacock ! "A Series of the Peacock-notes" असें सरळ भाषान्तर चालणार नाही !

रसिक विवेचनाच्या दृष्टीने दोन अपवाद मात्र आहेत: अेक गडकऱ्यांचा आणि दुसरा डॉ. केतकरांचा. पहिल्यांत त्यांनी गडकऱ्यांच्या 'राजसंन्यास'ला शेक्सपीअरच्या 'Antony and Cleopatra'पेक्षा अुत्तम ठरवून आपलें वैशिष्ट्य राखलेंच आहे; त्याचप्रमाणे डॉ. केतकरांच्या ललितलेखनाचा आढावा त्यांनी घेण्याचें टाळलेंच आहे; तरीहि अेकंदर निराशामय वातावरणांत हे दोन सुखाचे क्षण वाचक घालवितो.

अशा तऱ्हेचें आहे या ग्रंथराजाचें स्वतंत्र वैशिष्ट्य. ती. दादासाहेबांनी अुतार वयांत अितके श्रम घेतले; त्यांच्या सुविद्य पुत्रांनी त्यांना अितकें साहाय्य केलें; याकरिता मराठी वाचकांनी त्यांना धन्यवाद द्यावे कीं असल्या प्रकारचा ग्रंथ लिहिल्याबद्दल दोष द्यावा, हें मोठें कोडें आहे. कारण आज परप्रांतांत हा ग्रंथ जाणार, तिथे श्री. नवलराम त्रिवेदी[3] यांच्यासारखे गुजरातीचे अव्वल टीकाकार त्याला प्रमाण मानणार, हें पाहून असें वाटतें की, हें काम पोतदार, फाटक, पटवर्धन, दाते, कर्वे, माटे, माडखोलकर यांपैकी कुणाला करतां आलें असतें तर तें अनेक पटींनी चांगलें नि प्रातिनिधिक झालें असतें. जमविलेल्या साधनांची पाखडणी (sifting), निवडणी (sorting), मिसळणी (assimilating) त्यांनी अितकी चांगली केली असती की अेकदा N. D. Savarkar : Marana ki Lagna असा अेका लांबच लांब जंत्रींत अुल्लेख करून पुन्हा स्वतंत्र लेखक म्हणून डॉ. सावरकरांच्या वरील अेकपानी (६७१) चर्चेंत "The only independent book that he wrote is—Jaichā Mandap"— त्यांनी स्वतंत्र असें 'जाअीचा मंडप' हें अेकच पुस्तक लिहिलें असें निश्चित विधान केलें तर नसतेंच, पण डॉ. सावरकरांच्याच 'समाजकंटक' या कादंबरीचा

३ पाहा 'बुद्धिप्रकाश' या गुजराती त्रैमासिकांतील समीक्षण.

आणि 'सेनापति तात्या टोपे चरित्र' या दोन अनुल्लिखित स्वतंत्र ग्रंथांचाहि परामर्श घेतला असता. त्यांनी मुख्य अितिहासग्रंथांतच प्रमुख साहित्यकारांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि नमूद केली असती आणि नुसता अेखाद्या आगामी Anthology चा 'This would be (की will be ?)...an exhaustive and comprehensive anthology showing ...'criticism of life', which, according to Mathew Arnold, constitutes the essence of high class literature and poetry' असा पोपटपंची हवाला दिला नसता. असो. ज्या अर्थी ग्रंथप्रसार चालूच आहे त्या अर्थी आम्ही अेवढेंच सुचवूं अिच्छितों की, मराठी भाषा नि साहित्य यांची गेलेली अब्रू निदान पुढील आवृत्तींत पुनःसंस्करण करून प्रि. भाव्यांनी परत आणण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्र त्यांचा अुतराअी होअील.

ना. ग. जोशी

कांही नवीन ग्रंथ

काव्य

(१) सौन्दर्यलहरी [कवि : ज्ञानरत्न श्री. रामराव मा. भांबुरकर, सुरतकर गल्ली, बडोदें]

(२) वसन्त-वैभव [कवि : वसंत चिन्धडे; प्र. य. गो. जोशी, ११२।१५सदाशिव,पुणें]

(३) शरयू [कवि : श्री. सीताराम ग. मनाठकर, हैदराबाद (दक्षिण)]

हे तिन्ही ग्रंथ महाराष्ट्रांतील कवींच्या, गेली आणि चालू अशा, दोन पिढयांचे प्रतिनिधि आहेत. सौंदर्यलहरीकर्ते ज्ञानरत्न-कवि भांबुरकर हे कै. चंद्रशेखर, तांबे, बी यांच्या पिढींतील अेक चांगले साहित्यकार. त्या पिढीची सौन्दर्यासक्ति अिंग्रजींतील अभिजात (Classical) कवींच्या सारखी परमगाढ. प्रदीर्घ काळपर्यंत त्यांनी साहित्याची सेवा करतां करतां आपल्या रसिक वृत्तीने जीवनांतील विविध दृश्यान्तरें पाहिलीं; निर्मळ कलानंदासाठीं मधुकरवृत्तीने त्यांच्या ज्ञानेंद्रियांनी दर्शनीय, श्रवणीय, स्पर्शनीय नि मननीय सौन्दर्यस्थलांचा अनुभव घेतला आणि अशा बहुविध मनःसंस्कारांना शब्दमय असें काव्यरूप दिलें. वाऱ्याच्या मंद झुळकीवर तरंगत फुलपांखरूं जेव्हा बहुरंगी फुलांना स्पर्श करीत जातें, तेव्हा तें अितस्ततः भ्रमत असतें. कवीचें लहरी मनहि कधी गृहजीवन शोध, कधी राष्ट्रजीवन शोध, कधी बाह्य निसर्गजीवन अनुभव, कधी मनोजीवनाचा ठाव घे, कधी साहित्यसृष्टि धुंडाळ तर कधी अैतिहासिक घटनांचा विचार कर, अशा रीतीने यावच्छक्य सौन्दर्यशोधन करीत होतें. त्याच्या काव्यमय प्रतिरूपांत या दृष्टीने अेक नियमित प्रक्रिया आपणांस दिसणेंच अशक्य. पण अशा अितस्ततः फेकलेल्या फुलांची पखरण कांही कलाकृति होणार नाही; म्हणून कवीने त्या सर्वांना अेकाच शिखरिणी वृत्तांत गुंफून प्रत्येक चवथा चरण 'परमसुख, सौन्दर्यलहरी' या शब्दाने पुरा केला आहे. तेव्हा ही पुनरुक्ति निदान या संग्रहांत तरी रसभंग करीत नाही; अुलट काव्यांत अेकजीवपणा आणण्यास ती पुनरुक्तिच साधनभूत आहे. काव्याला अेकरूप करावयास कवीचें व्यक्तित्वहि चांगलें यशस्वी झालें आहे. तरी पण वर दाखविलेल्या विविध जीवनथरांतील सौन्दर्यलहरींचे विविध समूह करून जर जोडले असते तर संग्रहांत थोडासा आढळणारा विस्कळितपणा अवश्य नाहीसा झाला असता.

काव्याच्या शेवटीं स्पष्टीकरणार्थ टीपाहि जोडण्यांत आल्या आहेत. साधारणतः त्या कवीला अभिप्रेत असें सौन्दर्यस्थल चांगल्या रीतीने स्पष्ट करतात. पण कांही ठिकाणी स्पष्टीकरण आणि मूळ श्लोक यांचा मेळ होत नाही– निदान तो आम्हास तरी सदोष वाटतो. श्लोक ४ यांतील "परी निर्जीवीं तें (सौन्दर्यप्रगमन) सतत दिसतें स्पष्ट लटकें," याचें भावाविष्करण श्री. गोविंद य. जोशी असें करतात : ताजमहालसारख्या विश्वविख्यात भव्य इमारतीकडे पाहिलें म्हणजे प्रथमदर्शनाने जो आनंद होतो तो मग अुत्तरोत्तर कमी होत जातो." हें चुकीचें विधान 'निर्जीव' याचा स्थूल अर्थच ध्यानीं घेतल्यामुळे करावें लागलें. खरोखर 'निर्जीव' म्हणजे कविश्रेष्ठ ब्राअुनिंगचें Soulless सौन्दर्य Andrea del Sarto यांत ज्या प्रकारचें जड, अुदात्तभावहीन शिल्प वर्णिलें आहे त्या प्रकारचें आहे का ताजमहालचें शिल्प ! तसेंच १९ मध्ये युवतीच्या शिरावरील मुक्तामालेला गङ्गा म्हटलें आहे, भांगाला नव्हे, तसेंच 'गुप्त कुट्टर' असा संयुक्त शब्द नसून "कुट्टरीं गुप्त सरिता" = सरस्वती, असा अर्थ अभिप्रेत दिसतो. ३३ त 'सजल घनसंभार' हीं दोन केसांचीं विशेषणें घेअून त्यांचा 'ओलसर' आणि 'विपुल' असाहि अर्थ करणें योग्य होईल. ३९ तील विरही पति प्रियेचें चित्र काढीत असतां अश्रूंनी ती मळून जाणें हें मेघदूतांतील घटनेला समान नसून शाकुंतलांतील ६ व्या अंकांतील दुष्यंताच्या अशाच अगतिक स्थितीशीं साम्य दाखवितें. विशेषतः २४ मधील सूचित शृंगार श्री. जोशी यांच्या ध्यानीं आलेला दिसत नाही. गुजगोष्टी करण्यास स्त्री पतीला अुठविते न अुठविते तोंच स्वार्थी शिशु रुदनकल्लोल करतो. मग पति मात्र तें दृश्य पाहून चकित होतो. यांतील रतिक्रीडेंत अनपेक्षित आलेला तो गोड अडथळा त्यांना विस्मयचकित करतो.

वसन्तवैभव हा भावगीतसंग्रह सुद्धा अेकरीतीने सौन्दर्यासक्त कविमनाची रमणीयताशोधनाची धडपडच ध्वनित करतो. पण कल्पना आणि रचना यांच्या दृष्टीने मात्र हा ग्रंथ 'रविकिरणमंडळा'च्या सदस्यांच्या पिढीचें अनुकरण करणारा आहे. यांतील आनंद केवळ कलानंद नसून सुंदरतेने तरळविलेल्या भावतरंगाचा आहे. विषयांच्या निवडीपासून त्यांच्या लेखनशैलीपर्यंत सर्व गोष्टींत श्री. यशवंत, गिरीश, माधव जूलियन यांची छाया संग्रहावर फार दाट पडली आहे. मात्र कवींचें मन विकास, भरारी, क्रान्ति यांसाठी झगडा करीत असलेलें पाहून त्यांच्या भावी प्रस्थानाचा मार्ग त्यांना अचूक मिळाला आहे असेंच वाटतें. अशा तळमळींत लिहिलेल्या कविता ओजस्वी आहेत. आणि त्या बहुतेक श्री. माधव जूलियन यांच्या वळणावर जातांना दिसतात. "–रे, अजून नाहीं– !" ही कविता या लढाअू, झुंजार वृत्तीची द्योतक आहे. "तारे अंधुकले," "कीं, आराम बंदी," "दार खुलें केलें–," "सौख्यासाठी आअीच्या," "कलावन्त" आणि विशेषतः "बंदिवान गरुड–!" यांतील क्रांतिप्रवणता, स्वातंत्र्यलालसा, त्यागवृत्ति, समतादृष्टि आणि शेवटच्यांतील तीव्र लागणी यांवरून कवींतील काव्यशक्ति सुसंस्कृत झाली असून, आता तिने प्रयोगशाळेच्या बाहेर येअून आपल्या कमनीय विलासांनी वाचकांची सौंदर्याची भूक भागविण्याचा सर्वस्वतंत्र प्रयत्न करणें अगत्याचें वाटतें. त्याला लागणारी सहृदय भावना, अनुरूप कल्पना आणि निर्दोष रचना कवीने आत्मसात् केलेल्या याच संग्रहांत दिसतात. यासाठी दिवंगत मित्राला अुद्देशून लिहिलेल्या कविता आणि प्रणयिनीला लिहिलेल्या "साफल्य," "होअून धुन्द," ज्योत्स्नागीत," ह्या कविता नमुनेदार वाटतात.

शरयू पण नव्या पिढीचाच द्योतक ग्रंथ आहे. पण ही आहे अेक भावकथा. शरयू

म्हणजे अेक 'अभागी कमल !' माणूस जर डोळस, कानस आणि कनवाळू असेल तर त्याला स्वतःच्या समाजांत कितितरी शरयू दिसतील. संकुचित वातावरण, जीवनकलहांत टिकण्याची असमर्थता, भंवतालच्या लोकांची अुदासीन वृत्ति यांनी शरयूसारख्या बालवती विधवेला असहाय दशेंत किती यातना सहन कराव्या लागल्या असतील !! घरीं अेक 'थेरडा मांग' सासरा, त्याची पापदृष्टि आहे मृत पुत्राच्या अबला विधवेच्या शरीरावर !! ठराविक ठशाच्या या कथेंत जर स्वतंत्र स्पर्श कुठे असेल तर येथेच. त्या वेळचें वर्णनहि (प्रसंग पहिला, ५८ ते ६४) सुंदर साधलें आहे.

रात चांदणी होती, होता मन्दानिल वाहत
कधीं टिवटिवी शब्दे, झुळझुळ दुरची कधिं क्षुमटत ! ५८
चांद डोअिहुन जरा कलथला, कलकल झाडावरी,
डळमळली तों सये साअुली घसकन झालें अुरी ! ६१

टिवटिवीचा टिक् टिक् शब्द वातावरण गंभीर करतो तोंच 'साअुली' दिसते, ती अर्थातच त्या थेरड्याची अंथरुणावर बसूं पाहणारी आकृति होती !! पुढील सर्व कथा कायम ठशाची आहे. शरयूचें पाअूल वाकडें पडतें; ती बाळ मधूला सोडून जाते आणि शेवटीं आपत्तींनी रंजली-गांजली शरयू वेश्यावृत्ति स्वीकारिते. तरीपण तिचें मधु बाळावरील प्रेम नि मूळची पापभीरू वृत्ति यांमुळे अेक दिवस ती कुठेतरी दूर दूर जाते.

अशा रीतीने आपण पाहिलें, की कथानकांत नवीनपणा नाही. आणि कथेच्या विकासाच्या बाबतींत कित्येक वेळां वाचक भांबावतो. छपाअी चांगली आहे; पण संवाद अनेक असून अवतरणचिन्हेंच न वापरल्यामुळे सूत्र ध्यानांत येणें अवघड जातें. तसेंच या साध्या कथानकाला अुठावदारपणा आणणारे चमत्कृतिमय प्रसंग नाहींत, आणि भावनांचा खळबळाट अुडवीत, हृदयाला झटके देत जाणारें कवीचें परमोत्कट व्यक्तित्वहि त्यामागे नाही.

अेक विशेष मात्र अति हृदयंगम आहे. तो म्हणजे कवीची ओघवती पद्यरचना. वृत्तें साधींच — क्वचित् चंद्रकान्त नि बहुधा सूर्यकान्त जाति योजल्या आहेत. भाषाशैलीहि साधीच आणि आंतील अुपमा-रूपकादि अलंकारहि आहेत घरगुती जीवनांतले. पण जिव्हाळा अतिशय असल्यामुळे कांही भाग फारच छान वाटतात; विशेषतः वर्णनात्मक भाग समाधान करणारे आहेत. प्रसंग २ रा : २९ ते ३३ कवितांतील संध्याकालचें वर्णन; प्रसंग ५ वा : ११८ ते १२० मधील दुपारचें वर्णन; सहावा सबंध प्रसंग नि विशेषतः रानाचें सुंदर हळुवार वर्णन; प्रसंग ९ वा मधील पावसाचें वर्णन (१ तें ३ कविता); आणि दहाव्या प्रसंगाच्या अन्तींच्या चार कविता हे अुत्तम भाग आहेत. कांही ओळी हृदयंगम आहेत— पान २, १३ व १८ कविता; पान ७ मधील १०; पान २९ कविता २८; पान १७ कविता २०; पान १९ कविता ४५, ५०; काव्यान्तर्गत दोन भावगीतांतील पान ४५ मधील 'बोलत होते देव' अित्यादि गीत भावमधुर आहे.

तेव्हा या काव्यासंबंधी शेवटची सूचना ही करावीशी वाटते, की कवींनी आता विषयाची निवड अधिक अुत्तम करून आंतील अनुकरणवृत्ति सोडून द्यावी. कारण कळत नकळत पण या त्यांच्या खंडकाव्यांत आणि 'आंबराई', 'अभागी कमल' या श्री. गिरीशांच्या काव्यांत शैली आणि कथानक यांचें साधर्म्य फार आहे. अेवढें केल्यास आणि कल्पनांची विशालता दाखविल्यास 'काळासारख्या निःपक्षपाती रसिका'साठी त्यांना ताटकळत बसावें लागणार नाहीं; रसिक आपण होअूनच त्यांच्या भेटीस येतील.

कादंबरी

(१) मयसभा [ले. श्री. ज. अ. नरवणे; प्र. सुरस ग्रंथमाला]

(२) सर्वस्व [ले. श्री. द. ब. मुद्गल, साहित्यसेवामंडळ, सोलापूर]

"... सिनेमा ही मयसभा आहे. ती आपल्या सौन्दर्याने लोकांना आकर्षित करते. पण मयसभेप्रमाणे तेथें गेल्यावर प्रत्येकजण अडखळतो, फशीं पडतो व कधीं कधीं नाशही पावतो" (पृ. ३८). प्रमिलाताअींच्या या शब्दांत मयसभा या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना केन्द्रित झाली आहे. तिची आवडती मैत्रिण अुषा प्रथम चित्रपटांत काम करावयास तयार नसते, पण प्रेमळ पतीच्या भ्रामक ध्येयवादामुळे ती शेवटीं सिनेमांत जाते, शील-रक्षणाचा खूप प्रयत्न करते आणि तें अशक्य झाल्यामुळे जीव देते. कादंबरींत दुसरें अेक तरुण जोडपें आहे. रमेश आणि पूर्णेन्दु (म्हणजेच मीना). यांचें जीवन मोठें रम्याद्भुत आहे. कादंबरींतील बरेचसे प्रसंग ब्रह्म, काश्मीर अशा दूरच्या नवीन प्रांतांत घडत आहेत. तरी पण या नावीन्याचा अुपयोग कादंबरीला मोहकपणा आणण्याकडे लेखक करून घेअूं शकले नाहीत. अुषेच्या करुणकथेला काश्मीरची पार्श्वभूमि ! अशा विरळ कल्पनेचा अुपयोग भव्योदात्त वातावरण निर्माण करण्याकडे करणें आवश्यक होतें. हार्डीच्या टेस्वरहि अशाच अेका अरण्यांत बलात्कार केला जातो. पण हार्डीच्या प्रतिभेने त्याचा किती अुत्कृष्ट अुपयोग केला आहे ! कादंबरींतील प्रकरण ५ 'मयसभेतील मागणी' आणि प्र. ६ 'साम्यवाद' हीं चर्चेच्या दृष्टीने ठीक आहेत. पण ही चर्चा कथेशीं अेकरूप होत नाही. अेकंदरींत कादंबरी वाचावीशी वाटते.

पण सर्वस्व या कादंबरींत कांहीच स्वारस्य वाटत नाही. खडबडीतपणा हा फक्त भाषेतच नाही, तर कथानकाच्या अन्तर्विकासांतहि आहे. व्यक्तिदर्शन विशेष मनांत भरण्यासारखें नाही, आणि तें कायम ठशाचेंहि आहे. कादंबरीला श्री. खांडेकरांचा आशीर्वाद आहे. पण श्री. खांडेकरांनी अभिप्राय लिहिण्यापूर्वी या लेखकांचें 'स्वतः—' वाचलें नाहीसें दिसतें. नाही तर खेडेगांवांतील अुत्कट प्रसंगांवरून तेजस्वी कलानिर्मिति करणाऱ्या त्यांनी पुढील विधानांसारखीं विधानें कशीं करूं दिलीं असतीं ! — 'मध्यमप्रतीच्या लोकांच्या ... आयुष्य रेखाटण्यांत सदासर्वदा अुदात्त, पवित्र, अुच्च, वगैरे गुण अपेक्षिणें व्यर्थ नाही काय ? कारण त्यांचा जीवनकलहच तितका खडतर असतो !'

लघुकथा

नवें जहाज [ले. श्री. ना. के. शिरोडकर, ११ समिट बिल्डिंग, फॉर्जेट स्ट्रीट, मुंबअी ७]

लेखकाच्या या नव्या जहाजांतील माल पुरोगामी आहे, तरी पण जहाज हाकारण्यांत बराच नवशिकेपणा दिसतो आहे. आंतील १४ कथांतील १,४,५,८,९,१०,१४ हीं खरोखर शब्दचित्रें आहेत. पैकी 'महात्माजी, तुमची बरं ही पुण्याअी' (४), 'तयार ठेवलेलें अुत्तर' (७), 'वावटळींतील वृक्ष' (१०) हीं चांगलीं आहेत. 'वृत्तिपालट'मध्ये खांडेकरी काव्यमय रूपककथेचा प्रयत्न असून तो अयशस्वी झाला आहे. लघुकथा म्हणून 'शांघायवरील हल्ल्यांत' (२), 'रातराणी आणि माकड' (११) या मात्र अुत्तम आहेत. 'मधला पूल' हींतहि व्यक्तीच्या मनाची पार्श्वभूमि अुत्तम रेखाटली आहे. 'कर्तव्य, पण किती कठोर' (६) ह्यांतील मुख्य व्यक्ति गिब्रलसाहेब यांचें स्वभावदर्शन अगदीच वरवरचें आहे; म्हणून चांगल्या घटनांचा अुठावदार अुपयोग लेखकाला करतां आला नाही. 'टाळलेला मार्ग' (३)

हें शब्दचित्र तर अपुरेंच वाटतें. अेकंदरींत तंत्रदृष्ट्या हा संग्रह साधारण बरा आहे. अजून लेखकाने लघुकथेंतील केन्द्रवत्ता, द्वन्द्वें, विस्मय अित्यादींचा अुत्कट अुपयोग आत्मसात् केलेला नाही. भाषा तर फारच अुथळ आहे. वाक्यांची अुलटीपालटी रचना (Inverted Sentences) पदोपदीं ओघभंग करते; तसेंच शैलींतील तुटकपणा अभ्यासाने घालविणें अवश्य आहे.

नाटक

आठवणीचा खंदक [ले. श्री.र.गो.टेंबे; प्र.महाराष्ट्र नाट्य मंदिर, नासिक. कि. ४ आणे]

मूळ जर्मन भाषेंतील फॉन् कोठ् झेबू या लेखकाच्या अेका प्रहसनाचें हें सुंदर रूपान्तर आहे. गोकुळछाप विसरभोळेपणावर अुभारलेलें हें नाटक वाचून प्रो. काळे यांच्या 'विक्षिप्तराव' या अतियशस्वी रूपान्तरित प्रहसनाची आठवण होते. हें नाटक रंगभूमीवर नक्की अुत्तम वठलें असणारच.

संकीर्ण

(१) मराठी नाट्यछटा [टीकात्मक प्रबन्ध (द्वितीयावृत्ति) : ले. प्रा. शं. के. कानेटकर]

प्रस्तुत प्रबन्धाच्या प्रथमावृत्तीच्या परीक्षणांत आम्हीं पुढीलप्रमाणे सूचना केली होती "श्री. दिवाकरांतील नाट्यतत्त्वाची चर्चा खोल हवी होती." त्याप्रमाणे या आवृत्तींत अेक प्रकरण वाढविलें आहे, आणि त्यांत आमच्या दुसऱ्या सूचनेप्रमाणे 'कारकून' आदि नाटिकांची चर्चाहि केलेली आहे. तरी पण अजूनहि, पद्याअैवजीं गद्य स्वीकारल्यामुळे काय विशेष घडलें ! हा प्रश्न अचर्चितच राहतो. लयबद्ध पद्यामुळे ब्राअुनिंगच्या नाट्यमय अेकोक्तींतून वा भाव-गीतांतून भाव-विचार-कल्पनांना अनुरूप अशीं आन्दोलनें, गतिमय विकास हीं प्रकर्षाने साधलेलीं आहेत. असो. सुदैवाने हा दुसऱ्या आवृत्तीचा योग येअून कांही आवश्यक सुधारणा झाल्या हें बरें झालें. अर्थात् त्या श्रेयाचा अपहार 'पत्रिका' करूं अिच्छीत नाही कारण 'पत्रिकें'तील सूचनांवरून सुधारणा झाली असती तर तसा अुल्लेख या आवृत्तींतील 'अुपसंहारां'त अितरांच्या अुल्लेखासंगें केला गेला असता.

(२) पुढें काय ? [पत्रसंग्रह : ले. श्री. र. भिडे, फर्ग्युसन् कॉलेज, पुणें]

या चिमुकल्या पुस्तिकेंत पांच पत्रें आहेत. पैकी वैयक्तिक पत्र फक्त पांचवें असून राहिलेलीं चार स्त्रीशिक्षण या विषयावरील चर्चेस दिलीं आहेत. या पत्रांना ललित साहित्य-प्रकार म्हणून मुळीच महत्त्व नाही. आणि आंतील चर्चेंतहि बहीण मीरेला पत्रें लिहिणारा हा भाअू 'कुमार' बहुधा पुरुषांची बाजू घेअून स्त्रियांचें अुणेपण, त्यांचे स्वभावदोष रंगवितांना आढळतो. पत्रें प्रत्यक्ष लिहिलेलीं असतील तर त्यांच्यावरील बहिणीचीं अुत्तरेंहि वाचणें आव-श्यक आहे. कांही ठिकाणीं लेखकाची अलंकारिक पद्धति सदोष वाटते. पुरुष हा वृक्षशाखा नि स्त्री तीवरील बांडगूळ असें रूपक करण्यांत आपण जीवशास्त्रांतील सिद्धान्तावरच घाव घालीत आहों हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं (पत्र १). निसर्गाच्या दृष्टीने दोघांना सारखेंच महत्त्व आहे. स्त्रीची भोग्यता (Passivity) आणि पुरुषाची भोक्तृता (Activity) यांचा अुपयोग चर्चेंत जरी स्त्रीयोनीविरुद्ध झाला, तरी संततिवहनाला अधिक अुपयुक्त स्त्री असल्या-मुळे आणि सापेक्षतः पुरुष नालायक असल्यामुळे निसर्गाच्या दृष्टीने तरी स्त्रीच अधिक मह-त्त्वाची : बातच अधिक महत्त्वाची, तूप नव्हे (पत्र ३). आणखी आजच्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेंत (Patriarchal Society) स्त्रीला फक्त 'नवऱ्याची बायको' म्हणूनच रहावें लागलें (पत्र ४) तरी स्त्रीने 'पोटाच्या मागें' लागूंच नये म्हणणें अतिरेकाचें आहे.

कर्तव्याची भाषा दोन्ही पक्षांना लागू आहे. शिक्षणामुळे अनिष्ट स्वातंत्र्य वाढतें (पत्र २) हें जरी खरें असलें तरी तें पुरुषशिक्षणानेहि वाढतें, केवळ स्त्रीशिक्षणाने नव्हे. असो. अेकंदर चर्चेत श्री. भिडे यांनी साधकबाधक विचार केलेला आहे. मात्र त्यांचें मत पुरुषप्राधान्याकडे झुकतें अेवढेंच.

ना. ग. जोशी

महात्मा कीं मोहात्मा

[अनुवादक वि. वि. दीक्षित, अेम्. अे.; प्रका. : गोविंद वामन कुलकर्णी, कोल्हापूर; किं. २॥ रु.]

सुप्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार अनातोल फ्रान्स याच्या 'तअीस' या कादंबरीचा हा अनुवाद रा. दीक्षित यांनी महाराष्ट्रांतील रसिकांस सादर केला आहे. मूळ ग्रंथकाराने दिलेलें 'तअीस' हें व्यक्तिवाचक नामाभिधान काढून; त्याअैवजी रा. दीक्षित यांनी ग्रंथाला 'महात्मा कीं मोहात्मा' हें विषयनिदर्शक नांव दिलेलें आहे. मूळ ग्रंथकाराने व्यक्तिवाचक नांव देअून बदफैली तअीसची धार्मिक शिस्तीने आध्यात्मिक अुन्नति कशी होत गेली या विषयाला प्राधान्य दिलेलें आहे, तर नामाभिधान बदलून रा. दीक्षित यांनी हठयोगाच्या शिस्तींत असूनहि, पफनुसची आध्यात्मिक अधोगति कशी होत गेली या विषयाला प्राधान्य दिलेलें आहे. तअीसची अुन्नति आणि पफनुसची अधोगति, हीं दोनहि अेकाच गुणसमुच्चयाचीं कार्यें असल्याकारणाने परस्परावलंबी आहेत, म्हणून अेक कोणतें तरी प्रधान आणि दुसरें गौण मानण्याला मुळींच हरकत नाही, तरी देखील कल्याणाभिलाषी लेखकाने शक्य तर, कलाहानि होत नसल्यास, अुन्नतीलाच प्राधान्य देणें बरें असेंच कोणीहि म्हणेल.

ग्रंथाला कथानक असें फारसें नाहीच. तअीस नांवाची अेक सुंदरी मुलगी आअीच्या जाचाने घरून निघून गेली असतां अेका वृद्ध वेश्येच्या हातीं सांपडते. ती वेश्या तिला नृत्यगायनादि कलांत तरबेज बनविते. ती मुलगी धनाढ्य अशी पण्यस्त्री बनते. त्या वेश्येचा जीवनमार्ग गर्हणीय समजून, तिला त्यांतून काढून धार्मिक मार्गाकडे लावण्याचा प्रयत्न, पफनुस नांवाचा हठयोगी करतो. परंतु तो बाह्यतः जरी हें धार्मिक कार्य करावयास म्हणून सज्ज झाला असला, तरी त्याच्या अंतर्मनांतील गूढ हेतु, त्याच्या तिच्याबद्दलच्या अतृप्त कामवासना याच असतात. असें असल्याकारणाने ती जरी प्रवृत्तींतून निवृत्तिमार्गात जाते, तरी गुरु मात्र निवृत्तिमार्ग विसरून शेवटीं पिशाच बनतो.

या विरोधदर्शक कथानकाच्या भोवती ग्रंथकाराने तत्कालीन— म्हणजे प्राचीन संस्कृतीचा अस्तकाल आणि नवोदित खिस्ती संस्कृतीचा अुषःकाल या कालांतील— समाजरचना, चाली रीती, अपसमजुती यांबद्दलचें चित्र रेखाटलें आहे. त्यामध्ये नवोदित खिस्ती धर्माच्या प्रसारा करता कष्ट सहन करणारे धर्मवीर आहेत, प्राचीन संस्कृतीचा नाश होणार म्हणून हळहळणारे सनातनी आहेत, देवदेवताविशिष्ट धर्म नष्ट होणार म्हणून विमनस्क होणारे अुपाध्याय आहेत, जगत् हें नश्वर आहे म्हणून भोग अगर त्याग, सुख अगर दुःख, जें कांही भोगणें प्राप्त असेल तें निर्लेप अंतःकरणाने ग्रहण करून (प्राप्तं प्राप्तं अुपासीत हृदयेनापराजितः |) जगाबद्दल निरिच्छ राहणारे तत्त्ववेत्तेहि पण आहेत. परंतु चंचल वृत्तीच्या मनुष्यप्राण्याच्या अितिहासांत, असा कोणता काळ अगर कोणतें स्थळ दाखवितां येअील, की त्या काळीं या सर्व चिजा अस्तित्वांत नव्हत्या?

परंतु मूळ कादंबरीच्या कल्पनेची अगर तीमध्ये रेखाटलेल्या चालीरीतींची अगर तत्त्वज्ञानाची चर्चा करावयाची, तर त्या चर्चेचा संबंध अनुवादकाकडे मुळीच येत नाही. मूळ ग्रंथकार नामवन्त आहे. त्याने तत्कालीन प्रचलित असलेल्या म्हणून ज्या तत्त्वप्रणाली ग्रंथांत मांडल्या आहेत, त्यांतील अेकअेकटीच अुचलून घेतल्यास ती प्रणाली चूक आहे, असें म्हणण्याचें मुळीच कारण नाही.

अगदी ग्रंथकाराच्या मताने हीन ठरलेला पफनुसचा हठयोगाचा, देहदंडाचा मार्गच घेअूं. त्या तपोभूमींत हठयोगाचा मार्ग अवलंबणारा अेकटा पफनुसच का होता ! हठयोगाचा मार्गच सदोष असल्यास अितर व्यक्तींवर तसाच परिणाम झाला पाहिजे. परंतु तसा परिणाम होअून तपोभूमि अुध्वस्त झाल्याचें तर ग्रंथकार कोठेच दाखवीत नाही. त्यामुळें मार्ग कोणतेच सदोष नसतात, व्यक्तींना आपल्या अंतर्गत आध्यात्मिक अुन्नतीला पोषक असा मार्ग निवडतां येतो, असें अनुमान फारच झालें तर काढतां येअील.

कोणत्याहि कालची समाजस्थिति ही मुख्यतः त्या कालच्या राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक कल्पनांचा परिपाक असते. त्यांपैकी पहिल्या दोहोंचा ग्रंथकाराने परामर्श घेतलेला आहे. अेकंदरीने मूळ ग्रंथकार चांगला असल्याकारणाने विषयाच्या दृष्टीने ग्रंथ अत्यंत वाचनीय आहे.

आता अनुवादाच्या दृष्टीने पाहावयाचें, तर मुख्यतः भाषेचें औचित्य, पदशुद्धि, वाक्यशुद्धि अित्यादि दृष्टींनी विचार करावयास हवा. विषयाचें गांभीर्य लक्षांत घेअून अनुवादकाने भाषाशैलीहि पण अनुरूप ठेविली आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे. शांत असो वा शृंगार असो रसाला अुचित असें गांभीर्य वा पदलालित्य ठिकठिकाणीं दृष्टीस पडतें. तसेंच अलीकडल्या साहित्यांत न कळत शिरूं लागलेला व्याकरणदृष्ट्या अशुद्धतेचा दोष या ग्रंथांत अभावाने प्रतीत होतो.

या परीक्षणाच्या निमित्ताने अलीकडील वाङ्मयांत शिरूं पाहाणारा अेक ढोबळ दोष रसिकांच्या पुढे मांडतों. पदांचे जे वाच्य, लक्ष्य, व्यंग अशा प्रकारचे अर्थ असतात, ते कांही आकाशांतून पडत नाहीत. त्यांच्यामागे देखील कांही मानसिक प्रक्रिया असते. त्यामुळे वैयक्तिक लेखकाचें स्वातंत्र्य कबूल करूनहि, शब्दांच्या अर्थांचे काय हाल चाललेले आहेत तें प्रत्यक्ष अेक दोन अुदाहरणें घेअून दाखवितों. ‘बौद्धिक बाबतींत निसिअसच्या पासंगालाहि पुरणारी ती नव्हती. ग्रीक वेश्यांप्रमाणे तिच्या बुद्धीला अुच्च संस्कारांचा लाभ झालेला नव्हता. अर्थात् तिच्यापुढे निसिअसचें पांडित्य निष्प्रभ ठरणें स्वाभाविक होतें’ पा. १११ या अुताऱ्यांतील निष्प्रभ हें पद घ्या. कोणत्याहि जास्त प्रभायुक्त वस्तूपुढे अेखादी प्रभा फिकी पडणें स्वाभाविक आहे परंतु तेजोहीनापुढे कसलीहि प्रभा निष्प्रभ कशी ठरणार ! परंतु आधुनिक साहित्याच्या नवमतवादी नियमाने पदें किंवा वाक्यें अगदी तोलून लिहिलींच पाहिजे, असें थोडेंच आहे ! ‘कारण विचार, सहवास आणि अंगांगीभाव यांचा नैसर्गिक परिणाम मनावर होणारच’ (पा. २२४) संदर्भावरून असें वाटतें की ‘अंगांगीभाव’ या पदाचा दोन शरिरांचा गाढ स्पर्श असा अर्थ ग्रंथकाराला अभिप्रेत आहे. परंतु अंगांगीभाव या पदाचा तसा अर्थ कोठेहि होत नाही अगर लाखूनहि दाखवितां येत नाही. अंग आणि अंगी हीं अयुतसिद्ध Correlatives) पदें आहेत. अंगी म्हणजे चेतन शरीर आणि अंग म्हणजे त्याचें कार्यकर्तें अिंद्रिय. आणि अंगांगीभाव म्हणजे ही परस्परसापेक्षता अगर पोष्यपोषक भाव. असो. हें सर्वसाधारण मराठी वाङ्मयांत काय चाललें आहे या दृष्टीने सांगितलें. अनुवादकांनी ग्रंथ काळजीपूर्वक लिहिला असल्याकारणाने त्यांमध्ये अशीं फारच थोडीं स्थळें आहेत.

अेकंदरीने मूळ ग्रंथकार थोर. त्याने चित्रणाकरिता घेतलेला विषय गंभीर. तो ज्यांनीं अनुवाद करण्याकरता घेतलेला ते लेखक काळजीपूर्वक लिहिणारे. भाषा विषयाला आणि रसाला अुचित. व्याकरणाकडे लक्ष देअून लिहिलेलीं वाक्यें, पदपदार्थरचना निर्दोष आणि सरळ अशा तऱ्हेचा हा ग्रंथ आहे. अशा तऱ्हेच्या ग्रंथाची मराठी वाङ्मयांत भर घातल्या-बद्दल अनुवादक व प्रकाशक हे अभिनंदनास पात्र आहेत.

गो. म. जोशी

जीवन-स्वर

[लेखक: य. ग. वझे, बी. अे., अेल् अेल्. बी.; प्रकाशक: य. गो. जोशी, ६२३/१५ सदाशिव, पुणें २; किं. १ रु.]

रा. रा. यशवंत गणेश वझे, बी. अे., अेल्अेल्. बी., यांचें हें लघुकथांचें पुस्तक वाचून फारच आनंद झाला. जीवन-स्वर, अुन्माद, दुर्दैवी दैवत, कवि आणि व्यवहार या चार गोष्टी मात्र अगदी बेताच्या आहेत. जीवन-स्वर या गोष्टींत स्वर फारच कष्टाने लागला आहे असें वाटतें. अितकेंच काय लागला आहे कीं नाही याविषयींसुद्धा शंका आहे. विकल्प किंवा विरोध हीं नसतांना आणि प्रेमकल्पना अुभयपक्षीं सिद्ध झाली असतांना पुढे तिच्या विकसनाची सूक्ष्म खटपट चालू ठेविल्याने गोष्टीला रंग भरत नाही व शिवाय 'होय ना,' 'खरेच की,' 'पण कुठे,' अशांसारख्या अेकशब्दी वाक्यांच्या संवादाने अभिप्रेत रस वाचकाच्या मनांत घसघशीतपणें भरत नाही. अगदी स्वाभाविक, स्वाभाविक असें जरी म्हटलें तरी नाटक, कादंबरी, गोष्ट यांत जसले संवाद असतात हुबेहूब तसलेच संवाद आपल्या नेहमीच्या जीवितांत प्रणयी माणसेंसुद्धा करतात असें वाटत नाही. वाङ्मयांत थोडेंसें कृत्रिम असतेंच. तेवढ्या कृत्रिमाचा आश्रय या तोटक्या अेकशब्दी वाक्यांच्या अैवजी केला असता तर रसाची परिस्फुटता व्हावयास थोडें रुंद पात्र मिळालें असतें. हें न झाल्यामुळे गोष्ट अगदी कुचंबल्या-सारखी झाली आहे. दुर्दैवाने हीच गोष्ट पहिली असल्यामुळे तिचेंच नांव पुस्तकाला मिळालेलें आहे. या पुस्तकाचें नांव 'अभिमान' असें असावयास हवें होतें. या सूचनेचें यथार्थत्व पुढे ध्यानांत येअील. 'कवि आणि व्यवहार' या कथेंत सत्यपणाचा भाग पुष्कळ असला तरी चमत्कृति थोडी असल्यामुळे ही गोष्टहि विशेष ध्यानांत राहत नाही. 'अुन्माद' या गोष्टींत कॉलेजमध्ये घडलेल्या अेका प्रकाराचें रा. वझे यांनी जें चित्र दिलेलें आहे तें सामान्यपणें बरोबर आहे अितकेंच. त्या प्रसंगीं जो बनाव घडून आला त्यांतील स्थानिक खाचाखोंचा रा. वझे यांच्या माहितींतल्या नव्हत्या. कुणाची तरी मस्ती चालते आणि कुणाला तरी लाथ लागते असा प्रकार पुष्कळदा होतो. कॉलेजांतहि अेक स्थानिक राजकारण असतेंच! कोणत्या तरी कारणाने प्रस्थापित झालेले तट असतातच. आणि मग ते भलत्याच प्रसंगाला हमरी-तुमरीला येतात, त्यांची टक्कर होते आणि बिचाऱ्या अध्यक्षाचा बगीचा नासून जातो! मात्र यानंतर गोष्टींतल्या पालकाने आपल्या चिरंजीवाचे जे कान अुपटले आहेत तें अगदी बरोबर आहे. हॉटेलांतील बीअर आणि खोलींतल्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले सिगारेटसचे पुडे अिकडे रा. वझे यांनी वाचकांचें लक्ष वेधविलें ही फार चांगली गोष्ट केली. गोष्ट म्हणून ही जरी

बेतांचीच असली, तरी सामाजिक दुखणें सांगण्याची तिच्यांतील निर्भयता ही वझे यांना भूषणास्पद आहे. मागे अेकदा प्रि. राजवाडे हे कॉलेजच्या मुलांच्या खर्चावर टीका करतांना म्हणाले होते, 'पैसा म्हणजे बापाचा माल, वाटेल तसा खर्च करावा !' प्रि. राजवाडे यांनी दिलेला हा वाधाड़ा समाजांतल्या जबाबदार माणसांनी जर पुन्हा पुन्हा दिला तर जीं मुलें या बाबतींत बहकत जातात तीं थोडींतरी शुद्धीवर राहतील. मात्र कॉलेजांतील सगळींच मुलें बहकत जातात असा जर कुणाचा समज असला तर तो अगदी चुकीचा आहे.

दुर्दैवी दैवत ही गोष्ट चमत्कृति आणि आकर्षण या बाबतींत अगदीच लुली आहे; कारण त्या गोष्टीच्या कथानकांत अनपेक्षित असें कांहीच नाही. पण रा. वझे यांनी ती लिहिली या बाबीला मात्र फारच महत्त्व आहे. ही गोष्ट लिहिल्याबद्दल वझे यांना मोठीच किंमत द्यावी लागेल. शिक्षणक्रम संपल्यापासून अनेक वर्षेंपर्यंत रा. वझे हे सिनेमाच्या धंद्यांत होते. आणि तेथील ओंगळ वातावरणांतून बाहेर पडणें अवश्य आहे असें वाटूं लागल्यानंतर मोठेंच धैर्य धरून ते बाहेर पडले. त्या ठिकाणीं त्यांना जें जें कांही दिसून आलें त्यांतलाच अेक चुटका 'दुर्दैवी दैवत' या गोष्टीच्या रूपाने त्यांनी सांगितला आहे. कुलीन स्त्रिया आणि सिनेमा यांसंबंधाने कोणी बोलूं लागल्याबरोबर डोळे फाडून आणि कावरेबावरे होअून समाजाकडे पाहणारे कलावंत, वझे यांनी केलेला हा गौप्य स्फोट पाहून, त्यांना आता फाडून खाल्ल्यावांचून राहणार नाहीत. आता कलावाले आणि अनुभववाले यांची या कुलीनत्वाच्या मुद्यावर कशी काय झुंज चालते हें पाहण्यासारखें आहे. वास्तविक पाहतां याच्या आधीसुद्धा ज्यांना स्वतःच्या बाबतींत किंवा अितरांच्या बाबतींत प्रत्यक्ष अनुभव आले त्यांनी 'कुलीन स्त्रियांनी या धंद्यांत शिरूं नये' असें स्वच्छ मत दिलें आहे. पण त्यांच्या अिशाऱ्याकडे जावें तितकें लोकांचें लक्ष अजूनहि गेलेलें नाही. आता सिनेमाच्या धंद्यांतून, सगळीं मर्में लक्षांत आल्यानंतर, बाहेर पडलेले रा. वझे यांनी हा स्फोट केलेला पाहून तरी समाजाला शिव्या देणारे धंदार्थी कलावाले काय म्हणतात तें पाहावें. या गोष्टींत सत्य किती आणि वाङ्मयविलास किती हाहि प्रश्न रा. वझे यांस मुद्दामच विचारला. त्यांनी स्वच्छ सांगितलें की "या गोष्टींत सांगितलेलें सगळें सत्यच आहे. पोकळ वाङ्मयविलास कसलाहि नाही." या गोष्टीला वाङ्मयांत कोणतेंहि स्थान मिळो, पण समाजविचारांत मात्र हिचें स्थान निःसंशय अुंच आहे. आणि म्हणून ही लिहिण्याचें धैर्य दाखविल्याबद्दल मी रा. वझे यांचें अभिनंदन करतों.

अुरलेल्या तीन गोष्टी मात्र गोष्टी म्हणून सुद्धा फारच सुंदर आहेत. 'विचाराचें पातक' यांतील बारीकसारीक सगळेंच्या सगळें मर्म पहिल्या वाचनाला माझ्या ध्यानांत आलें नाही. पण त्यांतील नायकाने केलेलीं संवादांतील ठाशीव भाषणें आणि नवा वाटणारा विचारमुद्दा न चाचरतांना नेहमीच्या परिपाठांतील असल्यासारखा सांगणें यामुळे ही गोष्ट चांगली वाचनीय झाली आहे. हिच्याहून जास्त सरस गोष्ट म्हणजे 'नवी दृष्टि' ही होय. मधूने आपल्या अवखळ बहिणीला प्राप्त करून दिलेली ही नवी दृष्टि, आणि गोपाळरावांचें या बाबतींतील सुधीर वर्तन हीं पाहिलीं म्हणजे नवे संसार न विसकटूं देण्याची कला शहाण्या माणसांना कशी लाभलेली असते हें अुत्तम दिसून येतें. मधूने आपल्या बहिणीचें आणि गोपाळाने आपल्या बायकोचें पोरपण जर लक्षांत घेतलें नसतें आणि अटीतटीस पेटून तिचा अुगाच निषेध केला असता, किंवा तिला छळलें असतें, तर गोपाळाचा संसार खासच अुधळला असता. आणि सामान्य कथालेखकाने शोकपर्यवसानाची हौस बाळगून तशीच कथा लिहिली असती. पण रा. वझे यांनी सत्प्रवृत्ति आणि सदभिरुचि यांच्या बळावर संसाराची घडी थोडी विसकटूं लागली तरी

पुन्हा चांगली बसवितां येते हें दाखवून देण्याचें काम फारच कुशलतेने केलेलें आहे. मात्र या गोष्टीचें शेवटचें वाक्य माझ्या मतें खोडून टाकावें.

पण या पुस्तकाचा खरा अलंकार म्हणजे 'अभिमान' ही गोष्ट होय. माझें लघुकथांचें वाचन मर्यादितच आहे. आणि म्हणून मोठें अफाट विधान मला करतां यावयाचें नाही. पण ही गोष्ट वाचल्यावर जयंत साने हा अेक नवा मनुष्य आपल्याला भेटला असें मला वाटूं लागलें. बहुधा असें होतें की वाङ्मयलेखकाच्या हाताच्या पहिल्या चारपांच लपेटी पाहिल्या म्हणजे पुढे काय कथानक असेल आणि हा कसल्या बाहुल्या निर्माण करणार आहे, हें ध्यानांत येतें. आणि म्हणून वाङ्मयांत भेटणारे स्त्री-पुरुष आपल्या आगाअूच ओळखीचे झालेले असतात. जयंत साने हा मात्र अगदी रेखीव, नीटस, प्रत्येक वाक्याला मनांत जास्त जास्त भरत जाणारा, ज्याची ओळख जास्त जास्त व्हावीशी वाटते असा थोडासा राकट प्रवृत्तीचा तरुण मनुष्य, अगदी नवा असल्यासारखा वाटतो. नायिका माणिक ही सुद्धा त्याच्या नवेपणाचा पोष होत जाअील अशा थाटाची मुलगी आहे. माधवराव हाहि अेक स्वतंत्र नमुना आहे. आणि वहिनी तर नेहमीच्या वळणांतल्या असल्या तरी, गुंतागुंतीच्या प्रसंगांत अितक्या नेमक्या वेळीं पुढे येतात आणि अितकी सुंदर कामगिरी बजावतात की त्यांच्या त्या समजुतीच्या गोष्टी वाचून वाचकाची वृत्ति अुत्फुल्ल होअून जाते. 'अभिमान' ही गोष्ट मनांत अुत्पन्न झालेल्या आराखड्याच्या रूपानेच नव्हे तर अगदी बारिकसारिक तपशिलापर्यंत सुद्धा, यथायोग्य आणि यथाप्रमाण अशी झालेली आहे. सारखींसारखींच आणि विशेष लक्षांत न भरण्यासारखीं अशीं माणसें आपण नेहमी पाहतों. पण अेखादा कोणी असा भेटतो कीं त्याच्याकडे सगळ्यांचें लक्ष जावें आणि तो तर याविषयी बेफिकिरच असतो. अितकेंच नव्हे तर अगदी कडकडीत आणि शुद्ध आत्मनिष्ठ असतो. त्याची ती स्वयंनिष्ठा पाहून आपल्याला अधिकच कौतुक वाटतें. अशा प्रकारचा अेक अतीशय अुमदा व आत्मनिष्ठ मनुष्य वाङ्मयाच्या दरबारांत आणून सोडल्याबद्दल रा. वझे यांची वाहवा करावी तेवढी थोडीच आहे.

श्रीपाद महादेव माटे

मराठवाड्यांतील अर्वाचीन मराठी वाङ्मय

(पद्यविभाग सन १८३८ ते १९३८)

[लेखक—चिं. नी. जोशी, अेम्. अे., अेस्. टी. सी.; प्रकाशक—यशवंत गोपाळ जोशी, ६२३/१५ सदाशिव पेठ, पुणें २; किंमत ३ रुपये]

"मराठिचें मूळ मराठवाडा". यामधील सन १८३८ ते १९३८ पर्यंतच्या शंभर वर्षांत झालेल्या कवींची व त्यांच्या काव्यनिर्मितीची या ग्रंथांत चर्चा केली असून, लेखकाच्याच शब्दांत त्याचा ग्रंथ लेखनाचा अुद्देश पुढीलप्रमाणे व्यक्त झालेला आहेः—

"ह्या विषयावरील हाच प्रथम ग्रंथ असल्यामुळे ह्याचें प्रयोजन निराळ्या रीतीनें सांगण्याचें कारण नाहीं. वेळोवेळीं प्रसिद्ध होअून गेलेल्या ग्रंथांवरील विवेचनें वर्तमानपत्रांतून व मासिकांतून येअून गेलीं आहेत व अजून येत आहेत हें खरें, तरी पण तें लिखाण तात्कालिक व क्षणजीवी असल्यामुळें त्यास स्वतंत्र ग्रंथाचें महत्त्व नसतें. शिवाय त्यांतील समालोचन

त्रुटक असल्यामुळें त्यावरून वाङ्मयाची कल्पना साकल्यानें होत नाही. प्रो. माटेकृत 'महाराष्ट्र सांवत्सरिका'तील (स. १९३५) माहिती अगदी त्रोटक, अपुरी व क्वचित् चुकीचीहि दिलेली आढळते. वि. पां. नेने यांच्या ६०० पानांच्या 'अर्वाचीन मराठी साहित्यां'त मनाठकर वगैरे चार पांच कवींचा नामनिर्देश व दिवाकरकृष्ण ह्या लघुकथालेखकाविषयीं थोडीशी चर्चा, ह्याहून अधिक कांहीं सांपडत नाहीं. तेव्हां खास मराठवाड्यांतील वाङ्मयाचा अितिहास देणारा अेक विस्तृत ग्रंथ असणें अवश्यच ठरतें."

आणि याच हेतूच्या सिद्धीसाठी सव्वीस प्रकरणांचा व ३८४ पृष्ठसंख्येचा हा ग्रंथ लेखकाने निर्माण केला आहे. त्यांत परिचित करून दिलेल्या "फिरकोळ कवींसह अेकंदर कवींची संख्या ४०–५० असून त्यांच्या लहान मोठ्या सुमारें ७५ ग्रंथांचें विवेचन त्यांच्या अितिवृत्तासह केलें आहे" व "ग्रंथकाराचें चरित्र, त्याच्या प्रसिद्ध व अप्रसिद्ध ग्रंथाचा निर्देश अुपलब्ध ग्रंथांचें सविस्तर विवेचन व नमुन्यादाखल कांहीं अुतारे अशी मांडणी" करण्याची पद्धति ग्रंथकाराने त्यांत अनुसरली आहे.

"काव्यकौस्तुभ, कविसम्राट्, वृत्तसम्राट्, सकलकलाकोविद्" अित्यादि बिरुदावलीने सुशोभित झालेले कवि कोरकेल, "महिपतीचा नवा अवतार घेअून नान्देडांत अवतरलेले" सन्त दास गणू, "माझें लग्न मजहून अेका वर्षानें वडील व शरिरानें मजहून दांडग्या अशा धिप्पाड मुलीशीं तिला न बघतां केवळ हुंड्याच्या आशेनें, खोट्या पत्रिकेवर नवव्या वर्षीं केलें गेले. ह्या लग्नाचा प्रताप मला अजून भोंवतो आहे" असें कळवळून सांगणारे व "ज्यांच्या 'प्रेम-रामायण' व 'मधुर-भारत' ह्या केवळ दोन हस्तलिखितांचीच ग्रंथ संख्या अनुक्रमें पंचवीस हजार व अेक लक्ष आहे" असे कवि बलवंत रावजी पाटील, अित्यादि महाकवींपासून, तों ज्या केवळ "मंगलाष्टकें वगैरे प्रासंगिक कविता करीत असतात" त्या सौ. लक्ष्मीबाअी लेले, यांच्यापर्यंतच्या कवि-कवयित्रींचा काव्यसंसार, या ग्रंथांत वर्णिलेला आहे. या संसाराच्या ग्रंथान्तर्गत विवेचनाचें स्वरूप, साहित्यिक मूल्यमापनाच्या दृष्टीने, फारसें अुद्बोधक नसलें तरी तें मनोरंजक खास आहे; आणि अेका वेगळ्याच जगाच्या वातावरणांत कांही काळ प्रवास केल्याचा फायदेशीर अनुभवहि त्याचें परिशीलन करून वाचकांना अवश्य मिळण्यासारखा आहे.

"महाराष्ट्रवाङ्मयांत कधीं न सांपडणारा परंतु अिकडील वाङ्मयांत आढळणारा दुसरा विशेष गुण म्हटला म्हणजे राजनिष्ठेचा पुरस्कार हा होय. या म्हणण्याचा अर्थ असा नव्हे कीं महाराष्ट्रवाङ्मय राजद्रोही आहे. तर मराठवाड्यांतील राजाप्रजासंबंध अधिक निकटचे असल्यामुळें राजनिष्ठेचे उल्लेख येथें साहजिकपणें पुष्कळ सांपडतात" अशा निर्णायक अभिप्रायाच्या स्वरूपाचा अेक संशोधनात्मक निर्वाळा, शेवटच्या समालोचनाच्या प्रकरणांत, मराठवाड्यांतील वाङ्मयाच्या अंतरंगाचें वैशिष्ट्य निदर्शन करतांना, ग्रंथकार देत असलेले दिसतात. माजी प्राध्यापकमहाशयांच्या सूक्ष्म विवेचक दृष्टीला प्रतीत झालेला व त्यांनी शब्दद्वारा प्रकट व प्रसृत केलेला हा अुद्बोधक नवप्रकाश, त्यांची स्वतःची मनोवृत्ती आणि प्रस्तुत ग्रंथांत दिसून येणारी त्यांची विवेचनपद्धती व विचारसरणी, यांची वाचकांना यथार्थ कल्पना आणून देण्यास पुरेसा समर्थ आहे.

के. ना. काळे

विश्वविहार

[लेखक आणि प्रकाशक : रावब. डॉ. द. ल. सहस्रबुद्धे, पुणें; मूल्य २ रु.]

मराठी भाषेंत शास्त्रीय विषयांवर जीं फारच थोडीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांमध्ये प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनानें अेका चांगल्या ग्रंथाची भर पडली आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें अुपयोगी पडेल, अशी सर्व शास्त्रीय शाखांतील माहिती अेकत्रित करून मांडण्याच्या विवक्षित हेतूनेच हें १८० पृष्ठांचें लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें गेलें असलें, तरी सोपी भाषा, आटोपशीर विवेचन आणि विषयांची संगतवार मांडणी, यांमुळे तें सर्वसाधारण मराठी वाचकानें अेकवार जरूर वाचण्याजोगें झालें आहे. पुस्तकाच्या अेकंदर २२ प्रकरणांतली पाहिलीं ९ निर्जीव आणि अुरलेलीं १३ सजीव सृष्टीच्या विचारास दिलीं आहेत. चंद्रसूर्यतारकामंडलादि ज्योतिर्गोलांनी व्यापलेल्या अतिमोठ्या विश्वविभागाचें ओझरतें दर्शन पहिल्या प्रकरणांत करून दिल्यावर, त्यांच्या सुसूत्रित अस्तित्वाला कारणीभूत म्हणून शास्त्रमान्य झालेल्या गुरुत्वाकर्षणसापेक्षतादि कल्पनांची माहिती लेखकानें पुढील दोन प्रकरणांत दिली आहे. अशा रीतीनें जागच्या जागीं विश्वप्रदक्षिणा घातल्यावर, मग पृथ्वीवर दृष्टि स्थिरावून तिची अुत्पत्ति, तिचा पृष्ठालगतचा अंतर्भाग, पृष्ठगत खडक, त्यांचे प्रकार आणि त्यांचा अुद्भवकाल, पदार्थमात्राचीं मूलद्रव्यें आणि त्यांचें विद्युत्स्वरूप अित्यादि विषयांची थोडक्यांत ओळख प्रकरण ४-९ मध्ये करून दिली आहे. यापुढील पांच प्रकरणांत जीव म्हणजे काय, सुरवातीचे जलमय जीव कसे झाले, अेकपेशींतून अनेक पेशींचे प्राणि केव्हा आणि कसे झाले, लिंगभेद नसणाऱ्या आणि असणाऱ्या प्राण्यांचें जनन, वर्धन आणि मृत्यु कसे होतात, याविषयींची माहिती देअून, अुरलेल्या भागांत अमरत्व म्हणजे काय आणि त्याच्या मर्यादा कोणत्या, शास्त्रीय दृष्ट्या आत्मा आणि पुनर्जन्म या कल्पनांना कोणतें मर्यादित स्थान आहे, आनुवंशिक गुणधर्म कसे येतात, स्त्रीपुरुषादि लिंगभेद केव्हा आणि कसा ठरतो, जीवनसृष्टीच्या विकासांत माणसाचें स्थान कोणतें, अित्यादि प्रश्नांचा थोडक्यांत अूहापोह केला आहे.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें सत्यच समजाअून घ्यायचें झालें, तर वस्तुतः अेवढ्या मोठ्या विषयविस्ताराला विवेचनहि अधिक विस्तृत हवें होतें. मात्र सर्वसाधारण मराठी वाचकाची जिज्ञासा जागृत करण्याचें काम या पुस्तकानें चांगलें होण्याजोगें आहे.

ड्यं. गो. ढवळे

श्रीविठ्ठल आणि पंढरपूर

[लेखक : श्री. ग. ह. खरे, पुणें; पृष्ठें २+२०+४२; किंमत ६ आणे; शके १८६०.]

पुणें येथील भारत अितिहास संशोधक मंडळांतील संशोधक श्री. ग. ह. खरे, यांनीं वरील नांवाचें लहानसें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकाचें वर्णनविभाग व संशोधनविभाग असे दोन विभाग केले असून पहिल्या विभागांत पंढरपूर क्षेत्राची विस्तृत माहिती व विठ्ठलाच्या देवालयाचें तपशीलवार वर्णन दिलें आहे व दुसऱ्या विभागांत पंढरपूरचे मध्ययुगांतील अुलेख व पंढरपूर व विठ्ठल या नांवांची व्युत्पत्ति व विठ्ठलाच्या मूर्तीचें शिल्प आणि

अितिहास या विषयांची चर्चा केली आहे. पहिल्या विभागांत पंढरपूरची संपूर्ण माहिती दिली असल्याने ती वाचून या क्षेत्राचें अद्यापि दर्शन न झालेल्या वाचकांस तेथे जाण्याची अिच्छा होअील व दर्शन घेतलेल्या वाचकांस आपण पंढरींत असल्याचा भास होअील. विठ्ठलमंदिर व चंद्रभागेचा देखावा यांचीं चित्रें पुस्तकांत घातलीं असल्याने त्याची अुपयुक्तता वाढली आहे. या दृष्टीने हा भाग म्हणजे पंढरपूरची 'मार्गदर्शिका' झाली आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

दुसऱ्या संशोधनात्मक विभागांत पंढरपूर व विठ्ठल यांच्या अितिहासाचें चिकित्सापूर्वक संकलन केलें आहे. पंढरपुरास विठ्ठलाची स्थापना अकराव्या शतकांत झाली असावी असा अुपलब्ध पुराव्यावरून श्री. खरे यांनी कयास बांधला आहे. याचा सर्वांत जुना निश्चित पुरावा म्हणजे विठ्ठलाच्या देवालयांत असलेला श. ११५९ मधील शिलालेख होय. इ. स. ५१६ मधील अेका ताम्रपटांत पंढरपूरचा पांडरंगपल्ली या नांवाने निर्देश सांपडतो. पण विठ्ठलाचा मात्र निश्चयात्मक अुल्लेख नाही. संस्कृत पंडरिका (कानलीडी-पंडरगे) या शब्दापासून पंढरी-पंढरपूर हा शब्द निष्पन्न झाला आहे. विठ्ठल हा विष्णु शब्दाचा अपभ्रंश आहे व तो कानडींतूनच आला आहे असें म्हणतां येत नाही. पंढरपूरच्या विठ्ठलाची स्थापना अकराव्या शतकाच्या मागे जाअूं शकत नसली तरी विठ्ठल या देवतेची अुपासना त्याच्या पूर्वीपासून महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांत प्रचारांत होती. विठ्ठलाच्या मूर्तीचें शिल्प वैदिक आहे. जैन अगर बौद्ध नाही. सध्या जी विठ्ठलाची मूर्ति आहे तीच पूर्वी होती असें दिसत नाही. कारण प्राचीन ग्रंथांतील विठ्ठलाचें वर्णन सध्याच्या मूर्तीशीं जुळत नाही. शिवाय विठ्ठलाची मूर्ति पंढरपूराहून विजयनगरास नेली असल्याचा संभव आहे अित्यादि अनुमानें अनेकविध पुराव्यांची छाननी करून बांधलीं आहेत. श्री. खरे यांनी आपल्या पुस्तकांतील हीं विधानें अत्यंत साधार अशीं मांडलीं आहेत व त्यांवरून त्यांनी या विषयावर किती परिश्रम केले आहेत हें दिसून येतें. अशा चिकित्सक पद्धतीने लिहिलेल्या शास्त्रीय ग्रंथांची निर्मिति मराठी भाषेंत होणें अत्यंत आवश्यक आहे, व त्याकरिता वाचक आणि प्रकाशक यांचें साहाय्य मिळावयास पाहिजे. अशा प्रकारचें पुस्तक लिहिल्याबद्दल श्री. खरे हे अभिनंदनास पात्र आहेत.

चिं. ग. काशीकर

प्रिया, प्रतिभा आणि कवि

[लेखक— अनंत जनार्दन करंदीकर]

मला वाटतें, पृथ्वींतले सारे प्रतिभावंत हे आपापल्या विशिष्ट सृष्टींतच वास करीत असतात. आणि प्रत्येकाच्या विशिष्ट सृष्टींतील विधिनिषेध आणि मूल्यें हीं अितर साऱ्या सृष्टीपेक्षा अगदी विभिन्न असतात. याचा परिणाम असा होतो की प्रतिभावंतांच्या सवयींचा आणि लहरींचा सभोंवतालच्या समाजाला सहसा अर्थ कळत नाही. त्यामुळे त्यांचें जीवन सभोंवतालच्या समाजाच्या जीवनाहून विभिन्न व्हायला लागतें आणि मग त्यांच्या प्रतिभेचा परिणाम समाजावर होअूं लागेपर्यंत तें विभिन्नत्व नाहींसें होत नाही. फार दूर कशाला ! अितक्या दिवसांच्या परिचयानंतर देखील प्रभेला माझ्या लहरींचा अर्थ कुठे कळतो ! अेखाद्या वेळीं असल्या लहरींचें समर्थन करण्याचा प्रयत्न केला तरी तिला तें समर्थन पटत नाही; अगदी खरें बोलायचें म्हणजे मला वाटतें, तिला तें कळतहि नाही. मग मी नुसताच हसतों आणि ती चिडते. अर्थात् ती चिडली म्हणजे मला बरेंच वाटतें. कारण त्यानंतर होणाऱ्या कृतककलहामध्ये निदान तिची मुद्रा तरी क्षणोक्षणीं बदलत जाते. प्रत्येक व्यक्तीला मुख अेकच असलें तरी मुद्रा अनेक असतात. पण बहुतेक जण त्यांपैकी अेखादीच मुद्रा नेहमी वापरीत असतात. अशा प्रकारें अेकच मुद्रा सतत वापरली म्हणजे साहजिकच ती जीर्ण होअून जाते आणि ती मुद्रा वापरणारी व्यक्तिहि विरूप दिसायला लागते. अेकच मुद्रा असलेली व्यक्ति म्हणजे अेकवार पाहून फेकून द्यायच्या लायकीची कादंबरी. प्रभेला निदान, असला अपवाद लावणें तरी शक्य नाही. मात्र 'पदोपदिं फुगोनि तैं वदन लोभवी आयत,' असा प्रकार घडूं लागला म्हणजे हसें आवरून मला तिची आराधना करावी लागते अितकेंच. असल्या आराधनेंत रस असतोच; तरी देखील मधून मधून सहृदयतेचें समाधान लाभल्यास अधिक बरें, असें मनांत आल्यावांचून रहात नाही. कवींद्र रवींद्रांनी सांगितलेंच आहे 'मानुषेर मन चाहे मानुषेरि मन'. मनुष्याच्या मनाला दुसऱ्या मनुष्याच्या मनाच्याच सहानुभूतीची तृष्णा असते.

त्या दिवशीं 'वसंतपृतनारुणध्वजयुता धरा रंगली' अशी सृष्टीची अकालीं अवस्था झाली होती आणि प्रभेच्या पदोपदीं फुगणाऱ्या आरक्त वदनाची आठवण होअून मी आपल्याशींच गुणगुणत होतों

'Red is the strangest pain to bear ;
In spring the leaves on the budding trees ;
In summer the roses are worse than these,
More terrible than they are sweet ;
A rose can stab you across the street,
Deeper than any knife.'

आणि त्याच वेळीं उत्सुक हाताने दार लोटून प्रभा माझ्या खोलींत शिरली. तिच्या हातांत

गुलाब होते, केसांत गुलाब होते, गालांवर गुलाब होते. साडीसुद्धा तिने गुलाबीच नेसलेली होती.

माझ्या मेजावर नेहमीप्रमाणे जाओीचीं फुलें पडलेलीं होतीं. जाओीचीं तीं अपेक्षित फुलें पाहतांच तिला अेकाअेकीं अनावर हसें लोटलें.

'आज इतकें हसायला काय झालें आहे ?' आश्चर्यचकित होऊन मीं तिला प्रश्न केला.

'नवीन कांही झालें नाही. पण मला अेकदम असें वाटलें की मी कुणा तरी मराठी चौथीपांचवींतल्या मुलाच्या खोलींत आलें आहें.' असें म्हणून तिने 'जाईचीं दिव्य फुलें असलीं फेकील कोण हो हातें' ही जुन्या क्रमिक पुस्तकांतली माधवानुजांची ओळ गुणगुणत खिडकींतून तीं सारीं फुलें फेकून दिलीं.

'आणि तूं माझ्या खोलींत पाऊल टाकलेंस तेव्हा पहिल्याप्रथम मीं तुला ओळखलें देखील नाहीं. मला वाटलें की मूर्तिमंत 'काश्मिरी गुलाब'च वाट चुकून माझ्या शून्य मंदिरांत प्रवेश करीत आहे. पण तूं तीं जाओीचीं फुलें फेकून कां दिलींस ?'

'मी केव्हाहि आलें तरी तो 'गुणांचा पुंज' तुझ्या टेबलावर पडलेला दिसतो आणि गुलाब मात्र कधीहि दिसत नाही. तेव्हा मला वाटलें की त्या जाओीच्या फुलांमुळेच गुलाबावर तुझा राग झाला असला पाहिजे. म्हणून आज गुलाबाला जागा करून देण्याकरिता तीं जाओीचीं फुलें फेकून देण्याचा संकल्प करूनच मी आलें होतें.'

'अस्सें; म्हणून आज अेरवी कधी न नेसायची गुलाबी साडी नेसून आली आहेस वाटतें ? पण हा काय तुझा मायेफिरूपणा ! माझ्या खोलींत गुलाबाचीं फुलें कां नसतात याचें कारण तरी तूं मला विचारायचें होतेंस !'

'याचें कारण मीं कधीच ओळखलें होतें की अेखाद्या मराठी शाळेंतल्या मुलासारखाच तूं अजून पोरकट राहिला आहेस.'

'काय पण मानसशास्त्राचें ज्ञान ! गुलाबाचीं फुलें अिथे कधीच नसतात याचें खरें कारण तूं स्वतःच आहेस.'

'म्हणजे ? माझा काय तुझ्या या लहरीशीं संबंध ? का मला आवडणाऱ्या साऱ्या वस्तू तुला वर्ज्य आहेत ?' प्रभेने विस्मयचकित होऊन प्रश्न केला.

'तुझा संबंध अिथे अशामुळे येतो की जाओीजुओीचमेलीसारखीं शुभ्र फुलें प्रभाविरहाने व्यथित झालेल्या मनाचें कुशल सेविकांप्रमाणे सांत्वन करतात आणि गुलाबाचीं फुलें अिथे आणलीं तर मात्र शेक्स्पियरने म्हटल्याप्रमाणे

But like a sad slave stay and think of nought,
Save where you are, how happy you make those;

अशी या प्रभावेड्या मनाची अवस्था होते.'

'चल, चाहटळ कुठला !' असे अुद्गार काढून प्रभेने माझें बोलणें अुडवून देण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या गालांवरील गुलाब अधिकच खुलून माझ्या बाजूने साक्ष देअूं लागले.

या ससंभ्रम स्थितींत कांही काळ गेल्यावर प्रभेने प्रश्न केला 'आज केळकरांच्या व्याख्यानाला नव्हता आलास ?'

तेव्हा 'जाईच्या फुलां'वर असा अेकाअेकीं प्रकोप होण्याचें कारण बहुधा आजचें केळकरांचें व्याख्यान असावें, असा तर्क करून मीं विचारलें 'व्याख्यानाचा विषय काय होता ?'

प्रभेने उत्तर दिलें 'कलेसाठी कला'.

हें अपेक्षित अुत्तर अैकून मी सस्मित मुद्रेने उद्गारलों 'वाटलेंच मला; कारण केळकर मुळीं त्या तत्त्वाचे मिशनरीच आहेत. मग बरें झालें मी आलों नव्हतों तें. नाहीतर मला त्या बेडगळ तत्त्वावरचें प्रवचन अैकावें लागलें असतें.'

'लोकांचीं तत्त्वें तेवढीं वेडगळ आणि तुझीं तेवढीं शहाणपणाचीं वाटतें!' प्रभा रागावून म्हणाली.

मीं अुत्तर दिलें 'उगीच कां रागावतेस! उद्या अेखादी प्रसाधनशास्त्राची अध्यापिका जर 'साडीसाठी साडी' हें तत्त्व सांगूं लागली तर तूं देखील तिला वेडगळ ठरविशील.'

या अनपेक्षित पण प्रसाधनकुशल ललनेला लगेच पटण्याजोग्या दृष्टान्ताने प्रभेच्या अंतःकरणाला गुदगुल्या झाल्या. तरी देखील मोठ्या कष्टाने आपल्या वदनावरील स्मित लपविण्याचा प्रयत्न करीत तीं विवादप्रिय युवती म्हणाली 'लोकांच्या म्हणण्याचें असें विडंबन करणें म्हणजे आपलें म्हणणें पटवून देणें नव्हे.'

'पण तूं जर माझें म्हणणें पुरतें अैकून घेशील तर माझें तत्त्व तुला पटेल, अितकेंच नव्हे तर तुला तें रुचेल देखील.'

'बरें, मग तुझें म्हणणें तरी काय!' प्रभेने अैकून घेण्याची तयारी दर्शविली. आता अेखादें आवडणारें असत्य अैकलें म्हणजे त्याचा निषेध करतांना प्रभेची मुद्रा फारच मोहक दिसते आणि त्यामुळे असल्या आवडणाऱ्या असत्य गोष्टी बोलण्याचा मला नेहमी मोह पडतो, म्हणून मी म्हणालों 'तुला पूर्वीपासून माहीतच आहे की कलेसाठी कला या तत्त्वामध्ये. प्रभेसाठी कला अशी सुधारणा करावी, या मताचा मी पुरस्कर्ता आहें.'

'तुझ्याशीं मुळी गंभीरपणाने बोलायची सोयच नाही.' साश्चर्य, साशंक पण सानंद मुद्रेने प्रभा उद्गारली.

'तुझ्याशीं गंभीरपणाने बोलायला तूं स्वतः कुठे तशी गंभीर दिसत आहेस!'

'कॉलेजांतल्या साऱ्या मुली मला गांभीर्यदेवता म्हणून चिडवीत असतात आणि तूं विचारतोस की तूं कुठे गंभीर दिसत आहेस!'

'होय, पण कॉलेजांत कुठे तूं गुलाबी साडी नेसून येतेस! तिथे तर तूं नेहमी नेहमी तुझी आवडती नीलांबरी नेसून येतेस, म्हणून तुझ्या दर्शनाबरोबर सर्वांना माधव-जूलियनप्रमाणे म्हणावेंसें वाटतें 'गांभीर्य निश्चल हासतें प्रवृद्ध नील नभानर्नी'. पण मानवी संपर्कापासून अलिप्तता दर्शविणारी ती नीलांबरी वर्ज केलीस म्हणजे लगेच तो दृष्टिकोण बदलतो.'

'साडीच्या रंगाबरोबर आणि पदराच्या हेलकाव्याबरोबर दृष्टिकोण बदलणाऱ्यांचें कधी दर्शन देखील घेअूं नयेसें वाटतें.'

'तुझें म्हणणें अगदी खरें आहे, पण त्याप्रमाणे वागणें हें ठराविक भाव व्यक्त करणाऱ्या चित्रांनाच शक्य आहे. तेव्हा आताचा तुझा उद्गार गंभीरपणाने विचारांत घेण्याच्या योग्यतेचा नाही, हें तुलाहि मान्य करावें लागेल. असो. तुझ्या गुलाबी साडीकडे दुर्लक्ष्य करून अगदी गंभीरपणाने बोलायचें म्हणजे कलेसाठी कला नसून प्रीतीसाठी कला आहे. कारण मानवी मनाच्या वैयक्तिक अथवा आत्मिक, सामाजिक अथवा नैतिक आणि नैसर्गिक अशा तीन प्रकारच्या तीन प्रवृत्ति असतात. यांपैकी वैयक्तिक प्रवृत्तीची परिणति आत्मविकासांत होते, सामाजिक अथवा नैतिक प्रवृत्तीची परिणति सामाजिक मानमान्यतेंत किंवा महात्मेगिरींत होते, आणि नैसर्गिक प्रवृत्तीची परिणति सौंदर्योपासनेंत आणि कलासृष्टींत होते. खऱ्या कलेचा जन्म

वल्लभाच्या मनांत रमणीविषयीं किंवा रमणीच्या मनांत वल्लभाविषयीं जें नैसर्गिक आणि अनिवार प्रणयाकर्षण असतें त्यापासूनच होतो.'

'तुझें म्हणणें खरें असतें तर प्रत्येक प्रेमिकाने अेकेक अपूर्व कलाकृति निर्माण केली असती !' अुपहासाच्या स्वरांत प्रभा उद्गारली.

'पण अेखादी अपूर्व कलाकृति निर्माण करावयाची म्हणजे समाजांत प्रचलित असलेल्या मूल्यांचें अंशतः तरी परिवर्तन घडवून आणावें लागतें. हें परिवर्तन घडवून आणण्याला आवश्यक अितकें ऋजुत्व आणि वैशिष्ट्य प्रत्येक प्रेमिकाच्या ठिकाणीं असत नाही. बहुतेकांचें प्रेम म्हणजे मोहितलालांनी म्हटल्याप्रमाणे 'बहुकृत प्रणयेर हीन अनुकृति' अितक्याच लायकीचें असतें.'

'बरें, मग कलेसाठी कला हें तत्त्व मधेच कुठून अुद्भवलें ?' प्रभेने मधेच प्रश्न केला.

'कलेसाठी कला असें प्रतिपादणाऱ्यांच्या मनाला या अनिवार प्रणयाकर्षणाचा अनुभवच नसतो. कारण त्यांचें खरें प्रेम स्वतःवरच बसलेलें असतें. अितरांच्या बरोबर ते फार तर मैत्री करूं शकतात. अुदाहरणार्थ, याच आत्मप्रेमावर अधिष्ठित अशा मैत्रीच्या खऱ्या स्वरूपाच्या आविष्करणासाठी केळकरांनी आपलें कृष्णार्जुनयुद्ध नाटक लिहिलें आहे.'

'मग त्यांत आक्षेप घेण्याजोगें काय आहे, मला नाही समजत. मला तर असेंच वाटतें की प्रीतीसाठी कला या तत्त्वाचें निमित्त करून कोणाहि पुरुषाने कलेसाठी कला या तत्त्वाला विरोध करणें म्हणजे शुद्ध दांभिकपणा आहे. कारण पुरुषांचा मूळ स्वभाव केळकरांनी म्हटल्याप्रमाणे आपमतलबीच आहे. आणि पुरुषांत देखील तुम्हां लेखकांच्याविषयीं तर बोलायलाच नको.'

'केवळ पुरुषांचाच नव्हे तर सर्व मानवांचाच मूळ स्वभाव आपमतलबी आहे. पण तो कांही आता वादाचा विषय नाही. हा आपमतलबीपणा विसरून केवळ स्त्रियाच नव्हेत तर पुरुष देखील प्रेम करूं शकतात, असा ज्यांचा गैरसमज झाला आहे अथवा ज्यांचें अनुभवाने असें मत झालें आहे, त्यांनी प्रीतीसाठी कला हें तत्त्व प्रतिपादलें तर तो दांभिकपणा होत नाही. अुलटपक्षीं प्रीतिव्यतिरिक्त कलेला तूं जर कला म्हणत असशील तर ती सर्वस्वीं प्रतिभाशून्य कला असते, हें मात्र विसरूं नकोस.'

'अुचलली जीभ आणि लावली टाळ्याला. मला तर तुझ्या या विधानाला दुसरा कांही आधार दिसत नाही.' अविश्वासाच्या स्वरांत प्रभा अुद्गारली.

'हें बघ प्रभे, आत्मप्रेमाने परप्रेमाची भावना मारून टाकली म्हणजे मनाचें प्रेमविषयाच्या हृदयांत शिरण्याचें कौशल्य नष्ट होतें आणि त्यामुळे त्या लेखकांच्या प्रतिभेलाहि आपल्या वर्ण्य विषयाच्या हृदयांत शिरतां येत नाही. मग ती प्रतिभा तंत्रप्रधान होअून कलेसाठी कला या पाखंडाचा पुरस्कार करूं लागते. या पाखंडाच्या जन्माबरोबर खऱ्या कलेचें आणि प्रतिभेचेंहि मरण ओढवतें.'

'लेखिकांच्या प्रतिभेच्याविषयी तूं असें कांही बोलला असतास तर तुझें म्हणणें मला पटलें असतें. पण लेखकांच्या बाबतींत हें तुझें म्हणणें मला सर्वस्वीं अमान्य आहे. स्त्रीचें हृदय पुरुषांना नुसतें दुर्ज्ञेयच नव्हे, तर अज्ञेय आहे. यामुळेच आमचें हृदय कळण्याला अपात्र अशा पुरुषजातीच्या प्रेमावर आमचा विश्वास बसत नाही. शिवाय वाटेल त्या यमकें जुळविणाऱ्यांनी किंवा कथानकाच्या निमित्ताने कोळिष्टकें विणणाऱ्यांनी आपल्याला स्त्रियांचें मन कळतें असा अहंकार बाळगावा, याचा मला नेहमी संताप येतो. म्हणूनच प्रीतीसाठी कला हें तुझें

तत्त्व मला रुचत नाही आणि कलेसाठी कला या तत्त्वावरचा आताचा तुझा आक्षेप मला अजून निराधार वाटतो.' प्रभा आवेशांत येऊन म्हणाली.

'पण प्रभे, मला हीं तुझीं सारीं मतें माहीत आहेत. तुला एकवार संताप आणल्याशिवाय स्त्रीजातीविषयींचा तुझा अभिमान प्रकट होत नाही, म्हणून मी मुद्दामच हा वाद उकरून काढला. आता माझ्या त्या आक्षेपाला दुसरा आधार देतों. पण तो आधार समजण्यापूर्वी तुला मैत्री आणि प्रीति यांच्यामध्ये अंतर तरी काय असतें तें कळणें अवश्य आहे.'

'बरें, मग तुझ्या मताप्रमाणे मैत्री आणि प्रीति यांच्यामध्ये अंतर काय असतें ?'

'मैत्री ही कलेच्या बाह्य नखऱ्याप्रमाणे वाचाळ असते आणि प्रीति ही कलेच्या आत्म्याप्रमाणे मुकी असते. पण मला वाटतें, हें उत्तर सप्रयोग दिलें तरच तुला पटेल.'

या उत्तरांतील भाव ओळखून आरक्तवदन होऊन प्रभा म्हणाली 'मला असलें उष्टें उत्तर नको. मला तुझें एकट्याचें अगदी स्वतंत्र उत्तर पाहिजे आहे.'

'पण ही अपेक्षा तुझ्या शहाणपणाला शोभत नाही.' हताश झाल्याचा अभिनय करून मीं म्हटलें 'तुला सर्व कांही कळतें असा मला नेहमी अभिमान वाटतो. आणि तूं तर आता असें दाखवून देत आहेस की There is nothing new under the sun ही साधी गोष्ट देखील तुला कळत नाही.'

'असलीं वाकडीं तिकडीं निमित्तें सांगण्यापेक्षा मला स्वतंत्र उत्तर सुचत नाही म्हणून सरळ कबूल कर.' प्रभा टोचून म्हणाली.

'प्रयत्न न करतां स्त्रियांजवळ पराभव पतकरणाऱ्यांनी स्त्रियांची संगतिच टाळावी, असें माझें मत आहे; याकरिता प्रयत्न करून पाहतों. पण मघाशीं जाईचीं फुलें पाहून हसलीस, तशी पुन्हा हसणार नाही, म्हणून आधी वचन दे. असें वचन दिलेंस, तरच मी तुझ्या प्रश्नाचें उत्तर देईन.'

हसऱ्या मुद्रेने या अटीचा निषेध करीत करीतच प्रभेने वचन देण्याकरिता माझ्या हातावर हात ठेवला. तिचा स्निग्ध हात तसाच धरून ठेऊन मीं विचारलें 'मैत्री ही शैशवांतील भावना आहे आणि प्रीति ही यौवनांतील भावना आहे, ही गोष्ट तुला मान्य आहे ना ?' प्रभेने आपली संमति दर्शविली. मी पुढे म्हणालों 'बरें, मग मित्राच्या संगतींत आपण लहान मुलांप्रमाणे हसतों आणि प्रियजनांच्या सहवासांत केवळ स्मित करतों, याचा तुला अनुभव आहेच. तेव्हा मित्रमंडळींतील हास्य आणि प्रियजनांच्या सहवासांतील स्मित— विशेषतः तुझें मंदस्मित— यांच्यामध्ये जितकें अंतर असतें, तितकेंच अंतर मैत्री आणि प्रीति या भावनांमध्ये असतें.'

हें उत्तर ऐकून मंदस्मित करण्याच्या ऐवजीं प्रभा हसायलाच लागली; पण मीं जोराने हात दाबल्यामुळे तिने आपले हसें आवरलें. मी पुढे म्हणालों 'सामान्यतः हास्यलोलुप मित्रांच्या सहवासाचा मी द्वेषच करतों, कारण त्यांच्या संगतींत हसण्याची एकदां चटक लागली म्हणजे मनाला प्रतिभामांद्याचा विकार जडतो.'

हे उद्गार ऐकून प्रभेचें हसें अनावर झालें. तेव्हा तिचा हात सोडून देऊन मीं म्हटलें 'आणि हें प्रतिभामांद्य जडविण्याला तूं देखील कारणीभूत होणार असशील, तर यापुढे मला तुझाहि सहवास टाळला पाहिजे.'

'आणि तूं जर स्मिताचा असा भलताच अर्थ करणार असशील, तर मला देखील यापुढे स्मित करणें सोडलें पाहिजे.' हसतां हसतां प्रभा उद्गारली.

'खरोखरीच जर स्मित करायचें सोडणार असशील, तर अितःपर नुसती रागावत जा. हसूं मात्र नकोस.'

'भलतेंच कांहीतरी ! असें करून कसें चालेल ! तुझ्यावर अेक रागावतां येअील. पण वाटेल त्या माणसांवर रागावून कसें चालेल ! त्यांना फक्त हसतां अेअील. पण तो विषय जाअूं दे. प्रीतीला प्रतिभेची आवश्यकता तरी कां भासते, तें आधी मला सांग पाहूं !'

'प्रभे, प्रीतीला प्रतिभेची आवश्यकता कां भासते, असला प्रश्न विचारण्याअितकी तूं पाषाणहृदयाची असशील, अशी माझी कल्पनाहि नव्हती. अुत्कट प्रेम करणाऱ्या प्रणयीजनांना प्रत्येक सुखक्षणीं मरावेंसें वाटतें, याचा देखील तुला अनुभव नाही का !'

'Pas d'exageration, मला असली अतिशयोक्ति अगदी आवडत नाही.'

'माझ्या म्हणण्यांत अतिशयोक्ति मुळींच नाही. तूंच जरा सहृदयपणाने विचार कर. नुसती वाटेंत कुठे तुझी गांठ पडली आणि तूं तुझें स्वाभाविक मंदस्मित करून आणि दृष्टीला दृष्टि भिडवून निघून गेलीस, तरी देखील सुखातिरेकामुळे मला असें वाटतें की त्या क्षणीं, त्याच ठिकाणीं पुतळा होअून अुभें रहावें, अितःपर जीवनपथ क्रमण्याची तरी जरूरी कांय !'

'असल्या क्षुल्लक कारणांनी जर जागोजागीं पुतळे अुभे राहूं लागले तर रहदारीचे सारे मार्ग बंद होअून जातील आणि या पुण्यनगरीला निद्रित राजकन्येच्या राजधानीचें स्वरूप प्राप्त होअील.' हसतां हसतां प्रभा अुद्गारली.

'असा कांही प्रकार घडून आला तर माझ्या प्रेमवेड्या मनाला बरेंच वाटेल. पण जगाच्या जीवनशक्तीला (Elan vital) असले चमत्कार नको असल्याने प्रणयाच्या पुण्य-क्षणांना चिरंतन आणि चिरनूतन स्वरूप देणाऱ्या प्रतिभेची प्रीतीला जोड देअून प्रेमवेड्यांना जीवनपथ क्रमण्याला अुत्तेजन द्यावें, असें तिला वाटतें.'

'मला वाटतें की ज्यांना प्रणयसुखाची शाश्वती वाटत नाही, त्यांनाच प्रत्येक सुखक्षणीं मरावेंसें वाटतें. मग असल्या संशयात्म्यांना प्रतिभेचा तरी काय अुपयोग ! त्यांना आपल्या प्रतिभेविषयींहि संशय वाटेल आणि त्या संशयामुळेहि त्यांना मरण्याची अिच्छा होअील. 'संशयात्मा विनश्यति' हेंच खरें.'

'तुझी कल्पना खरी आहे. गुअेरिनी या अिटालियन कवीने म्हटलेंच आहे 'Sono un poeta o sono un inbecille' ? मी कवि आहें का वेडा आहें, असा संशय त्याने व्यक्त केला असला तरी मला स्वतःला त्याची प्रेमगीतें फार आवडतात. पण असल्या संशयाने जरी कोणाला वेड लागलें आणि मरावेंसें वाटलें तरी त्यांचें मरण शक्य तितकें लांबणीवर टाकण्याचा आणि नवीन कलाकृतींना जन्म देण्याचा जीवनशक्तीचा हेतु साध्य होतोच.'

'बरें, असल्या संशयात्म्यांच्या प्रीतीपुरतें तुझें तत्त्व मान्य केलें तरी परस्परसमागमांत जे निःशंकपणें स्वर्गसुख अनुभवीत असतील, त्यांना प्रतिभेची आवश्यकता काय !'

'असले प्रश्न अैकले की मला तुझा राग येतो. आपल्या प्रश्नांचा अर्थ काय होतो, याचा देखील तूं विचार करीत नाहीस. आताच्या तुझ्या प्रश्नाचा अर्थ असा होतो की पृथ्वीवरील स्वर्गसुखाची तुला यथार्थ कल्पना देखील नाही.'

'अितकी कल्पना नसायला काय झालें ! अुमर खय्यामच्या त्या सुप्रसिद्ध रुबाअींत व्यक्त केली आहे, तीच ना पृथ्वीवरील स्वर्गसुखाची यथार्थ कल्पना !' असे अुद्गार काढून प्रभा ती रुबाअी म्हणायला लागली.

*Here with a loaf of bread beneath the bough,
A flask of wine, a book of verse and thou,
—Beside me singing in the wilderness—
And wilderness is paradise enow.

ही रुबाओी म्हणतांना आपले बिंबाधर कितीदा चुंबनोत्सुक दिसतात, याची प्रभेला कल्पनाहि नव्हती. पण तिचा कंठ नीरव झाला तरी मी तिच्याकडे मंत्रमुग्धाप्रमाणे पहात आहें, हें लक्ष्यांत आल्यावर ती किंचित् लाजली. तेव्हा मीं म्हटलें 'पृथ्वीवरील स्वर्गसुखाच्या यथार्थ वर्णनाची कविता तूं नेमकी ओळखलीस. पण तूं ती मला म्हणून दाखविलीस, यावरून त्या कवितेंतील व्यंजना तुझ्या लक्ष्यांत आलेली दिसत नाही. या रुबाओीमधलें कवितांचें पुस्तक हें स्वतः प्रियकराच्याच प्रेमगीतांचें पुस्तक असलें पाहिजे. नाहीतर तें प्रियेनें गाऊन दाखविण्या-मधलें सारें स्वारस्य नष्ट होओील. या अलौकिक सुखाचा आस्वाद घेण्यासाठीच प्रीतीला प्रतिभेची आवश्यकता भासते. असा जर कवीचा अभिप्राय नसेल तर नागरजनांच्या सामान्य वनविहारापेक्षा त्या रुबाओींत अधिक काय आहे!'

'म्हणजे केवळ आपल्या अहंकाराच्या तृप्तीकरिता प्रिया आणि प्रतिभा यांची आवश्यकता भासते, असाच ना तुझ्या म्हणण्याचा अर्थ! मला वाटतें, या अहंकारापासून अुद्भवणाऱ्या मत्सरामुळेच कवींना दुसऱ्यांची कविता अैकवत नाही.'

'अशी भलती समजूत करून घेअूं नकोस. हें बघ प्रभे, मुलींनी आपल्यावरून खऱ्या कवींची परीक्षा करूं नये. मुलींच्या मनांतील वैयक्तिक प्रवृत्तींचा बहुधा विकास होत नाही. त्यांच्या नैसर्गिक आणि सामाजिक या दोनच प्रवृत्तींचा विशेष विकास होतो. त्यामुळे त्यांना परिचित असलेला अहंकार हा त्यांच्या प्रणयपाशांत फसलेल्या कवींच्या अहंकाराहून अगदी भिन्न असतो.'

'खरें आहे तुझें म्हणणें. तुझ्यासारख्या कवींचा अहंकार अगदी अमानुष असतो. त्या अहंकाराला अेका वेताळाखेरीज कोणाची संगतिसुद्धा रुचत नाही. आम्हांला आमचा अहंकार मिरवायला दहा जणांचा समाज तरी लागतो. पण समाजाला टाळण्यानेंच तुमच्या अहंकाराची समाजांत प्रसिद्धि होते.'

'तूं म्हणतेस तें सारें मला मान्य आहे. पण मला या दोन अहंकारांमधला तात्त्विक भेद सांगायचा आहे, तो आता तूं अैक. सामाजिक प्रवृत्तीपासून अुद्भवणारा अहंकार हा समाजांत आपल्याला आपल्या पूर्वजांनी किंवा आपल्या आप्तेष्टांनी मिळवून दिलेल्या किंवा त्यांच्याच अनुकरणाने आपण मिळविलेल्या स्थानावर अवलंबून असतो. हा अहंकार समाजाच्या आधारा-वर अवलंबून असल्यामुळे त्यापासून स्पर्धा, मत्सर अित्यादि विकार अुद्भवूं शकतात. त्याच्या अुलट वैयक्तिक प्रवृत्तीपासून अुद्भवणारा अहंकार हा आपल्या वैशिष्ट्याच्या जाणिवेवर अवलंबून असतो. स्पर्धा आणि मत्सर यांचा त्याला स्पर्श देखील होत नाही. कारण केवळ आपल्या वैशिष्ट्याचा विकास करतां यावा याकरिता, पूर्वजांनी किंवा आप्तेष्टांनी आपल्याला मिळवून दिलेलें स्थान देखील वैयक्तिक अहंकारामुळे टाकून द्यावें लागतें. मग स्पर्धा तरी कुणाशीं करा-यची आणि मत्सर तरी कुणाचा करायचा! अिंग्लिश कवि लँडोरने म्हटलेंच आहे 'I strove with none, for none was worth my strife' किंवा लिथुआनियन कवि मिलोस्झने

* (विनत तरुतळीं या रम्य एकान्त रानीं। जवळि जरि चपाती, वारुणी, काव्यवाणी,
—स्वमपि बसिं मदंकीं नंदिनी, दंग गानीं। विजनवन तरी मी नंदनोद्यान मानी.)

म्हटलें आहे 'Mon orgueil pour la vanite' de tout le monde' (जगांतील नश्वर प्रतिष्ठेऐवजी माझ्या अहंकारांतच मी आनंद मानतों).

'बरें बरें, आता आणखी कोठल्या देशांतील कवींचीं वचनें शोधूं नकोस. हा वचनांचा मारा चुकविण्याकरिता तरी दुसऱ्या कवींचा तूं मत्सर करीत नाहीस, हें मी अगदी आनंदाने मान्य करीन.'

'केवळ वचनांचा मारा चुकविण्याकरिता असें म्हणूं नकोस. या दोन भिन्न अहंकारांची भिन्न परिणति समजावून घेऊन मग माझें म्हणणें मान्य कर. वैयक्तिक प्रवृत्तीपासून उद्भवणाऱ्या अहंकाराची परिणति आत्मार्पणांत होते आणि सामाजिक प्रवृत्तीपासून उद्भवणाऱ्या अहंकाराची परिणति आत्मप्रतिष्ठेंत होते.'

'तूं इतका अभिमानी असून तुला आत्मप्रतिष्ठेची चाड कशी नाही, याचें मला इतके दिवस कोडेंच पडलें होतें. तें आता उलगडलें खरें.' मंदस्मित करीत प्रभा अभिमानाने म्हणाली.

'तर मग यापुढे तुला रुचेल अशा परिभाषेंत बोलायचें म्हणजे सामाजिक प्रवृत्तीपासून उद्भवणारा अहंकार हा आपल्या नामाचा, अर्थात् कुलनामाचा, अहंकार असतो आणि वैयक्तिक प्रवृत्तीपासून उद्भवणारा अहंकार हा आपल्या रूपाचा अहंकार असतो. नामाच्या अहंकारांत कृत्रिमतेचें आणि कौटिल्याचें हलाहल भरलेलें असतें. पण रूपाच्या अहंकारांत आत्मविश्वासाचा अकृत्रिमपणा प्रकट होतो. हा रूपाचा अहंकार आणि त्याच्याशीं संलग्न असलेली आत्मार्पणाची वृत्ति यांची उपासना आणि जोपासना करणें हा कवीचा जीवितहेतुच असतो. याकरिताच ललित वाङ्मयांत तुझ्यासारख्या मनोज्ञ मानिनींचें माहात्म्य आणि यामुळेच ललित वाङ्मयाच्या वाचकांत मुख्य भरणा स्त्रियांचा असतो. आमच्या कवितांनी तुम्हां मानिनींच्या मनांतील रूपाचा अहंकार वृद्धिंगत होतो, म्हणून तर समाजाने भ्रमिष्ट आणि उपहासास्पद मानलेले कवि तुम्हांला आरशाप्रमाणे जवळ हवे लागतात.

तुझ्या मधुर शैशवा मदिर जिंकितें यौवन,
मदांध नयनांप्रती श्रवण होतसे दर्पण.
तरी श्रवणपंथ जे नयन सेविती मानिनी,
अपांगिं अवलोकिती कविसि कर्णपूजाक्षणीं.'

'असल्या श्लोकांच्याकरिता तर मीं तुला दूर केलें होतें, तें विसरलास वाटतें!' माझ्यापासून किंचित् दूर सरून सस्मित मुद्रेने प्रभा उद्गारली.

'बूर्बोन राजांच्या प्रमाणे मी कधीच कांही विसरत नाही. पण त्याच वेळीं तूं मला आपल्या आरशाची पदवी दिली होतीस, हें मात्र स्वतःच विसरत आहेस.'

'तूं म्हणजे बोलून चालून मिनर्व्हेचा आवडता पक्षी. तुझ्याकडे झुगारलेला प्रत्येक खडा झेलून उगाळीत बसण्याची तुला सवयच आहे. तेव्हा तूं माझी चेष्टा करूं लागलास म्हणून मीं तुला आरसा म्हटलें इतकेंच. पण त्याची तूं शंभरदा आठवण दिल्यावांचून रहात नाहीस.'

'पण प्रभे, तेव्हा मीं तुझी चेष्टा काय केली होती त्या वेळीं तुझा भाऊ नि मी सिंहगडाच्या दरवाजांत विश्रांति घेत बसलों होतों आणि आमच्यामागून, उषा जशी हळू हळू उदयाचलावर चढून येते, तशीच मंद मंद पावलें टाकीत तूं पण गडावर आलीस आणि 'छे, बाई, थकलें अगदी' असें म्हणत आमच्या शेजारच्या पायरीवर बसलीस. तेव्हां तुझा शीण घालविण्यासाठी मीं म्हटलें 'थकलीस म्हणून काय झालें! या गड चढण्यामुळे तुझ्या चेहऱ्यावर रंग किती सुंदर चढला आहे!' त्याबरोबर शृंगारसमाप्तीनंतर रमणी ज्या प्रसन्न आणि कृतज्ञ

मुद्रेने आरशाकडे पाहतात, त्याच मुद्रेने तूं माझ्याकडे पाहूं लागलीस. म्हणून मीं तुला विचारलें 'असें आरशांत पाहिल्यासारखें माझ्याकडे काय पाहतेस ! मी का तुझा आरसा !' तेव्हा तूंच मला टोचून म्हणालीस 'नाही तरी आता तूं माझ्या आरशाचेंच काम केलें आहेस, तेव्हा तुला आरसा म्हणायला काय हरकत आहे !' तेव्हा मीं आपली सरळ कबूली दिली की माझी कांहीच हरकत नाही, मला तर तुझ्या आरशांचा नेहमीच मत्सर वाटतो, त्यांची पदवी मला मिळाली तर त्यांत आनंदच आहे. यांत तुझी चेष्टा ती काय झाली !'

'असल्या वाकड्या बोलण्याला चेष्टा म्हणायचें नाही तर काय म्हणायचें ! शिवाय विंचवाचें सारें विष जसें त्याच्या नांगींत असतें, तसें तुझ्या चेष्टेचें सारें विष, तेव्हा तूं जो श्लोक भाऊला म्हणून दाखविलास, त्या श्लोकांत होतें. पण आता मला तो श्लोकच घड आठवत नाही.'

'आठवत नसला तर पुन्हा म्हणून दाखवितों.

प्रसाधनांतिं दर्पणीं विलोकिशी सुकेशिनी,
प्रसन्न दृष्टिने तदा गमे विषण्ण मन्मनीं;
कृतज्ञतेमुळे जरी जडेल प्रीति नारिची,
तरी न दर्पणाविना वरील अन्य कांत ती.'

'साधनाला साध्य समजणें ही मानवी मनाची अेक नेहमींची विकृति आहे, प्रणयापेक्षा प्रसाधनाला आणि मदनापेक्षा वसंताला अधिक प्रिय मानणें ही स्त्रीस्वभावाची विकृति असली तर प्रणयापेक्षा प्रणयवाङ्मयाला अधिक महत्त्व देणें ही पुरुषस्वभावाची विकृति आहे, असें तेव्हा मलाहि म्हणतां आलें असतें; पण तुझ्याशीं बोलतांना, कां तें कुणास ठाअूक, माझे सारे मुद्दे विसरून जातात खरे आणि मग तुझ्याशीं कलह करावा, असेंच वाटूं लागतें.'

'पण आता नाही कुठे त्या श्लोकाचें विष बाधलें ! 'जगीं निजमनाविना सकळ जाणते मानिनी,' हेंच खरें.'

'नाही बरें का. 'जनीं निजमनाविना सकळ बोलते मानिनी,' हेंच खरें. तूं तो श्लोक भाऊच्या देखत म्हणून दाखवला नसतास तर त्या वेळीं कदाचित् आपला कलहहि झाला नसता. दर्पणमहाशयांनी आपला अहंकार असा लोकांच्या देखत व्यक्त केला तर आमच्या अहंकाराला नाही का धक्का पोचत !'

'म्हणजे गुरूची विद्या गुरूस फळली, या न्यायाने आपल्या जागृत अहंकाराचा तूं माझ्यावर प्रयोग करून पाहिलास, अितकेंच. पण हा अहंकार कविच जागृत करीत असतात, हें माहीत नसल्याने आमचे मित्र आम्हांला कसलीं अुपदेशपर पत्रें पाठवीत असतात, तें पहा. 'तुमची प्रणयिनी कोण आहे, त्याची जरी मला कल्पना करतां आली नाही, तरी मी अितकें खास म्हणूं शकतों की, तुमच्या निर्व्याज व सखोल प्रेमाचा आदर करणारी किंवा त्याची अपेक्षा करणारी रमणी तुमच्या योग्यतेची खास नाही. शिवाय पुरुषाने जिच्याबद्दल रात्रंदिवस तळमळत राहून स्वतःला धन्य मानावें, अशी रमणी अजून जगांत जन्मायचीच आहे, असें माझें ठाम मत आहे. अशा तऱ्हेची कांही अंशीं योग्यता असलेली स्त्री हजारांत अेखादी असली तर असेल. परंतु दैवदुर्विलास असा आहे की प्रत्येक प्रणयी पुरुषाला आपली प्रणयिनी त्या अपवादभूत रमणीसारखीच वाटते.'

'खरें आहे त्यांचें म्हणणें. मला देखील असेंच वाटतें की, ज्या पुरुषाकरिता कोणाहि

स्त्रीने कांही काळ तरी तळमळत रहावें, असा पुरुष अजून जन्माला यावयाचाच आहे.' तिरस्काराने प्रभा उद्गारली.

'या हितोपदेशाचें मी त्यांना योग्य तें प्रायश्चित्त देईनच. पण यांत त्यांचा कांहीं फारसा दोष नाही. असला अुपदेश करणाऱ्या मित्रांना अेकच गोष्ट कळत नाही. ती ही की असली अपवादभूत रमणी आपोआप अस्तित्वांत येतच नाही. प्रिया आणि प्रतिभा यांचा परस्परांवर प्रभाव घडून त्या जशा उच्चतर कोटीला जाअूं लागतात, तशी ती अपवादभूत तिलोत्तमा प्रकट होअूं लागते. आणि हा प्रभाव घडून यावयाला सख्य आणि विरोध. केलि आणि कलह यांचा सारखाच अुपयोग होतो. गोअेटेने म्हटलेंच आहे

Spät erklingt was früh erklang Gluk und ungluk wird Gesang.

कालक्रमाने ध्वनीचें प्रतिध्वनींत रूपान्तर होतें आणि सुखदुःखांचें संगीतांत परिवर्तन होतें.

'असा समदर्शी पंडितांसारखा बोलायला लागलास म्हणजे मला तुझा पराकाष्ठेचा राग येतो. सुखदुःख, आशानिराशा, मानापमान या भावना तरी तुला आहेत का नाहीत ? मी तुझ्याशीं कशीहि वागलें तरी तुझ्या वर्तनांत बदल होत नाही, याचा अर्थ काय ?'

'याचा अर्थ तुला कसा कळणार ? प्रेमिकाची मनःस्थिति प्रेमविषयाला कशी कळणार ? आतिशसाहेबांनी म्हटलें आहे,

आँखें नहीं हैं चेहरे पे तेरे फकीर के
दो ठीकरे हैं भीकके दीदारके लिए.

तुझ्या फकीराच्या चेहऱ्यावर जे डोळे दिसतात, ते खरोखरीचे डोळे नाहीत, तर दर्शनाची भिक्षा सांठविण्याचीं तीं दोन भिक्षापात्रें आहेत; अशी ज्याची मनःस्थिति आहे, त्याने आपल्या वर्तनांत जयिष्णु वृत्ति प्रकट करावी, ही जी तुझ्यासारख्या मानिनींची अिच्छा, ती पूर्ण करणें माझ्यासारख्या अगतिक कवीला अशक्य आहे. तुझ्यामुळे मला प्रथम प्रीतीचा आणि मग प्रतिभेचा साक्षात्कार झाला. या दोन अलौकिक देवतांच्या साक्षात्कारामुळे तुझ्या सान्निध्यांत मला देहभान देखील रहात नाही. तुझा चालताबोलता आरसा बनण्यापलीकडे कसली महत्त्वाकांक्षाच माझ्या मनांत येत नाही. तुला माहीतच आहे की माझी कविता म्हणजे तुझीं प्रतिबिंबें आणि तुझे प्रतिध्वनि. पण प्रभे, आज अेकदाच अगदी खरें सांग बघूं,

अिथे नयनिं विंधुनी, अधरिं मोहुनी, गाअुनी,
दिनांतिं जळिं वारुणीवदन बिंबतां चुंबुनी,
तमीं भुजगभीतिने चमकुनी दृढालिंगुनी,
ऋजुस्मृति अनर्ध्य तूं भुलशि वाम कां यौवनीं ?

किंवा

अनुष्टुप रुचे मला ऋजु, विदग्ध पृथ्वी तुला,
तयास्तव विवादलों कविसि ठेवुनी साक्षिला.
अलक्षित नभांतुनी कवि सरे यदा मोहने,
विवाद अनिवार मीं मिटविला अिथे चुंबनें.

'असले श्लोक पाहून तुला काय वाटलें ?'

'मला वाटलें की, तूं कवि नसून चोर आहेस.' दृष्टीला दृष्टि भिडवून प्रभेने उत्तर दिलें.

'नुसताच चोर नाही. मीं तुझ्या कल्पनांची चोरी केली आहे, पण तुझ्या Identity विषयीं आणि माझ्या कवित्वाविषयीं लोकांना शंका येअूं नये, म्हणून मी ती चोरी लोकां-

पासून चोरून ठेवीत आहें, असें अुलटें तुलाच बजावणारा चोर आहे. पण या साऱ्या चोऱ्या झाल्याने तुला स्वतःचा अधिकाधिक अभिमान वाटतो कीं नाही !'

'असल्या धृष्टतेबद्दल पुन्हा अेकवार तुझ्या श्रीमुखांत द्यावी, असें मात्र वाटतें. पण त्या निमित्ताने तूं आणखी अेक अचरट कविता लिहिशील, या भीतीने हात आवरला आहे.' माणिकांच्या कुड्यांचा वर्ण कपोलांवर आणून प्रभा अुद्गारली.

'तूं हात आवरलास, हें चांगलेंच झालें. आरशावर हात टाकला म्हणजे आपल्याच हाताला लागतें.'

'आणि या अहंकार वाढविणाऱ्या प्रियंवद आरशांत आपलें रूप किंवा आपलें प्रतिबिंब पहात राहिलें तर मनांत सैतानी अहंकाराचा संचार होतो.'

'पण प्रभे, नामाच्या अहंकारापेक्षा रूपाचा म्हणजे आपल्या व्यक्तित्वाचा अहंकार केव्हाहि अधिक क्षम्य आहे.'

'पण बिचाऱ्या नामावर तुझा इतका राग कां !'

'त्याचें कारण अगदीच विशिष्ट आणि विक्षिप्त आहे.'

'तुझीं कारणें नेहमीच अितकीं विक्षिप्त असतात की, तीं वास्तविक कारणें असतात का नाहीत, याचीच मला शंका येते.'

'मी सांगतों त्यांत खोटें कांही आहे का तूंच बघ. माझें मन पहिल्या प्रथम तुझ्याकडे आकृष्ट झालें, तेव्हा तुझें नांव देखील मला माहीत नव्हतें, त्या वेळीं मी तुला वर्ड्स्वर्थच्या अनुकरणानें Phantom of delight या नांवानें ओळखत असें, हें तुला ठाअूक आहेच.'

'होय, पण मला मात्र पहिल्यापासून तुझें नांव माहीत होतें.'

'आणि त्यामुळेच प्रिय व्यक्तीचें नांव कळल्यानंतर आपल्या मनांत कोणकोणतीं परिवर्तनें होतात, तें तुला अजून समजलें नाही.'

'पण नुसतें नांव कळल्याने मनांत कांही क्रांति होते, असली कल्पनाहि आतापर्यंत मला सुचली नव्हती.'

'म्हणूनच तर मी सांगतों तें लक्षपूर्वक अैक. तुझें नांव कळलें, तेव्हा प्रथम मला आश्चर्य वाटलें. मग यापूर्वीच हें नांव ध्यानांत कसें आलें नाही, याचा चमत्कार वाटला. मग तुझ्या नांवाच्या अुचितपणाचें कौतुक वाटलें. मग आपल्या नांवांचा समास केला तर तो कसा दिसेल, असा विचार मनांत आला आणि त्याबरोबर तुझ्या कुळाच्या प्रसिद्धीची आठवण होअून मनाला संकोच वाटला.'

'पण कुळाच्या प्रसिद्धीने काय बिनसतें !'

'तुझ्या कुळाचें स्मरण झालें म्हणजे ज्या Airy nothing ची मी मनांतल्या मनांत पूजा करीत होतों, त्याला Name and local habitation ची अुपाधि जडल्यामुळे आपलें परब्रह्म मायेने चोरून नेल्याप्रमाणे मनाला विषाद वाटतो.'

'तुझ्या वडिलांच्याप्रमाणे तूं जर अध्यात्माच्या गोष्टी बोलणार असशील, तर मी आपली अशीच चालूं लागतें. मला नाही ब्रह्म नि मायेच्या भानगडी समजत.'

'बरें, निदान अितकें तरी समजेल की नांव कळण्यापूर्वी अपरिचयामध्ये देखील तूं जितकी माझी अेकट्याची वाटत होतीस, तितकी यापुढे परिचयानंतर देखील कांही केल्या वाटणार नाहीस, अशी भावना होअून अेका विलक्षण अीर्ष्येने आणि तितक्याच तीव्र निराशेने माझें मन ग्रासलें गेलें आणि म्हणून तुला अगदी आपल्या अेकट्याच्या प्रभावाने घडविण्या-

करिता मीं जाणूनबुजून वास्तव लोकांतील प्रभेचें कवितेच्या कल्पलोकांतील प्रियेंत रूपान्तर केलें.'

'ही गोष्ट मात्र तूं अगदी माझ्या मनाप्रमाणे केली आहेस. J 'ai voulu etre si grande que les hommes plus tard ne pussent croire que j' ai veritablement existe'. Etre si puissant et si belle qu' ils me dussent tenir pour une creature de l' esprit. La plus grande gloire n'est elle pas des dieux qui se sont fait inconcevable ?'

(मला इतकी थोर होण्याची अिच्छा आहे की भावी पिढ्यांचा माझ्या मानवदेहांतील अस्तित्वावर विश्वासदेखील बसूं नये, अितकी सुंदर आणि अितकी प्रभावी व्यक्ति होण्याची अिच्छा आहे की त्यांनी मला काल्पनिक व्यक्तिच समजावें. देवांच्या प्रभावाचें आकलन करतां येत नाही, हीच त्यांची अत्यंत श्रेष्ठ कीर्ति नव्हे का !)

स्त्रियांच्या म्हणी

(५१ व्या अंकावरून पुढे)

(४२६) जिभलीनं केलं, अन् गळ्याशीं आलं.
(४२७) रंग भोळा, पोटीं चाळा.
(४२८) हलवले हात, तर मिळेल भात.
(४२९) वहीला मेळ, हातीं केळ.
(४३०) दिढीचा काला, आत्मा नाही धाला.
(४३१) अन्नपाणी त्यजी, शेराची भजीं.
(४३२) चांगली गंमत, ढोलकी नाही जमत.
(४३३) हातांत झोळी, सर्व गांव उकळी.
(४३४) येराळी मैना, शिमग्याला नेईना (!)
(४३५) कामाची पासरी, जन्मभर सासरीं (!)
(४३६) पध्याचा हांडा चुलीवर चढवा, एकऱ्याला उतरेना, चौघांना बोलवा.
(४३७) नाक नाही धड, अन् तपकीर ओढ.
(४३८) खालचें झाक अन् मग वर कर नाक.
(४३९) कर्माची वरात म्हातारी शिरली घरांत (!)
(४४०) नाक जाऊं देईल पण शेंबूड जाऊं देणार नाही.
(४४१) मोठमोठ गेल गोते खात, झिंजुरटें म्हणतें माझी काय वाट !
(४४२) आडांत कड्ड, तर पोहऱ्यांत कुठलं गोड !
(४४३) हातानं होअीना कांही, अन् तोंड करतं घाअी.
(४४४) धनगरी जत्रा, कारभारी सत्रा.
(४४५) डोकीला मिळेना एरंडेल, बाअील मागते मोगरेल.
(४४६) रांड रिंड म्हणा, पण पोटभर वाढा.
(४४७) कां ग बाअी दुबळी, तर म्हणे निघाली वेगळी.
(४४८) भुकेल्याचा भात शिजत नाही, बिजवराची बायको वाढत नाही.
(४४९) नारीचें बोलणें, गवताचें शेकणें.
(४५०) एक बाळंतीण, बारा सुअिणी.

नीळकंठ शंकर नवरे

कांही शब्दांचें व्युत्पादन

१ परिचित–पक्षपात

शब्द अन्य भाषेंतून मराठींत येतांना त्यांच्या रूपांत अनेक कारणांनीं फरक पडतो. ओळखीचें रूप मराठी शब्दांत दिसावें,— हें अशाच कारणांपैकी अेक आहे.

रेचनी नांवाची अेक वनस्पति आहे. हिच्या सेवनाने मलशुद्धि होते. हा अर्थ तिच्या नांवावरून संस्कृतज्ञांस दिसून येतो. रिच् धातुचा अर्थ 'रिकामे करणें' असा आहे, यास अनी प्रत्यय लागून रेचनी शब्द झाला आहे. संस्कृत न जाणणाऱ्या मराठीभाषकास हा शब्द अर्थशून्य वाटला; व त्याने त्यांत वा प्रविष्ट करून रेवाचिनी असें रूप बनविलें. यांत च चें रूपान्तर चि असेंहि झालें आहे. या दोन्ही विकारांमुळे असा भास संभवतो की जशी दालचिनी तशीच रेवाचिनी ! दोन्ही पदार्थ वनस्पतिजन्य असल्याने सदृश संज्ञा धारण करण्यास योग्य आहेत, हें उघडच आहे. अशा रीतीने अर्थहीन भासणारें रेचनी हें रूप गेलें व प्रस्तुत द्रव्य दालचिनीचें भावंड ठरलें. अशा रीतीने आपणांस अगोदर परिचित असलेल्या दालचिनी या शब्दाच्या साहचर्याने रेवा-चिनी हें रूप बनल्याचें दिसतें.

यमलार्जुन— कृष्णावर बालपणीं अनेक संकटें आलीं. यांपैकी दोन झाडें त्याच्या जवळ पडलीं; तो थोडक्यांत वचावला;— हें अेक संकट होय. हीं दोन झाडें अर्जुन-जातीचीं होतीं. दोन्ही जवळजवळ व सारख्याच रूपाचीं, आकृतीचीं असल्याने, त्यांना जोड-अर्जुन अेतदर्थक (यमल–अर्जुन =) यमलार्जुन असें नांव होतें. हें नांव कांहींसें अनोळखी वाटल्याने यमल–चे स्थानीं कोणी पंडितम्रुवाने विमल असा प्रतिनिधि ठेवून संपूर्ण नाम विमलार्जुन असें मानिलें; व तें आज मराठींत वरेंच आढळतें. नांवांतील या बदलाचे मुळाशीं यमल हा शब्द अनोळखी आणि विमल ओळखी, हेंच कारण दिसतें. (यमल = जुळे, आवळेजावळे).

२ आद्यस्वरलोप

अ-रुद्ध म्हणजे 'न अडविलेलें, आवळतें नसलेलें' रुंद असा अर्थ आहे. युद्ध चें रूपान्तर झुंज असें होतें. यांत दिसून येतें की 'संस्कृत शब्द मराठींत येतांना 'द्वित्त (द्विरावृत्त) व्यंजनापूर्वी अनुस्वार येतो.' असाच अनुस्वार रुद्ध मध्ये शिरून त्याचें रूप रुंद बनलें आहे. अरण्य— रान— या धर्तीवर अरुद्ध चा आरंभीचा अ लुप्त झाला आहे. अशा रीतीने अरण्य व युद्ध यांच्या साक्षीने, अ+रुद्ध–चें रूप रुंद असें बनलें आहे. अरुद्ध व रुंद या दोहोंचा अर्थ समान आहे, हें सांगणें नकोच.

३ स्वैर-विकार

गुरें अन्न भराभर खातात व नंतर रिकाम्या वेळीं तें अन्न घशांतून वर आणून त्याचें मंथन अथवा चर्वण करितात. या त्यांच्या व्यापारास रोहमंथ म्हणजेच रोमंथ असें नांव संस्कृतांत आहे. या समासाचा विग्रह रोह–पूर्वः मंथ असा आहे; व याचा अर्थ 'प्रथम वर आणणें व नंतर घुसळणें,' असा होतो. या समासावरून पाहतां यांतील मधलेंच ह् हें अक्षर गळालें आहे. असा प्रकार संस्कृतांत फार क्वचित् आढळतो.

वर्तन या शब्दांत वृत् 'उपजीवन करणें' हा धातु आहे. या शब्दाचा अर्थ जगणें,

अुपजीविकेचें साधन, असाहि होतो. हाच अर्थ पगार, वेतन या शब्दार्थांचे मुळाशीं आहे. याच्या रूपांत मूळ धातु सांपडत नाहीं; यावरून अर्थ-साम्य पाहतां असा तर्क धावतो की वेतन हें वर्तन चें रूपान्तर असावें.

४ मिश्ररूप

शरणं गत म्हणजे 'आश्रय मागण्यास गेलेला'.

शरण+आगत हें = शरणागत या समासाचाहि अर्थ तोच आहे. शरणं गत हें व्यस्त रूप आणि शरणागत हें समस्त रूप; या दोहोंच्या मिसळीपासून शरणांगत हें रूप बनलेलें दिसतें.

५ अर्थ प्रमाद

मूर्धन् याचेंच लौकिक रूप मुंड असें बनलें. अर्थांतहि थोडा बदल होअून मुंड-पासून 'केशरहित डोक्याचा गोटा', असा बोध होअूं लागला. या मुंड-शीं रुंड-चा नाद मिळता असल्याने रुंड-चाहि अर्थ 'केशरहित डोकें' असाच मराठींत होअूं लागला. संस्कृत कोश सांगतो की रुंड म्हणजे धड आणि मुंड म्हणजे डोकें. पण मराठीमध्ये रुंड-चा अर्थ मुंड-शीं सदृश असाच होतो. यास कारण, माझ्या मतें, पुढीलप्रमाणे अेखादें पद्य असावें. रा. किर्लोस्करांच्या नाटकांत— पंचतुंड नररुंडमालधर पार्वतीश हा अधिं नमितों। या पद्यांत रुंड हा शब्द चुकून मुंडकें या अर्थी प्रयुक्त दिसतो. या नाटकाबरोबर हा प्रामादिक अर्थहि लोकांत प्रचलित झाला असावा.

६ हठोत्पत्ति

वारंवार शब्दाचा अर्थ त्याच्या अवयवार्थापासून निघावा अशी मनुष्याची अिच्छा आढळते. हीस अनुसरून मांस शब्दासंबंधी पुढील व्युत्पादन स्मृति ग्रंथांत आढळते.

मां स भक्षयिताऽमुत्र यस्य मांसमिहाद्म्यहम्।

अर्थ— या लोकीं ज्याच्या अंगाचे लचके मी तोडतों तो परलोकीं माझ्या अंगाचें लचके (अथवा मांस) तोडील. वरील श्लोकार्धांत मां स हीं दोन अक्षरें अेकत्र आणिलीं आहेत व त्यांच्या संयोगाने मांस हा शब्द बनल्याचें दाखविलें आहे. अर्थात् या व्युत्पत्तीच्या मुळाशीं हठ किंवा जबरी अुघड दिसून येते.

व्यवहार— याच्याहि अर्थाची संगति ओढूनताणून लाविलेली आढळते.

वि नानार्थेऽव संदेहे हरणं हार अुच्यते।
नाना संदेह हरणात् व्यवहारः प्रकीर्तितः।

अर्थ—वि = अनेक, अव = संशय, हार = घालविणें. नाना प्रकारच्या संशयांचा निरास न्यायालयांतील चौकशींत होत असल्याने या चौकशीस व्यवहार असें म्हणतात.

७ रसशास्त्र

शातकुंभ ही संज्ञा सोन्यास आहे. या शब्दाकडे पाहतां त्यावरून शंभर घट ही कल्पना मनांत येते. सोन्याशीं शंभर घटांचा संबंध कसा लावणार ? याचा विचार करितां असें अनुमान संभवतें की पूर्वी आपल्या देशांत शंभर घटांचा अुपयोग करून रसक्रिया किंवा किमया हिच्या प्रयोगाने सोनें बनविण्यांत येत असावें. शतें कुंभेषु भवम् = शातकुंभं—या व्युत्पत्तिवरून रस-शास्त्राच्या प्रयोगाने आपण सोनें बनवीत असूं हें अनुमान निःसंशय प्राप्त होतें.

गोविंद कृष्ण मोडक

नभोवाणी आणि मराठी साहित्य

[प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे, बी.अे., अेम्.अेस्सी.]

हिंदुस्थानांत महायुद्धामुळे रेडियो यंत्राचा प्रसार झपाट्याने होत आहे. आणि रेडियोचा अुपयोग मुख्यत्वेंकरून बातम्या किंवा संगीत अैकण्याकडे जास्त होत असल्यामुळे, नभोवाणीकेंद्रावर या दोन बाबींवरच जास्त भर दिला जातो. त्यांतच भिन्न भाषांच्या गोंधळाचा व निरनिराळ्या भाषांच्या विविध कार्यक्रमांचा विचार करावा लागतो. दिल्ली केंद्रावरून प्रसृत होणाऱ्या मराठी बातम्या सोडल्या, तर मराठी भाषेंतील कार्यक्रम केवळ मुंबअी केंद्रावरूनच करण्यांत येतो. कोणत्या केंद्रावरून कोणत्या भाषांतून जास्त प्रमाणांत कार्यक्रम करण्यांत यावे, हा प्रश्न गुंतागुंतीचा व भानगडीचा आहे. त्याचें विवेचन किंवा चर्चा अन्यत्र होतच आहे. मुंबअी रेडियो क्लबने प्रथम मुंबअी नभोवाणीकेंद्र स्थापलें. तें मोडकळीस येअू लागल्यामुळे, मुंबअी सरकारने प्रथम मदत देअून नंतर तें स्वतः चालविण्यास घेतलें. काटकसरीच्या दिवसांत तेंहि बंद होतें कीं काय अशी भीति अुत्पन्न झाली. पुढे सुदैवाने मध्यवर्ती सरकारने स्वतंत्र नभोवाणी खातें स्थापून; मुंबअी व कलकत्ता येथील नभोवाणीस्थानें आपल्या ताब्यांत घेतलीं, आणि आता तेरा नभोवाणीकेंद्रें हिंदुस्थानांत चालू असून मराठी, हिंदुस्थानी, पुश्तु, बंगाली, तेलगू तामीळ व गुजराती या भाषांतून कार्यक्रम करीत आहेत. अेकट्या मुंबअी केंद्रावरून अिंग्रजी, गुजराती, हिंदुस्थानी आणि मराठी अितक्या भाषांतून कार्यक्रम हल्ली केला जातो. साधारण रविवारीं तेरा तास कार्यक्रम धरला, तर त्यांत साधारण व क्षिप्र (medium and short) लहरींवर होणाऱ्या कार्यक्रमांत जवळजवळ सात तास हिंदुस्थानी संगीतावर खर्च होतात. क्षिप्र लहरीवर शिवाय तीन साडेतीन तास मिळतातच. अुरलेल्या वेळांत अिंग्रजी, हिंदी, गुजराती भाषेंतील कार्यक्रम अुरकून घ्यावे लागतात. यांतच अिंग्रजी वादविवाद, शैक्षणिक कार्यक्रम, स्त्रिया व मुलें यांचे सर्व भाषांतील कार्यक्रम; शारीरिक शिक्षण, थोर लोकांचीं प्रासंगिक भाषणें, द्विभाषिक अभ्यास, वाङ्मयांतील अुतारे वगैरे अनेक बाबींचा समावेश होतो. ग्रंथपरीक्षण व लघुनाटिका प्रत्येक भाषेंतून असतातच.

या अेवढ्या संसारांत मराठी भाषेला जेमतेम तिसऱ्या हिश्शाचा वेळ मिळतो. आणि त्यांतच मराठी साहित्याचा परामर्श थोडाथोडका घेतला जातो.

नभोवाणीसंबंधी कार्यक्रमांचे अुतारे बहुतेक प्रसिद्ध दैनिकांतून येतात पण कार्यक्रमांवरील चर्चा क्वचितच सांपडते. अिंग्रजी दैनिकांत व साप्ताहिकांत अिंग्रजी कार्यक्रम चर्चिला जातो. विविधवृत्तांत संगीताच्या कार्यक्रमांवर मार्मिक चर्चा होअी. रा. वरेरकरांचा संबंध असलेल्या साप्ताहिकांत अितर कार्यक्रमांवर चर्चा होत असे व होते. पण आतापर्यंत मुंबअी केंद्रावरून कोणत्या प्रकारचे मराठी साहित्यविषयक कार्यक्रम झाले, याचा ठोकळ मानाने आढावा अजून कोणीं घेतला नाही. आतापर्यंत कोणत्या प्रकारचे कार्यक्रम झाले, याची माहिती मिळाल्यावर पुढे त्यांत कोणत्या विधायक सूचना व सुधारणा करतां येण्याजोग्या आहेत, त्याचा अंदाज बांधण्यास सोपें जाअील.

जून १९२७ सालापासून आजपर्यंत सुमारें बारा साडेबारा वर्षें, प्रस्तुत लेखक मुंबअी नभोवाणीवरील कार्यक्रम अैकत आला आहे. प्रथम प्रथम रा. मामा वरेरकर, रा. वसंत नारायण नाअीक व रा. अत्रे किंवा मातृदिनाचे रा. नाअीक, यांव्यतिरिक्त फारच थोडे साहित्यिक मराठी साहित्यविषयक कार्यक्रमांत हातभार लावीत असत. मुलांचे कार्यक्रम व अेकदोन नाटिका, याशिवाय फारसे मराठी साहित्यविषयक कार्यक्रम नसत म्हटलें तरी चालेल. मुंबअी सरकारनें नभोवाणीकेंद्र हातांत घेतल्यानंतरहि कांहीं व्याख्यानें, पुस्तकपरीक्षणें व कवितागायन अेवढे कार्यक्रम जास्त होअूं लागले. गेल्या दोन वर्षांत मराठी साहित्यविषयक कार्यक्रम जास्त प्रमाणांत होतात व विविध प्रकारचे होतात, असें म्हणणें चूक होणार नाही. दोषैक दृष्टीने पाहिलें तर कार्यक्रमांत पुष्कळ अुणेपणा आढळेलहि. पण प्रस्तुत लेखाचा अुद्देश या कार्यक्रमांचा ठोकळ आढावा घेण्याचा आहे.

नभोवाणीवर होणाऱ्या कार्यक्रमांविषयी अेक तक्रार नेहमी येते. ती ही की, नभोवाणींत अुपयुक्त असें लिखाण लिहिणारे लेखक फार थोडे आहेत. दहा किंवा पंधरा मिनिटांत संपणारें व्याख्यान, नाटक किंवा गोष्ट लिहिणारा पट्टीचा लेखक असावा लागतो. त्याला केंद्राचें व यंत्राचें तंत्र संभाळून श्रोत्याचा कान पकडण्याची कुशलता अवगत असावी लागते. कलकत्ता केंद्रावरून होणाऱ्या बंगाली तीनतासी नाटकांची तरफदारी रा. वरेरकर करतात; पण तो बंगाली हट्ट आहे, रेडियोतंत्र नव्हे, ही गोष्ट वरेरकर दृष्टिआड करतात. वक्ताहि योग्य मिळणें दुरापास्त झालें आहे. रेडियोस अनुकूल आवाज असलेले अभिनयकुशल ध्वनिनट पुरेसे नाहीत. आंधळ्याच्या शाळेसारखें रंगभूमीवर गाजलेलें नाटक रेडिओंत अेकदा पडलें याचें मर्म सागणें अवघड नाही.

अशा परिस्थितींत मराठी साहित्याचे कार्यक्रम जेवढे झाले तेवढे करणें, ही गोष्टसुद्धा अवघडच होती, असें म्हणावें लागेल. लेखाच्या सोयीसाठी, ऑगस्ट १९३८ पासून जानेवारी १५ १९४० पर्यंतच्या दीड वर्षांच्या कालावधींत, मराठी साहित्यविषयक कोणत्या प्रकारचे कार्यक्रम झाले याचा विचार करूं.

नभोवाणीवरील कार्यक्रम दोन दोन महिने अगोदर ठरवावे लागतात; व ते ठराविक दिवशीं ठराविक वेळींच व्हावे लागतात. कार्यक्रमांबद्दल मिळणारें पारितोषिक कुणांस अल्प वाटतें, कित्येकांस फुरसत नसते. व कार्यक्रम दूरचे ठिकाणीं ध्वनिमुद्रित करण्याची अजून पूर्ण सोय झालेली नाही, यामुळे पुष्कळ चांगल्या वक्त्यांचीं भाषणें रेडियोवर होअू शकत नाहीत.

लेखी वाङ्मयांतील सर्वच प्रकार रेडियोवर होअूं शकत नाहीत, तसेंच स्वतः लेखकाला परिणामकारक रीतीने बोलतां येअीलच असें नाही. आजपर्यंत अठरा महिन्यांत झालेल्या कार्यक्रमांचे ठोकळ मानाने मुलांसाठी, विद्यार्थ्यांसाठी, स्त्रियांसाठी, अशिक्षित जनतेसाठी व सर्वसाधारण संस्कृति वाढवणारे असे भाग करतां येतील; किंवा संवाद, नाटकें, काव्यगायन, पुस्तकवाचन, पुस्तकपरीक्षण व लघु व्याख्यानें असेहि भाग पाडतां येतील.

(१) अशिक्षित व खेडयांतील जनतेसाठी भूमिजनांचे कार्यक्रम ठेवण्यांत आले होते. त्यांत बातम्या, गाणीं, लावण्या व पोवाडे, संवाद, शास्त्रीय मांहिती असे विषय असत. शास्त्रीय माहिती मराठींतून अशी याच कार्यक्रमांत असे. पुढे खेड्यांतील रेडियोसेट नादुरुस्त झाले किंवा अितर कांही अंतस्थ कारणांमुळे हे कार्यक्रम बंद पडले. हे कार्यक्रम त्याच किंवा दुसऱ्या स्वरूपांत होणें अिष्ट आहे.

(२) लहान मुलांसाठी 'लेडियो प्रोग्लाम' या बोबड्या नांवाचा कार्यक्रम गुजराती व मराठी या दोन्ही भाषांतून अेका वेळीं होअी. चांदामामा (रा. चंद्रवदन मेहता) व बाळूकाका (रा. हकीम) हे लहान मुलांसाठी छोटीं गाणीं, गोष्टी पाव तास सांगत. कांही सबंध तर कांही अर्धींच वाक्यें अेकेका भाषेंत असत. मुलांना दोन्ही भाषांची ओळख करून लहानपणींच आंतरप्रांतीय स्नेहभाव वाढविण्यास हा कार्यक्रम खात्रीने अुपकारक होता. पण कांही कारणाने किंवा श्रोत्यांच्या विरोधक नाखुषीमुळे किंवा कार्यक्रमांत विशेष योजना किंवा अेकसूत्रीपणा नसल्यामुळे हाहि कार्यक्रम बंद पडला.

(३) लहानमोठ्या मुलांसाठीं कार्यक्रम. हा कार्यक्रम पूर्वी रा. वरेरकर चालवीत. पौराणिक गोष्टी, गप्पा हें त्याचें रूप असे. त्याला अगोदर तयारीची जरुरी नव्हती! रा. वरेरकरांनी मुलांना केलेला अुपदेश प्रौढांना रुचला नाही म्हणून म्हणा, किंवा अुपदेशाला मुलें कंटाळलीं म्हणून म्हणा, हे कार्यक्रम रा. प्र. के. अत्रे यांच्या स्वाधीन झाले. क्रमिक पुस्तकाचे संपादक म्हणून रा. अत्रे यांचा लौकिक आहे. रेडियोवरील यांचा आवाज प्रत्यक्ष व्याख्यानांपेक्षा मुलांना निराळाच व कमी आकर्षक वाटे. पुढे कांही दिवस मातृदिन साजरा करणारे रा. नाअीक हा कार्यक्रम चालवीत. मुलांना स्त्रियांच्या नैसर्गिक कोमल आवाजाचें आकर्षण वाटतें व मुलांनीच केलेले कार्यक्रम लोकप्रिय होतात, हें जाणून श्री. सोनूबाअी जोगळेकरांनी कांही दिवस यशस्वी रीतीने कार्यक्रम केले. पण कांही दिवसांनी यांची मुलांच्या कानांवरील पकड सैल झाली. कार्यक्रमांत विविधता व कार्यक्रमांतील ताअींच्या आवाजांत तडफ हवी, म्हणून नभोवाणीकेंद्रावरील अेक अधिकारी रा. नगरकर यांनी कार्यक्रमास निराळें वळण दिलें. बालशिक्षणाचें काम करणाऱ्या सौ. खरे यांना ताअी करून व स्वतः भाअी बनून, मुलांना आवडतील असे कार्यक्रम करण्यास सुरवात केली. मध्यंतरीं मराठी मुलांचे कार्यक्रम केवळ शॉर्ट वेव्ह(क्षिप्र लहरी)वर होअूं लागल्यामुळे पुष्कळांना हे कार्यक्रम बंद पडले असें वाटलें. सौ. जयवंत व कु. मस्तकार अशा दुसऱ्या ताअी, मावशी, तिंबूनाना, टिल्लू वगैरे लोकांनी गम्मत जम्मत संघ काढला. मुलें जास्त जमून त्यांचा ठराविक योजनेने आंखलेला कार्यक्रम होअूं लागला. या कार्यक्रमास विविधता येण्यास मुलांच्या मासिकांच्या संपादकांच्या विधायक सूचना व अनेक लेखकांचें सहकार्य कारणीभूत झालें; बालमनोविकासाची व मनोरंजनपद्धतीची विशिष्ट योजना कार्यक्रमामागे असल्यामुळे अितर भाषांतील कार्यक्रमांपेक्षा हा जास्त आकर्षक होतो, असें मुलांना वाटतें. या कार्यक्रमास जास्त वेळ मिळेल व पूर्वतयारी जास्त कसोशीने होअील तर ह्या कार्यक्रमांत सुधारणा होण्यास जागा आहे.

(४) स्त्रियांसाठी व्याख्यानें. या कार्यक्रमांत स्त्री व्याख्यात्यांनी व्याख्यानें दिलीं. बालविवाह, लग्न व घटस्फोट, लग्नसंस्थेचा घोटाळा, स्त्रियांची कलाकुसर या विषयांवर कु. घुमटकर, चंद्रकला हाटे, सौ. शांताबाअी कशाळकर, सौ. डोंगरकेरी यांनी भाषणें केलीं. हा कार्यक्रम पुढे बंद पडला. स्त्रियांना दुपारच्या फुरसतीच्या वेळीं त्यांना अुपयुक्त अशी माहिती देणारीं भाषणें जितकीं होतील तितकीं हवींच. निरनिराळ्या विभागांतील स्त्रियांनी आपापल्या प्रांतांतील स्त्रियांचें, चालीरीतींचें, मानापमानाच्या कल्पनांचें दृश्य रंगविलें. यमुनाबाअी किर्लोस्कर, आनंदीबाअी शिर्के, कमलाबाअी टिळक, सुशीलाबाअी सतर्षि, सौ. मालतीबाअी बेडेकर (कु. बाळूताअी खरे) यांनी या निरनिराळ्या प्रश्नांची यथार्थ कल्पना आणून दिली.

(५) ग्रंथवाचन व ग्रंथपरीक्षण. हे कार्यक्रम पुरेसे वाटले नाहीत. दुसऱ्याने वाचलेलें अैकण्याची आपली सवय सुटली आहे. पण बहुश्रुत होण्याचा हा अेक सोपा मार्ग आहे. प्रसिद्ध ग्रंथांतील व काव्यांतील अुतारे, आश्रमहारिणी, श्यामसुंदर, दुर्दैवी रंगू या कादंबऱ्यांचे नाट्य-

(Feature) नमुनेदार प्रयोग ग्रंथश्रवणाची सवय लावण्यास फार अुपयुक्त आहेत. ग्रंथपरीक्षक नांवाजलेले असून पुरेशा ग्रंथांचें परीक्षण झालें नाही. परीक्षण कांटेकोर होतें, पण नभोवाणी-केंद्राकडे नजर येणाऱ्या पुस्तकांवरच परीक्षण होत असल्यामुळे, पक्षपात झाल्याचा भास होअी. लेखकांचा व प्रकाशकांचा हलगर्जीपणा लक्ष्यांत घेअून, बहुतेक सर्व चांगल्या पुस्तकांवर परीक्षणें देण्याची वहिवाट पाडल्यास हें महत्त्वाचें सदर रिकामें किंवा पोकळ राहणार नाही. प्रा. विठ्ठल हरि कुलकर्णी, वामनराव जोशी, माधवराव आळतेकर, भागवत, द. के. केळकर. डॉ. घारपुरे, श्री. द. वि. काळे, अनंत काणेकर व न. चिं. केळकर हे ग्रंथपरीक्षक होते. परीक्षणें करतांना टीका वाचकांना मार्गदर्शक होअील, याकडे जास्त लक्ष्य देण्यांत यावें.

(६) लेखकाने स्वतः सांगितलेली गोष्ट. हा अुपक्रम अभिनव होता. लेखकाने आपली ताजी, अप्रसिद्ध गोष्ट स्वतः सांगितली. श्री. य. गो. जोशी, बाळूताअी खरे, कमलाबाअी टिळक, श्यामराव ओक, गीता साने, श्री. कृष्णाबाअी, अनंत काणेकर, बा. सी. मर्ढेकर अशा कसलेल्या लेखकांच्या गोष्टी अैकतांना श्रोत्यांची जिज्ञासा तृप्त झालेली दिसली. अनंत काणेकरांची गोष्ट अप्रतिम असून त्यांची सांगण्याची पद्धत फारच अुत्तम होती.

(७) याच पद्धतीचा दुसरा कार्यक्रम काव्यगायनाचा. यशवंत, वसंतविहार, सोपानदेव चौधरी, अनिल (देशपांडे), मायदेव, गिरीश, बोरकर वगैरे कवींनी स्वतः निवडलेलीं गाणीं म्हटलीं. यांपैकी बहुतेक कवि परिचयाचे असून पूर्वी अैकलेलीच कविता अशरीरिणी रूपांत अैकण्यांत तेवढी गम्मत वाटली नाही. काव्यगायनाची प्रथा मागे पडली आहे, हेंहि त्या अुदासीनतेचें अेक कारण असावें.

(८) यापेक्षा शैक्षणिक कार्यक्रमांतील दोन अुपक्रम जास्त चांगले वाटले. पुस्तकांतील भावगीतें गोड, सुरेल आवाजांत यह्लापूरकर, सांगवीकर व ज्योत्स्ना भोळे गात. साध्या सुरेल आवाजांत त्या चाली, देसाई मनोहर देशपांडे, मास्टर मोहन यांच्या तोंडून अैकण्यांत मुलांना बराच फायदा झाला व कविता कशी म्हणावी हें समजलें. त्याचप्रमाणे स्वतः कवीने आपली अेक कविता वाचून त्यांतील सौंदर्यस्थळें दाखविणें हा नवीन कार्यक्रम स्तुत्य आहे. पण सगळ्याच कवींना सौंदर्यस्थानें समजावून सांगतां येतील किंवा नाही अशी शंका मनांत डोकावते.

(९) निरनिराळ्या रेकार्ड कंपन्यांनी संवाद, नाटिका, भावगीतें मुद्रित केलीं आहेत त्याचा फायदा घेअून ह्या मुद्रिका नभोवाणींतून प्रसृत करण्यांत केंद्राला विशेष कांही परिश्रम करावे न लागतां अेक साहित्यिक कार्यक्रम करण्याचें श्रेय मिळालें. रेकार्डचें व रेडियोचें लेखनतंत्र जवळ जवळ अेकच आहे हें यावरून समजेल.

(१०) ललितवाङ्मयांत विनोदी वाङ्मय हा महत्त्वाचा भाग समजला जातो. संभाषणांतल्या अुत्तम विनोदाचा अिंग्रजी नमुना 'अिम्रोरासामी व सालोमन' या मुंबअी नभोवाणी-केंद्रावरील दुकलीच्या संभाषणांत श्रोत्यांना अैकण्यास मिळे. त्याच धर्तीवर रा. अनंत काणेकर व रा. श्यामराव ओक या प्रसिद्ध लेखकांनी 'डोके आणि बिनडोके' यांची संभाषणमाला सुरू केली. ग्रंथांत अजून रूढ न झालेली ही पद्धति पुढे पुढे जास्त आकर्षक होअूं लागली. गुंडोपंत मुंबअीस जातात या अेकाच विषयावर अेक गोष्टींची माला गुंफली गेली. अत्रे, ताम्हनकर, दीक्षित, चिंतामणराव जोशी, श्यामराव ओक, प्रभाकर कोल्हटकर व वामनराव जोशी यांच्या भिन्न भिन्न कल्पना अैकण्यासारख्या होत्या.

(११) मैदानी किंवा मर्दुमकीचे खेळ यांवर नभोवाणीकेंद्रावर अिंग्रजींतून भाषणें होतात. रा. शंकरराव किर्लोस्करांचें अेकच शिकारीवरील मराठी भाषण झालें. देशी विदेशी

खेळासंबंधी स्वयंसेवक, बालवीर व खेळाडू यांना अुपयुक्त माहिती मराठींतून देणें आवश्यक आहे. अिकडे अजून पुरेसें लक्ष गेलेलें दिसत नाही.

(१२) स्मृतिदिनाच्या निमित्ताने कांही कार्यक्रम फारच समाधानकारक रीतीने पार पडले. पंडित पलुसकर व बखलेबुवा यांच्या कार्यक्रमांत त्यांच्या आठवणी, पंडित वझे बुवा व देवधर यांनी सांगितल्या. केशवसुत, नाट्यछटाकार 'दिवाकर' यांच्या कविता व नाटकांचे व नाट्यछटांचे प्रयोग, हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांचें नाट्यीकरण व बालकवि यांच्या कवितांचें भावनापूर्ण आविष्करण, हे कार्यक्रम मराठी साहित्याच्या वाढीस अुपकारक होतात. परंतु अितर नामांकित साहित्यिकांचाहि परामर्श घेणें जरूर आहे. शिवराम महादेव परांजपे व राजा संभाजी यांचे स्मृतिदिन उद्बोधक होते.

प्रो. माधवराव पटवर्धन यांच्या आकस्मिक निधनामुळे त्यांचा स्वतःच्या कवितेवरील लेख गिरीश कवींनी वाचला. त्या वेळीं माधवरावांची ध्वनिमुद्रिका वाजविण्याचा कार्यक्रम अत्यंत हृदयस्पर्शी झाला. रेडियोतंत्राचा कुशल अुपयोग अितक्या आपुलकीने क्वचितच होत असेल. मुलांच्या कार्यक्रमांत, स्त्रियांच्या कार्यक्रमांत व अितर स्वतंत्र अशीं माधवरावांच्या स्नेह्यांचीं झालेलीं भाषणें, मुंबअी केंद्राच्या जागरुकपणाची साक्ष देतात. मराठी वाङ्मयाकडे आस्थेने पाहण्याचें दुसरें लक्षण म्हणजे

(१३) महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या मुंबअी व नगर येथील अधिवेशनांच्या वेळीं कार्यक्रमाचा थोडा भाग किंवा अध्यक्षीय भाषणाचा सारांश प्रसृत करणें हा होय. याचप्रमाणे मुंबअी, पुणें येथे होणारी हेमंत-वसंतव्याख्यानमालेंतील महत्त्वाचीं भाषणें यापुढे रेडियोवर अैकण्यास मिळतील तर बरें होअील असें वाटतें.

(१४) स्त्रियांचें कार्यक्षेत्र या लेखमालेंतील दोन व्याख्यानें बोधप्रद होतीं. राजकारणावरील सौ. अनुसूयाबाअी काळे यांचें व शिक्षकिणींसंबंधी कु. सुलभा पाळंदीकर यांचें, अधिकारी व्यक्तींस साजेसेंच होतें.

(१५) चित्रकला व कला या विषयावर कांही थोडीं उद्बोधक व क्षोभक भाषणें झालीं. कु. अंबिका धुरंधर, कला व कृत्रिमता— प्रो. कुसुमावती देशपांडे, कलेंतील चिरंतन तत्त्वें— लालजी पेंडसे, यांशिवाय आणखी बरेच वक्ते हा विषय पुढे चालविण्यास मिळतील.

(१६) आत्मचरित्र किंवा आठवणी हा प्रकार अभिनव स्वरूपांत अैकण्यास मिळाला. माझी वाङ्मयीन बाजू— वामनराव जोशी, साठी उलटल्यावर— रा. आजगांवकर, मी व सिनेमा— रा. दादासाहेब फाळके, मला वाटलं मी आधुनिक आहें — लीलावती वेलिणकर, शक्य असतें तर मी काय काय करीन— राणी राजवाडे, मी पूर्वी विड्या फुंकीत असें— अशांति, माझा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन— प्रो. फडके, मला भेटलेल्या व्यक्ति— रा. तटणीस, फ्रेंच विनोदी माणसें— शकुंतलाबाअी परांजपे, वक्त्यांच्या लकबी— रा. लेले हीं भाषणें फारच खुसखुशीत होतीं.

(१७) याच्या अुलट पंधरवड्यांतील घडामोडी— रा. लेले, मजूरवस्तींत— कानजी द्वारकादास, महाराष्ट्र मागे कां पडला!— अच्युत पटवर्धन, राममोहनराय व केशव चंद्रसेन यांचीं चरित्रें, आडनावांची पूर्वपीठिका— रा. वर्दे आणि दानपद्धति— रा. वैद्य हीं व्याख्यानें भारदस्त, विचारास चालना देणारीं पण कांहीशीं कंटाळवाणीं वाटलीं; पण मनुष्याला विचारप्रवण करण्यास असें कटु औषध हवेंच. रा. मराठे, बेहेरे, कर्वे, वामनराव जोशी, गिरिजा-

बाई केळकर, प्रा. वाटवे, धनंजयराव गाडगीळ, रँ. परांजपे यांचीं समाजशास्त्र, शिक्षण, अर्थशास्त्र यांवरील व्याख्यानें मनोरंजक व बुद्धीस चालना देणारीं झालीं.

(१८) नवा कोश यावरचें रा. न. चिं. केळकरांचें भाषण व के. नारायण काळे यांची कसें वाचावें- ही माला विद्यार्थ्यांना अुपयुक्त वाटली असेल. शुद्ध वाङ्मयीन अशींहि कांही भाषणें झालीं. मराठी काव्याची अधोगति होते काय— प्रो. मायदेव, टीकाकारास कादंबरीकाराचा सवाल— प्रो. फडके, काव्यानंद- डॉ. माधवराव पटवर्धन, लोकगीतें—रा. घाटे, महाराष्ट्राची विनोदबुद्धि— न. चिं. केळकर या भाषणांत सर्वांना गंमत वाटली. विद्यार्थ्यांना अुपयोगी पडणारीं अशीं कांही व्याख्यानें शैक्षणिक कार्यक्रमांत झालीं. वेळा सोयिस्कर नसल्यामुळे, फार ताण पडल्यामुळे, आर्थिक कारणामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांनी हे कार्यक्रम अैकले नाहीत अशी तक्रार आहे. पण प्रा. माधवराव पटवर्धन, फडके, आळतेकर यांनी चर्चिलेले कवि, नाटककार, निबंधकारांचे विशेष, माडखोलकर, वामनराव जोशी, शेजवलकर, य. ना. केळकर, प्रियोळकर यांनी साधार व मुद्देसूद शिकविलेले, अिंग्रजीचा प्रवेश, मराठीचा अुगम, नाटक, कादंबरी, बखर व विनोद या वाङ्मयप्रकारांची माहिती वगैरे विषय अभ्यासू श्रोत्यांना खास अुपयोगी पडले असतील.

(१९) संगीतावरील मनोरंजक वाग्युद्धेंहि अैकण्यास मिळालीं. शब्दांचें महत्त्व, नोटेशन, रागाची वेळ, हार्मनी, हार्मोनियमचा गोंधळ या विषयांवर खुसखुशीत चर्चा प्रो. फडके, हिराबाअी बडोदेकर, देशपांडे, प्रो. देवधर व बुखारी, प्रो. व्यास, विनायकबुवा पटवर्धन, रा. सुकथनकर व वझे बुवा यांनी केली. साधारण श्रोत्यांच्या मनावर काय परिणाम झाला असेल तो खरा.

(२०) रेडियोनाटकाचें लिहिण्याचें व अैकण्याचेंहि तंत्र नवीन आहे. ह्यामुळे लेखक कमी असूनहि लोक हळूहळू रेडियोनाटकाचे शोकी बनूं लागले आहेत. रंगभूमीवरील नाटक व सिनेमा यांपेक्षा या नाटकांत कितीतरी गोष्टी कमी. तरी पण गेल्या अठरा महिन्यांत तीस चाळीस किंवा दोनचार जास्तच नाटकें अैकावयास मिळालीं हें कांही थोडें वाटत नाही. बऱ्याच वर्षांपूर्वी रा. वरेरकर यांचें एक नाटक रेडियोवर झालें होतें. या दीड वर्षांत त्यांचें अेकहि नाटक रेडियोंत आढळलें नाही. कदाचित् आधुनिक रेडियोतंत्र निराळें झालें असेल किंवा अितर कांही कारणें असतील.

सौ. कृष्णाबाअी मोटे, शकुंतलाबाअी परांजपे, अनंत काणेकर, शुक्ल, मानकर, आपटे, प्रा. फडके, तळेकर, रांगणेकर, गुप्ते, भगवंत देशपांडे, रा. भागवत, रा. वाशीकर, श्यामराव ओक वगैरे नाटककारांनी लिहिलेलीं रेडियोनाटकें लोकप्रिय होअूं लागलीं आहेत. त्यांत, श्यामराव ओक, रांगणेकर, वाशीकर व गुप्ते हे जास्त पुढे येतील असें वाटतें.

व्याख्यानें व नाटकें 'आल इंडिया रेडियो'च्या कृपेने साप्ताहिकांत व मासिकांत कांही प्रसिद्ध झालीं आहेत. पण वाऱ्यावर सोडलेलें ज्ञान ग्रंथांत चिरस्थायी व्हावें अशी कांही योजना साहित्य परिषदेने हातीं घ्यावी.

या ठोकळ आढाव्यावरून, थोड्या मुदतींत मिळालेल्या अल्प वेळांत, विविधप्रकारचा साहित्यिक कार्यक्रम मराठींतून मुंबई केंद्राने केला आहे, असें साधारण विधान अतिशयोक्तीचें होणार नाही. या मराठी भाषेच्या कार्यक्रमाइतका भरीव कार्यक्रम हिंदी किंवा गुजराती भाषेंतून येथे झालेला नाही हें सिद्ध करण्याची जरूरी नाही. मराठी कार्यक्रमास जास्त वेळ मिळावा व अधिक भरीव कामगिरी व्हावी ही प्रत्येक वाङ्मयभक्ताची अिच्छा असणारच. 'पूर्णिमा'-

सारख्या साप्ताहिकाने, साहित्यपरिषदेने, जरूर खटपट करून विधायक सूचना केल्या पाहिजेत. नुकतेंच जें मुंबई केंद्रास सल्लागार मंडळ नेमलें आहे, त्यांत सालिसिटर सुकथनकर व राणी राजवाडे यांसारखे मराठीचे अभिमानी आहेत. ते या कामीं काय खटपट करतात व मुंबई केंद्राच्या ह्या भरीव कामगिरीस अधिक डौलदार, सर्वांगीण कसे करतात याकडे प्रत्येक मराठी भाषाभिमान्याचें व अभ्यासकाचें लक्ष्य आहे. मुंबई केंद्राची मराठी वाङ्मयाची सेवा निदान लक्ष्यांत घेण्यासारखी आहे, प्रगतिपर आहे, असें माझें स्वतःचें प्रांजल मत आहे.

साभार स्वीकार

आठवणींचे खंदक— (अेकांकी प्रहसन) ले० श्री. र. गो. टेंबे, कोल्हापूर; प्रका० श्री. बा. मो. कानिटकर, महाराष्ट्र नाट्यमंदिर, नाशिक; मूल्य ४ आणे.

शरयु— ले० व प्रका० श्री. सीताराम गणपतराव मनाठकर, हैदराबाद (द.); मूल्य ८ आणे.

जीवनप्रकाश— ले० पं. श्री. दा. सातवळेकर; प्रका० श्री. व. श्री. सातवळेकर, उषाप्रकाशन, औंध; मूल्य २ रु.

पेटतें पाणी— ले० श्री. भा. वि. वरेरकर; प्रका० श्री. दि. बा. लोटलीकर, भाई जीवनजीची गल्ली, मुंबई २; मूल्य २ रु.

वडोदें राज्यदप्तरांतील अैतिहासिक वेंचे— (भाग ५ वा) Published by Authority, State Records Department, Baroda; मूल्य रु. १-९-०.

जीवन-स्वर (कथा-संग्रह)— ले० श्री. य. ग. वझे; प्रका० श्री. य. गो. जोशी, ६२३/१५ सदाशिव, पुणें २; मूल्य १। रु.

अैतिहासिक फारसी साहित्य (तृतीय खंड)— संपादक श्री. ग. ह. खरे; प्रका० भा. अि. सं. मंडळ; पुणें.

शिवचरित्र-वृत्त-संग्रह (खंड २)— संपादक श्री. ग. ह. खरे; प्रका० भा. अि. सं. मंडळ, पुणें.

मराठवाड्यांतील अर्वाचीन मराठी वाङ्मय— ले० प्रो. चिं. नी. जोशी; प्रका० य. ग. जोशी, ६२३/१५ सदाशिव पेठ, पुणें २; मूल्य ३ रु.

नाट्यस्वरूप गडकरी— ले० श्री. शं. ना. सहस्रबुद्धे (वाईकर); प्रका० रा. वि. रहाळकर, महाराष्ट्र नाट्यमंदिर, नाशिक; मूल्य २॥ रु.

रुपेरी पडद्यामागे

[लेखक— श्री. शरच्चंद्र यशवंत गुण्ये, बी.अेस्‌सी.]

१

'मला पुनर्जन्म मिळाला तर मी टीकाकार होअीन' असे अुद्गार अेका चित्रपटनिर्मात्याच्या तोंडून नुकतेच निघालेले सर्वश्रुत आहेत. त्याचें कारण सध्याच्या टीकाकारांच्या हीन मनोवृत्तीत लपलेलें आहे. प्रत्येक वृत्तपत्रांतून हल्ली बोलपटांवर टीका येते पण तींत दोषनिदर्शनाकडे व निंदेकडेच प्रवृत्ति फार. कोणीं डोकें वर काढलेलें खालीं दाबलें पाहिजे, कोणाची कीर्ति होण्यापूर्वीच त्याची अपकीर्ति करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असलेच हेतु बहुधा असतात याच्या मुळाशीं ! प्रत्येकाला वाटतें मी फार शहाणा; अुलट कोणीं जरासा पैसा देअूं केला, की त्याची भरमसाट जाहिरात आणि स्तुति करायलाहि हेच दुतोंडे तयार !

ही फसवणूक दूर करण्याला कांहीच अुपाय नाही असें नव्हे. पण पहिली गोष्ट म्हणजे प्रेक्षकाला— मग तो टीकाकार असो किंवा साधा रसिक असो— चित्रपटनिर्माते काय करीत असतात याची प्रत्यक्ष कल्पना असावयास पाहिजे. प्रत्येकालाच ही प्रत्यक्ष कल्पना असणें कठीण आहे. रुपेरी पडद्यावर आपण पाहत असतांना त्याच्या मागे काय चाललेलें होतें, याची अप्रत्यक्ष कल्पना देण्यासाठी हें लिखाण लिहिलें जात आहे. त्याचें योग्य स्वागत होअील अशी आशा आहे.

२

आपण बोलपट पाहायला जातों. किती सोपें काम असतें तें आपल्या दृष्टीने ! अैपतीप्रमाणे चार आणे-आठ आणेपासून दोन-पांच रुपये फेकावयाचे, तिकीट घ्यायचें नि आपल्या जागेवर जाअून बसावयाचें. पुढे आपल्याला कांही त्रास नाही. अडीच तीन तासांचा सारा कार्यक्रम. तेवढा संपला की बाहेर पडायचें. मनाची करमणूक झाली, झालें. आणखी काय पाहिजे ! फार तर चार मित्रमैत्रिणींजवळ आपल्याला फार समजतें अशा रीतीने त्यावर गप्पा मारावयाच्या, 'तो शॉट छान होता', 'डायरेक्शन विशेष चांगली नाही' किंवा 'टेम्पो'च नाही मुळीं कोठे, वगैरे. नि आंघोळीच्या वेळीं बाथरूम्समध्ये त्यांतील गाणीं गुणगुणावयाचीं पण ही बेजबाबदार वृत्ति नव्हे का ?

चित्रपट तयार करणाऱ्यांनी आपले किती परिश्रम त्यांत ओतले आहेत, याचा कधीतरी विचार करतों का आपण ! अमेरिकेंतील शेकडो, हजारों लोकांची तीन वर्षांची अहोरात्र मेहेनत झाली, तेव्हा सत्तर मिनिटांचें Snowwhite and the Seven Dwarfs (हिमगौरी आणि सात बुटके) हें व्यंगचित्र तयार झालें ! अमुक अेका व्यक्तीचें काम चांगलें किंवा वाअीट असें ठोकून देतांना त्याच्या तसल्या कामाची खरी जबाबदारी कोणावर होती, याची आपल्याला माहिती तरी असते काय ! कधीमधी स्टूडिओ पाहायला म्हणून जाणारे लोक शूटिंग दाखवण्याचा अतिशय आग्रह करतात, तेव्हा मला तर गंमतच वाटते. कारण निवळ शूटिंग पाहणें हें अतिशयच कंटाळवाणें असतें. तें कांही नाटकाप्रमाणे, सारखें अेकामागून अेक घेतलें

जातेंच असें नाहीं. अेक पात्र बोलावयाचें थांबलें, की मग दुसरें पात्र बोलणार; किंवा तीं दोन पात्रें पडद्यावर जशीं अेकमेकांशीं बोलतांना दिसतात, तशींच शूटिंग चालू असतांना दिसतील, असेंहि नाही. किंबहुना ज्या अेकदोन पात्रांचीं कामें चाललेलीं असतील, तेवढीं सोडून बाकीच्या पात्रांनी तर रंगसुद्धा लावलेला नसतो, आणि तीं त्या जागेवर नसतातहि! अेकामागून अेक घडतांना दिसणारे पडद्यावरील प्रसंग कधी कधी महिन्यामहिन्याच्या, आणि कधी तर शूटिंगच्या सुरवातीच्या आणि शेवटल्या दिवशीं, अशा अंतरानेहि घेतलेले असतात. शूटिंग ही चित्रपटाची अेक पायरी आहे. केवळ अेकच पायरी पाहून काय कल्पना करतां येणार!

बोलपट हा शेवटीं चित्रकथेच्या स्वरूपांत आपल्याला दिसतो. पण त्याची अगदी पहिली पायरी पुस्तकांतील साध्या प्रसंगप्रधान कथेसारखी असते. पुढे तिच्यांत संवाद-गाणीं घालून अेखाद्या नाट्यकथेचें स्वरूप तिला आलें, म्हणजे मग तिसऱ्या अवस्थेंत पदार्पण करण्याचा तिला परवाना मिळतो. या वेळीं, म्हणजे चित्रीकरण (शूटिंग) चालू असतांना, तिची फारच अनुकंपनीय स्थिति होते. तिचे शेकडो, हजारो तुकडे केले जातात. आणि या सर्व तुकड्यांचें सोयीप्रमाणे चित्रीकरण होतें. या काळांत तिचे वाटेल तसे हाल होतात. कधी कलादिग्दर्शकाच्या लहरीसाठी, कधी दिग्दर्शकाच्या डोळ्यांना नीट दिसण्यासाठी, तर कधी कॅमेऱ्यांत नीट अुतरण्यासाठी आणि कधी ध्वनिलेखनयंत्रासाठी, तिला बाजूला राहून या सर्वांना जागा करून द्यावी लागते. आणि अशी जागा करून दिल्यावर मग हे तंत्रज्ञ तिचें व्यक्तीकरण करतात! सगळ्या तंत्रज्ञांच्या तब्येती संभाळतां संभाळतां बिचाऱ्या कथेच्या नाकीं नअू येतात आणि शेवटीं तर आपलें स्वतःचें अस्तित्वच तिला विसरावें लागतें. मात्र या संकटांतून तिला संकलन करणारा (Editor) तारून नेतो. चित्रित झालेल्या सर्व तुकड्यांचें नीट निरीक्षण करून, योग्य तो तुकडा योग्य त्या जागीं बसवून, तो तिला चित्रकथेचें स्वरूप देतो, आणि मग ती चित्रकथा पडद्यावर येते.

साध्या प्रसंगप्रधान कथेपासून सुरवात करून, बोलपट म्हणून पडद्यावर येअीपर्यंत शेकडो लोकांचें, मिळून मिसळून केलेलें कार्य आहे हें. कमींत कमी चार महिन्यांचे अविश्रान्त श्रम खर्चीं पडतात त्यासाठी. पण श्रम जितके कष्टाचे तितकेच मौजेचेहि आहेत. आणि दूर अुभें राहणाऱ्याला तर फारच मौजेचे!

३

बोलपट काढायचा ठरल्यानंतर पहिलें काम कथालेखनाचें. मग ती कथा निवडतांना शंभरजण बसून ठरवोत वा अेकटाच. बहुशः पैसे खर्च करणारा आणि दिग्दर्शक या दोघांची सरशी कोठेहि होतेच. त्यांतहि पहिल्याची जास्त. कारण त्याला थोडा पैसा घालून पुष्कळ पैसा मिळवायचा असतो, नव्हे पैसा मिळविणें हें त्याचें ध्येय— छेः धंदाच असतो. अर्थात् कला, तंत्र यांचा फारसा विचार न करतां, पैसा हीच त्याची दृष्टि असते. म्हणूनच पैसा मिळविणारी कसलीहि सामाजिक, पौराणिक, अैतिहासिक, काल्पनिक कथा घ्यायला त्याची हरकत नसते.

जनतेला दुःखान्तिकेपेक्षा सुखान्तिका जास्त आवडते; कारण दुःखान्तिका समजण्याला बरीच कठीण असते; शिवाय केवळ मनोरंजनासाठी आलेला प्रेक्षक दुःखान्तिका पाहून जास्तच रंजीस येतो; त्यापेक्षा सुखान्तिकेचा आनंद त्याला अधिक हवासा वाटतो. सुखान्तिका विनोदाने भरलेली असली, म्हणजे ती जास्तच आवडते लोकांना; आणि हीन दर्जाच्या विनोदावर आधारलेल्या सुखान्तिकेला सामान्य जनता आपला अुदार आश्रय देते, हेंहि चित्रपटनिर्मात्यांचें अेक सूत्रवाक्य आहे.

कथा आणावयाची कोठून हा फारसा कठीण प्रश्न नाही. नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा, दीर्घकथा यांचा अेवढा ढीग निर्मात्यापुढे असतो. शिवाय बोलपटासाठी कथा लिहून ठेवली नाही, असा लेखक विरळाच. शेकडो लघुकथा साभार परत आल्या, तरी अेखादा खास नमुना कुठल्या तरी फिल्म कंपनीकडे पाठवल्याशिवाय नवशिका लेखक राहात नाहीच. या सर्व कथांतून आपल्याला अगदी पाहिजे तशी कथा निवडायला मुळीच वेळ लागत नाही. याशिवाय फिल्म कंपनी आपल्या स्वतःसाठी खास कथालेखक घेते, ते निराळेच. आणि तरीहि अेखादी खास कथा रुपेरी पडद्यावर भिकार दिसतेच!

कथेची निवड चित्रपटाच्या लांबीशीं सुसंगत पाहिजे. देशी चित्रपट सुमारें १२ ते १४ हजार फूट लांब असतात आणि विदेशी ७ ते ९ हजार. हिंदी बोलपटांतून गाण्यांची हकालपट्टी पूर्णपणें करणें आज तरी शक्य नाही; पण दोन हजार फूट लांबी केवळ गाण्यांकरिता दिली तरी अेकंदर चित्रपट १० ते ११ हजार फुटांत बसेल, तर फार बहार होओील–हल्लीची, कंटाळवाणी कथा सुटसुटीत आणि आटोपशीर होओील. चित्रासाठी करावयाच्या खर्चावरहि कथेची निवड थोडीफार अवलंबून राहील. समुद्र, आगबोटी, आग्रा–दिल्लीसारखीं लांबचीं स्थळें, यांची आवश्यकता चित्रपटांत असेल, तर तो फारच खर्चाचा होओील. या सर्व गोष्टी लक्षांत घेअून कथा निवडावयाची.

कथा– मग ती कोणत्याहि प्रकारची असो– तिला स्वतःचें वैशिष्ट्य असें कांहीतरी लागतेंच. लोक नावीन्यप्रिय असतात. नावीन्य कशाहि प्रकारचें असलें तरी चालतें; कारण केवळ नावीन्यासाठीच हजारो लोकांची दृष्टि खेचली जाते. कांहीतरी नवीन, अेवढेंच पैसा मिळवायला, कौशल्य दाखवायला आणि जाहिरात करायला पुरेसें आहे. आचार्य अत्रे यांनी आपल्या अेका व्याख्यानांत सांगितलेली लघुतम कथा नावीन्याने कशी भरलेली आहे पाहा.

ती पुढे जात होती;
तो तिच्या मागे लागला होता;
तिने मागे वळून पाहिलें;
ती त्याची बहीण होती;
तो मूर्च्छित पडला.

गोष्ट किती लहान आहे! पण तिच्या नावीन्याने ती वाचकाची, श्रोत्यांची नजर खेचून घेते. पण ही कथा निवडली तरी ती पडद्यावर जशी दिसणार आहे, आणि त्यापूर्वी ज्या ज्या स्थित्यंतरांतून ती जाणार आहे, त्या सर्वांची स्पष्ट प्रतिमा कागदावर आणि निर्मात्याच्या मनःपटलावर दोन्ही ठिकाणीं पाहिजे. देशी चित्रपटनिर्माते या गोष्टीकडे फारसें लक्ष्य देत नाहीत. चित्रकथा, चित्रलेखन आणि संकलन, यांपैकी मधली स्थिति ही सर्वांत कमी महत्त्वाची. पहिल्या स्थितींतून तिसरींत जाण्यासाठी ती मधली स्थिति लागते अेवढेंच. दिग्दर्शकाने अुत्कृष्टपणें दिग्दर्शिलेलें, कसलेल्या नटांनी वठवलेलें आणि छाया व ध्वनिलेखकांच्या पसंतीस अुतरलेलें दृश्य देखील, कधी कधी रुपेरी पडद्यावर प्रेक्षकांच्या दृष्टीने वाअीट ठरतें. याला कारण रसपरिपोषाचा अभाव. असा कांहीतरी प्रकार होअूं नये, म्हणून प्रथमच कथेचें पडद्यावरील अंतिम स्वरूप काय होणार, तें ठरलें पाहिजे.

कथेची निवड झाल्याबरोबर ती दिग्दर्शक आणि चित्रकथालेखक यांच्या स्वाधीन केली जाते. मग दिग्दर्शकाने सांगावयाचें आणि चित्रकथालेखकाने लिहावयाचें. या वेळीं प्रथमतः साध्या कथेचें दृश्य कथेंत रूपान्तर होतें. दृश्य कथा (Treatment)

म्हणजे मूळ कथेचें, ती पडद्यावर येअूं शकेल अशा रीतीनें केलेलें विस्तृत रूपान्तर. अर्थातच हें मूळ कथेपेक्षा बरेंच मोठें, पण चित्रकथेपेक्षा फारच लहान असतें. दृश्यकथेंत प्रसंगांचीं वर्णनें, त्यांचा क्रम आणि साधारणपणें कथेचा ओघ कसा वाहत जाणार याचें विवरण असतें, पण हें विवरण साध्या भाषेंत असतें. कादंबरी लिहितांना हातीं घेतलेलें सूत्र मध्येंच सोडून देअून दुसरें घ्यावें लागतें. नाटकांत अेक प्रवेश अेका ठिकाणचा, दुसरा दुसरीकडचा असे आलटून पालटून दाखवावे लागतात आणि सर्व सूत्रांची मिळून विणलेली कथा शेवटीं अुकलते किंवा गुंतून बसते. तसेंच चित्रकथेचेंहि आहे. साध्या कथेचें कोणतें सूत्र कोठे तोडावयाचें आणि कोणतें हातीं घ्यावयाचें, कथासूत्रें विणावयाचीं कशीं आणि अुकल कोठे करावयाचा, हें या दृश्यकथेंत ठरवावयाचें असतें.

कथेचीं सूत्रें (Sequences) किती हा अर्थातच पहिला प्रश्न आहे. 'ती' पुढे जात होती आणि 'तो' तिच्या मागे लागला होता, ह्या दोन्ही घटना मिळून अेक सूत्र आहे. कारण या दोन घटनांनी प्रेक्षकाला कांहीं अनुमानें पूर्णपणें कळलीं आहेत. त्यानंतर 'ति'ने मागे वळून पाहिलें हें अेक स्वतंत्र सूत्र आहे. याच सूत्रांत 'ती' पाहत होती ही गोष्ट 'तो'ला दिसली हेंहि नमूद करावयास पाहिजे. 'ती' 'तो'ची बहीण होती, हें प्रेक्षकांना मोठ्या खुबीने कळविलें पाहिजे आणि याच ठिकाणीं कथालेखकाची खरी परीक्षा आहे; कारण 'तो'ला हा अुलगडा होतांच 'तो' मूर्छित पडला, हा याच सूत्राचा अुत्तरभाग आहे; शिवाय या अेकाच सूत्रांत प्रेक्षकाच्या मनश्चक्षूसमोर अुभ्या राहिलेल्या शेकडो कल्पनांचा व्यूह अेकदम ढासळावयाचा आहे आणि प्रेक्षकाचा अपेक्षाभंग होणार आहे. जी गुंतागुंत पहिल्या दोन सूत्रांत होत आली आहे तिची या सूत्रांत अुकल आहे. यासाठी सूत्रबद्धता न तुटतां जोड सांधला गेला पाहिजे.

गोष्ट सांगतांना आपण मध्येच 'अिकडे काय झालें', 'त्याच वेळीं दुसरीकडे', असे शब्द घालून दोन्ही सूत्रें सारखीं चालू ठेवतों; पण मध्येच सोडलेला धागा पुनः हातीं घेतांना नेमका त्याच जागीं घेतों; तशीच काळजी चित्रकथेंतहि घ्यावी लागते. अेका सूत्रांतून दुसऱ्यांत जातांना, तोडण्यापेक्षा वळून गेलेलें बरें असतें. रा. खांडेकर यांनी 'सुखाचा शोध' ही आपली कादंबरी लिहितांना, या गोष्टीचा अुपयोग फारच कौशल्याने केलेला आहे. अगोदरच्या प्रकरणांतील शेवटलें वाक्य, हें नंतरच्या प्रकरणांतील पहिलें वाक्य आहे; पण पहिल्या वाक्याचा संबंध कथेच्या ज्या भागाशीं निगडित आहे, त्याशीं दुसऱ्या वाक्यांचा संबंध असलेल्या भागाला कांहीच कर्तव्य नाही. म्हणजे अेकाच वाक्याने अेका सूत्राचा शेवट, तर दुसऱ्याची सुरुवात साधली आहे. असें वळून गेलें म्हणजे सूत्र तुटल्यासारखें वाटत नाही.

प्रत्येक कथेंत हें वळून जाणें, साधेलच असें नाही. कोठेतरी, कधीतरी अेखाद्या असंबद्धतेच्या खंदकावर पूल घालावा लागतोच. त्या वेळीं अेखाद्या मूक शीर्षकाचा अुपयोग करतात. 'त्याच रात्रीं', 'बारा वर्षांनंतर', 'मुंबअी' असलीं अुभयान्वयी शीर्षकें तर नेहमीच पाहण्यांत येतात. आणखी मार्ग म्हणजे घड्याळाचे कांटे सरकलेले दाखविणें, कॅलेंडरचीं पानें अुलटणें वगैरे आहेत. विशेषप्रसंगीं शामदानांतील पेटती मेणबत्ती पूर्णपणें जळून गेली आहे, असें दाखविणें; किंवा देवापुढील जळत्या समअींतील तेल हळू हळू संपून जात आहे, असलेहि अुपाय अवलंबतात. लॉरेल आणि हार्डी यांच्या 'दोन मठ्ठ' (Block Heads) या बोलपटांत, पुष्कळ दिवस गेले असें दाखविण्यासाठी, फरूटसचा अेक डबा रोज सकाळीं फोडला जात असे, असें प्रथम प्रेक्षकास कळविलें. नंतर दुसरें सूत्र हातीं घेअून पुनः पहिल्या सूत्रावर येतांना फरूटसच्या डब्यांचा भला थोरला ढीग जमला आहे, येथून सुरुवात केली. अर्थातच डब्यांच्या संख्ये-

अितके दिवस गेले, ही प्रेक्षकाची कल्पना सहज धावते. पण शक्यतोवर असले पूल टाळणेंच श्रेयस्कर. क्वचित् प्रसंगीं फिल्म खूप लांब करण्यापेक्षा मूकशीर्षक परवडतें, पण तें शक्य तेवढें लहान आणि अर्थगर्भ असावें लागतें.

कालखंड सांधून तयार झालेली दृश्यकथा, चित्रलेखक, ध्वनिलेखक, कलादिग्दर्शक, संकलन करणारा, स्टूडिओचा व्यवस्थापक आणि संगीतदिग्दर्शक यांच्या सभेपुढे वाचली जाते. बहुशः चित्रकथालेखकच वाचतो ती आणि मग तीवर सर्वजण मनमुराद चर्चा करतात. सर्व सूचना आणि टीका यांचा संग्रह करून, आवश्यक ते फरक ताबडतोब करून, चित्रकथालेखक दृश्यकथेचा शेवटला मसुदा तयार करतो.

कथेला सुरुवात, मध्य आणि शेवट असावीं लागतात. सुरुवात आकर्षक, नाट्यमय किंवा अचानक पकड घेणारी असली, तर पहिला जोर शेवटपर्यंत कायम राहणें जरूर आहे. नाहीतर संथपणें सुरुवात करून, हळू हळू पात्रांची माहिती पुरवीत पुरवीत, पुढे जसजसे भावनोत्कट प्रसंग येतील तसतशी माहिती वाढविणें, हा श्रेयस्कर मार्ग. प्रथमपासून संथ ठेवून पुढे जलद जाणें चांगलें.

मध्य हा नेहमींच कठीण असतो. कारण या वेळीं झालेली लहानशी चूकहि प्रेक्षक सहन करीत नाही. प्रेक्षकाचें मन याच वेळीं खेचून, ताणून धरावें लागतें; त्याला गुंगवून ठेवावें लागतें. सुरुवात चांगली नसली, तरी पुढे काय होणार या अुत्सुकतेने प्रेक्षक मध्यापर्यंत थांबतो, पण त्याने 'अगदीच वाअीट आहे' असा शेरा मारण्यापूर्वी त्याला कांहीतरी मनोरंजक पाहिजे असतें.

आणि शेवट! तो शेवटच असला पाहिजे. पुढे काय हा प्रश्न पुनः येतां कामा नये. कोणतेंहि पात्र किंवा वर्ण्य विषय त्रिशंकूसारखा अधान्तरीं लोंबकळत राहूं नये. प्रेक्षकाचें पूर्ण समाधान तेथे झालेंच पाहिजे. अुत्तम शेवट साधण्याचा मार्ग म्हणजे क्रमाक्रमाने मध्यानंतर अुत्तरभाग जलद करणें हाच होय. ही जलदी पुढे पुढे सपाटून जोरांत वाढती केली की शेवट अुत्तम होतो.

चित्रपट कोणत्या स्वरूपांत मांडावयाचा आहे, याचाहि विचार येथेच करतात. मूक चित्रपट म्हणजे फक्त हावभाव आणि हालचाली दिसावयाच्या, पण आवाज अैकूं यावयाचा नाही, किंवा नुसतें पार्श्वसंगीत अैकूं यावयाचें,—जसे चार्ली चॅप्लिनचे चित्रपट,—हे आता जुने झाले आहेत.

सर्व हालचाली आणि बोललेलीं भाषणें, गाणीं, शिवाय ठिकठिकाणीं रसपरिपोषासाठी पार्श्वसंगीत आणि अितर हालचालींचे द्योतक ध्वनि, हा शंभर टक्के बोलपट आधुनिक प्रगतीचें शेवटलें टोंक होय. पडद्यावर व्यंगचित्रें दाखवायचीं कीं प्रत्यक्ष माणसें हेंहि पाहावयास पाहिजे. व्यंगचित्रें अमेरिकेंत बरींच यशस्वी ठरलीं आहेत. 'Snowwhite and the Seven Dwarfs' (हिमगौरी आणि सात बुटके) हें तर अमेरिकेचें अुच्चांक पटकाविणारें चित्र ठरलें आहे. तरीपण अशासाठी लागणारे श्रम, पैसा आणि काल यांचा व्यय करणें अेतद्देशीयांना किफायतशीर नाही, हें प्रभातच्या 'जंबूकाका'वरून दिसून आलेंच आहे. आणि तसें कोणाहि पैसे खर्च करणाऱ्याला परवडणारहि नाही. म्हणून शंभर टक्के बोलका चित्रपट काढणें आणि पडद्यावर माणसें दाखविणें हाच मार्ग तो पसंत करील.

बोलपटासाठी दृश्यकथा कशी असावी, तें आता पाहूं. शेवटला मसुदा करतांना अेका बाजूस चित्रांचें वर्णन आणि दुसऱ्या बाजूस ध्वनीचें वर्णन देत जातात.

चित्र	ध्वनि
मुख्य शीर्षक : तो आणि ती अुपशीर्षकें : दिग्दर्शक : श्री. दर्शने चित्रकथालेखक : श्री. लिखिते छायालेखक, ध्वनिलेखक अित्यादि	प्रथम ट्रेडमार्क; नंतर हळू हळू आनंदसूचक संगीत.

या कथेंत प्रथम प्रेक्षकाचें लक्ष 'ति'च्याकडे वेधावयाचें आहे; अितकेंच नव्हे तर 'तो' तिच्यामागे लागला आहे, हेंहि ध्वनित करावयाचें आहे; म्हणून प्रथम तिच्या केशभूषेवरून केलेली सुरुवात परिणामकारक होअील. तिच्या वेणींतील गुलाबाचें फूल आकर्षक असणें अगदी स्वाभाविक आहे.

शीर्षकांनंतर प्रथम तिच्या वेणींतील गुलाबाचें फूल पडद्यावर दिसतें. हळू हळू तिची वेणी आणि नंतर ती.	तेंच आनंदसूचक संगीत पुढे चालू.

आता ती दिसल्यावर तिचें मागे लक्ष नाही आणि ती आपल्या रंगांत दंग होअून झपाट्याने पुढे जात आहे, व तो तिच्या मागे लागला आहे, हें दाखवावयाचें आहे.

तिचें पाठमोरें चित्र. ती रस्त्यांतून झपाट्याने मागेपुढे न पाहतां जात आहे अशीं दृश्यें. पण तो मात्र प्रथम तिची झटपट पाहून चमकला आहे. नंतर ती कोणीतरी अशीच आहे असें वाटून अधीरतेने ती कोठून कोठून जात आहे यावर सारखें लक्ष ठेवीत तिच्या पाळतीवर आहे अशीं दृश्यें.	रस्त्यांतील लोकांचा आवाज. मधून मधून तिचीं व त्याचीं दृश्यें येतील तेव्हा त्यांचे त्रासिक अुद्गार.

या ठिकाणींहि प्रेक्षकांना ती पाठमोरीच दिसत राहिली पाहिजे. तो मात्र निरनिराळ्या दृष्टिकोनांतून. असें केलें म्हणजे प्रेक्षकाची अुत्कंठा तिच्याविषयी आणि अेकंदर कथेविषयी सारखी वाढत जाअील. या वेळीं ती त्याची बहीण आहे हें त्याला कळलेलें नाही असें प्रेक्षकांना सांगावयास पाहिजे, म्हणून त्याचा अेखादा मित्र त्याला रस्त्यांत भेटवून त्याच्या तोंडीं तिजविषयी कांही वाक्यें घातल्याने अुद्दिष्ट कार्य साधेल. हळुहळू प्रेक्षकाचें मनहि गोष्टींत गुंगून जाअील. या सर्व गोष्टी, अनुभव आणि विचार यांनी हळुहळू अंगांत मुरतात. जें सांगावयाचें आहे आणि ज्याविषयी सांगावयाचें आहे, त्या दोन्ही गोष्टींवरून प्रेक्षकाच्या मनाची पकड कधीहि हलतां कामा नये, यांतच दृश्य-कथालेखनाचें सारें यश आहे.

४

दृश्यकथा तयार होईपर्यंतचें कार्य तंत्र नसलेलें असें (Non-technical) होतें. पण यापुढे बोलपटतंत्राचा अवलंब करण्याशिवाय मार्गच अुरत नाही. त्यासाठी ठिकठिकाणीं तांत्रिक शब्द आणि त्यांची परिभाषा अवगत व्हावी लागते. कित्येक शब्दांचा अर्थ कळण्यासाठी पडद्यावर पाहून तो अनुभवावा लागतो.

चित्रकथा (Scenario) म्हणजे दृश्यकथेचें चित्रांत रूपान्तर करतांना, कोणकोणत्या गोष्टी कशा चित्रित करावयाच्या आहेत, यांची संपूर्ण नोंद. तें जितकें विस्तृत आणि खुलासेवार असेल तितकें जास्त चांगलें. कधीकधी अैनवेळीं सोयीसाठी, किंवा चित्रीकरणस्थानीं अेकदम कांही सुचलें, तर चित्रकथेंत बदल करावा लागतो; पण तसें न होअूं देण्याची खबरदारी घेतली जाते. कारण अशा अैनवेळीं केलेल्या बदलाची पूर्ण काळजी कथेंत घेतलेली नसल्यामुळे, संकलनाच्या वेळीं घोटाळा अुडण्याचा संभव असतो; आणि चुका दुरुस्त करायला मग तर वेळच नसतो.

दृश्यकथा समोर टेवूनच चित्रकथा लिहिली जाते. पण तिचें केवळ रूपान्तर करणें हें ध्येय नसतें. निरनिराळ्या तंत्रज्ञांच्या दृष्टीने असलेल्या महत्त्वाच्या गोष्टींची नोंद, प्रत्येक पात्राच्या हावभावांचें योग्य वर्णन, तींत असतें. सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे बोलपटाचा 'टेम्पो' (लय, गति) शेवटपर्यंत कायम टिकविलेला असतो. चित्रकथेंत दिलेल्या सर्व सूचना पाळल्याच पाहिजेत असा नियम नाहीं, पण टेम्पोसाठी असलेल्या सूचना मुळीच तिरस्कारतां अुपयोगी नाही. चित्रकथेने रसपरिपोष साधावयाचा असतो. तंत्रज्ञांवर हुकमत गाजवावयाची नसते. आता रसपरिपोष कोठे संथ पाहिजे आणि कोठे जलद पाहिजे, हा प्रश्न पुढे अुभा राहतो. जेथे प्रेक्षक अधीर झाले असतील, तेथे त्यांना अधिक अधीर बनविण्याकरिता काय केलें पाहिजे, हें येथेच सूचित केलें जातें. कॅमेरा, कॅमेराक्षेत्रांतील प्रत्येक पात्र, त्याचे हावभाव, त्याचे आवाज, या सर्वांमिळून असा परिणाम झाला पाहिजे, की प्रेक्षक आता पुढे काय होणार, याची अधीरतेने वाट पाहूं लागेल. सारांश, अिष्ट परिणामासाठी कोणकोणते मार्ग अवलंबिले पाहिजेत, या गोष्टींची नोंद चित्रकथेंत असते.

पडद्यावर दिसणारें प्रत्येक दृश्य कॅमेरा अेका जागीं ठेवून घेतां येणें शक्य नाही. कॅमेऱ्याचा दृष्टिकोन बदलला म्हणजे शॉट बदलतो. कधी कधी दृष्टिकोन संथपणें बदलत जावा म्हणून कॅमेरा अेखाद्या गाडींत– तिला ट्रॉली म्हणतात– किंवा क्रेनमध्ये ठेवून शॉट घेतात. त्या वेळीं मात्र दृष्टिकोन बदलला तरी शॉट चालूच समजला जातो. असे शॉट्स् छाया आणि ध्वनि या दोन्ही प्रकारांनी चित्रित करून ठेवतात आणि अगदी शेवटल्या स्थितींत ते जोडतात. अेक हजार फुटांत सुमारें सत्तर ते अैशी 'चित्रावली' (शॉट्स्) असतात. म्हणजे प्रत्येक शॉट सुमारें १२ ते १५ फूट असतो. या प्रत्येक शॉटला अेक क्रमांक दिलेला असतो. आणि त्यावरून तो झट्कन् शोधून काढतां येतो. प्रत्येक सूत्राचा मुख्य क्रमांक आणि शॉट्चा गौण क्रमांक यांचा मिळून हा अंक बनतो. "सूत्र क्रमांक १ शॉट् क्रमांक १" हा पहिल्या सूत्रांतील पहिल्या शॉट्चा क्रमांक झाला.

अेकच लहानशी गोष्ट निरनिराळ्या दृष्टिकोनांवरून पडद्यावर दाखविली जाते. कधी जवळून पाहिल्यासारखी, तर कधी दुरून पाहिल्यासारखी; कधी तमासगिराच्या दृष्टिकोनांतून तर कधी नायकनायिकांच्या. हा निरनिराळा दृष्टिकोन कॅमेरा वेगवेगळ्या ठिकाणीं ठेवून व त्यांतील भिंग (Lens) बदलून, साधतां येतो. प्रत्येक शॉट्साठी नवीन दृष्टिकोन—Camera

Angle—वापरतात आणि दृष्टिकोनाचें नांव चित्रवस्तूच्या त्यांतून दिसणाऱ्या आकारावरून ठेवतात.

(१) बिग् क्लोज् अप् : यांत चित्रवस्तु सबंध पडद्याअेवढ्या आकाराची असते; म्हणजे दृष्टिकोनांत या वस्तूशिवाय दुसरें कांहीच नसतें. सूक्ष्मदर्शक यंत्रांतून चित्रवस्तूकडे पाहावें अशा प्रकारचें हें चित्र असतें. चित्राच्या चौकटीच्या वरच्या कडेला केस आणि खालच्या कडेला हनुवटी लागेल, अेवढा चेहेऱ्याचा भाग या दृष्टिकोनांतून दिसतो.

(२) क्लोज् अप् : पडद्यावरील चित्राचे चौकटींत केसांचे वर सुमारें चार बोटें आणि खांद्यापर्यंतचा भाग ज्यांतून दिसेल असा दृष्टिकोन. यांतून चित्रवस्तु चांगली निरीक्षण करतां येते.

(३) मिडियम् क्लोज अप् : पडद्याची लांबी रुंदीपेक्षा जास्त असते; त्यामुळे अशा दृष्टिकोनांतून दोन माणसांचें दंडांपर्यंतचें चित्र सहज दिसूं शकतें.

(४) क्लोझ् शॉट : या चित्रांत दोन किंवा तीन माणसें बसलेलीं पूर्णपणें अथवा अुभीं मांड्यांपर्यंत येअूं शकतात. याचाच अुपयोग हल्लीच्या तंत्रांत फार वेळां होतो.

(५) मिड् शॉट् : यांत क्लोझ् शॉट्पेक्षा थोडा जास्त भाग दृग्गोचर होतो. पण या वेळीं चित्रवस्तूपेक्षा स्थलनिर्देशाला जास्त महत्त्व असतें.

(६) मिडियम् लॉंग् शॉट् : अुभ्या पुरुषाच्या डोक्यावर चार बोटें आणि पायांखाली चार बोटें अेवढ्या जागेचा समावेश असल्या शॉट्मध्ये होतो. यांत सात आठ माणसें सहज अेकत्र दाखवितां येतात.

(७) लॉंग् शॉट् : लोकांचा लहानसा घोळका, अेखाद्या अिमारतीचा बराचसा भाग वगैरे दाखविण्यासाठी या शॉट्चा अुपयोग होतो.

(८) डिस्टन्स शॉट् : दुरून घेतलेल्या लॉंग शॉटलाच हें नांव देतात. अेखादा मोठासा डोंगर, सबंध शहराचा टेकडीवरून घेतलेला देखावा, दोन सैन्यांची चकमक, घोड्यांवरून चाललेले स्वार, अशा चित्रांसाठी या शॉट्चा अुपयोग होतो.

ही परिभाषा पुष्कळ प्रेक्षकांनाहि अवगत असते. याशिवाय कांही तांत्रिक परिभाषा चित्रकथालेखकासाठी आवश्यक आहे. कथा लिहितांना या परिभाषेचीहि जरूरी भासते. न वापरली तर घोटाळा अुडतो. (अपूर्ण)

संपादकीय

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या अनेक कार्यांपैकी, महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेचें संपादन-प्रकाशन, हें कार्य जास्तींत जास्त मतभेदांना अवसर देणारें आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाही. साहित्यपत्रिकेचें स्वरूप काय असावें, तिचें धोरण काय असावें, तींत कोणते विषय यावेत न यावेत, या प्रश्नांबाबत मतामतांचा अेवढा गलबला अैकूं येतो, की पत्रिकेचे सर्व ग्राहक, वाचक व हितचिंतक, यांच्या भिन्न भिन्न अपेक्षा अेकसमयावच्छेदेंकरून पुऱ्या करूं शकेल, असा सर्वंकष अभिरुचीचा संपादक अजून या जगांत जन्मालाच यावयाचा आहे, अशी माझी समजूत आहे.

अशा परिस्थितींत, श्री. ना. गो. चापेकर, प्रो. द. वा. पोतदार, कै. डॉ. मा. त्रिं. पटवर्धन, श्री. मो. शा. शहाणे, अित्यादि पट्टीच्या साहित्यपण्डितांना जें संपूर्णतया साध्य करतां आलें नाही, तें मला साध्य होअील, असा मलताच भरंवसा मी मुळीच बाळगीत नाहीं, हें आरंभींच नम्रपणें नमूद करून ठेवणें बरें !

साहित्यपत्रिकेच्या संपादकत्वाची ही जबाबदारी, 'जें अितरांना साधलें नाही तें मी करून दाखवीन', या अहंभावाच्या हिरीरीने मीं आपण होअून अंगीकारलेली नाही; किंवा मान्यवर साहित्यिकांनी शोभवलेल्या स्थानावर आरूढ होण्याचा मान विनासायास पदरीं पडत आहे, तो कां डावला, या खोट्या मोठेपणाच्या कल्पनेनेहि, ही जागा मीं हस्तगत केलेली नाही; तर कार्यकारी मंडळाने विश्वासपूर्वक मला जी आज्ञा केली आहे, तिचें परिपालन करणें हें माझें कर्तव्य आहे, या नम्र भावनेनेच मीं ती स्वीकारिली आहे; व शक्य तितक्या चांगल्या रीतीने मी ती यथाशक्ति पार पाडण्याचा प्रयत्न करीन, असा मला विश्वास आहे.

संपादकाच्या पदावर कोणीहि व्यक्ति असली, तरी तिच्या अभिरुचीला व कल्पकतेला, कांही ना कांही स्वभावविशिष्ट मर्यादा असणारच. साहजिकच कुणाहि संपादकाकडून झालेल्या मजकुराची व विषयांची निवड व मांडणी, सर्वच्या सर्व वाचकांना सारखीच रुचेल किंवा योग्य वाटेल, अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे; यामुळे साहित्य-पत्रिकेच्या संपादनाबाबत, जें धोरण मीं मनाशीं योजिलें आहे, त्याचा निर्देश या पहिल्याच अंकांत करणें अिष्ट ठरेल, असें मला वाटतें.

साहित्य परिषदेचे आता जवळ जवळ अेक हजार, किंबहुना अधिकच, सभासद झाले असल्यामुळे, साहित्यपत्रिकेचा वाचकवर्ग आता पूर्वीप्रमाणे अेकजिनसी साहित्यिकांचा राहिलेला नाही, अशी कल्पना करणें चूक ठरणार नाही. सामान्यतः साहित्यप्रेमी अशा वाचकांची आता पत्रिकेच्या ग्राहकांत बरीच भर पडली असल्यामुळे, पत्रिकेचें अंतरंग आता कांहीसें अधिक सार्वजनिक स्वरूपाचें होणें आवश्यक आहे, असें मला वाटतें. पत्रिकेच्या मूलभूत अुद्देशांना व ध्येयांना धक्का न लावतां, जर तिला किंचित् अधिक लोकच्छंदानुवर्ती करतां आलें, तर त्यांत कांही वावगें झालें, असें कोण म्हणेल ? चर्चात्मक, संशोधनात्मक, विवेचनात्मक अशा विद्वत्ताप्रचुर प्रबंधनिबंधांबरोबरच, सामान्य साहित्यप्रेमी माणसाच्या अभिरुचीलाहि ज्यांत आपुलकीच्या जिव्हाळ्याची ओळख पटेल, असें ललितलेखनहि आता साहित्यपत्रिकेंतून द्यावयाला काय हरकत आहे ? कोणत्याहि नियतकालिकाचा अंक घरांत आला, कीं त्यांत आपल्याला वाचण्यासारखें काय आहे, हें हुडकण्याची बहुशः कुटुंबांतील

प्रत्येक माणसाला अुत्कंठा असते. महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेच्या अंकाबाबतहि असेंच व्हावें; व अशा रीतीने आपणाला काय वाचण्यासारखें मिळतें तें पाहण्यासाठी हुडकणाऱ्या कुटुंबांतील प्रत्येक लहान थोर व्यक्तीला, त्यांत कांही ना कांही तरी वाचण्यासारखें अवश्य सापडावें अितके पत्रिकेचें अंतरंग सामवायिक झालें पाहिजे, असें मी मानतों. महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका अखिल साक्षर महाराष्ट्राचें मुखपत्र व्हावयास पाहिजे असेल, तर तिचें स्वरूप इतकें प्रातिनिधिक झाल्याशिवाय गत्यंतर नाही; आणि हें साध्य करण्याच्या दृष्टीने, व दिशेने प्रयत्न करण्याचा संकल्प, ही संपादनाची जबाबदारी स्वीकारतांना मीं केला आहे. अर्थात् हा संकल्प तडीस नेण्याची शक्यता केवळ सर्व साहित्यिकांच्या सहकार्यावर व लेखनसाहाय्यावर अवलंबून असल्यामुळे या संकल्पाचा अुच्चार करण्याचा माझा वास्तविक हेतु सर्व साहित्यिकांच्या मदतीची, कृपेची, याचना करणें हा आहे, हें वेगळें सांगणें नकोच.

साहित्यपत्रिकेचा हा त्रैमासिक अंक असतांहि, तो तयार करण्यासाठी मला, संपादकाच्या जागीं माझी रीतसर निवड झाल्यापासून अुण्यापुऱ्या अेक महिन्यापेक्षा अधिक वेळ न मिळाल्यामुळे, त्याच्या अंतरंगाची अगदी पद्धतशीर मांडणी करणें व त्यासाठी विविध विषयांवरील पुरेसे लेख जमा करणें फारसें शक्य झालें नाही; तरीहि पण या अल्पकालांतहि, मी विनंति करतांच, माझ्या व पत्रिकेबद्दलच्या अुत्कट आपुलकीच्या भावनेमुळे, तावडतोब लेखनसाहाय्य देअून, या अंकाला आला आहे तो भरदारपणा व विषयवैचित्र्य आणण्यासाठी मदत केली याबद्दल, श्री. वसंत वैद्य, श्री. ना. गो. चापेकर, श्री. त्र्यं. शं. शेजवलकर, श्री. अ. ज. करंदीकर, प्रो. श्री. बा. रानडे व श. य. गुण्ये, यांचा मी अत्यंत आभारी आहें. हे व अितर साहित्यिक यापुढेहि मला अशीच मदत करून माझ्याकडून पत्रिकेच्या संपादनाचें काम अधिकाधिक सफल व सुबक करून घेतील, अशी मी आशा करतों.

पूर्वी अुल्लेखिलेल्या संपादकीय संकल्पाच्या दृष्टीने, या अंकाच्या अंतरंगाकडे नजर टाकली असतां, पहिल्या पानावरील कविताच, त्या दृष्टीने टाकलेलें पहिलें पाअूल आहे, असें आढळून येअील. कवितांप्रमाणेच, अुच्च दर्जाच्या लघुकथा, अेकांकी नाटिका, अशांसारख्या ललितलेखनाचा प्रमाणशीर अंतर्भाव, पुरवठा होअील त्याप्रमाणे, पत्रिकेच्या पृष्ठांतून करण्याचा विचार आहे. श्री. अ. ज. करंदीकर यांचा या अंकांतील लेख, हा या अुपक्रमाचाच विशेष प्रकार होय.

पत्रिकेचे अेक भूतपूर्व संपादक, व महाराष्ट्रांतले अेक अग्रगण्य कवि व साहित्यपण्डित, डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या निधनाच्या दुःखद घटनेनंतर त्यांच्या गुण-चरितावर, पत्रिकेच्या वतीने श्री. ना. गो. चापेकर या त्यांच्या ज्येष्ठ व सन्मान्य सहकाऱ्यापेक्षा, अधिक आत्मीयतेने, अधिकारवाणीने कोण लिहूं शकणार ! त्याचप्रमाणें, कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांच्यावर आतापर्यंत त्यांच्या त्यांच्या स्नेह्यांसुहृदांनी लिहिलेले जे अनेक शोकलेख आले, त्यांतील त्यांच्या अंगच्या विविध गुणांबद्दलच्या व वैशिष्ट्यांबद्दलच्या अुत्कट व अधिकृत अुद्गारांची निवड करून गुंफलेली अश्रु-मुक्ता-माला, कै. माधवरावांच्या व्यक्तित्वाची थोडक्यांत बरीचशी यथार्थ कल्पना आणून देण्यास समर्थ व अुपयुक्त नाही, असें कोण म्हणेल !

श्री. शेजवलकर यांच्या लेखांतील अनेक विधानें, बऱ्याच लोकांच्या अंतःकरणांना अनपेक्षित धक्के देतील, याची मला जाणीव आहे; परंतु श्री. शेजवलकर हे 'गुरुकुलक्लिष्ट' असे स्वतंत्र विचाराचे व कुशाग्र बुद्धीचे, अर्थ-राजनीति-समाज-अितिहास व तत्त्वज्ञान, या शास्त्रांचे गाढे अभ्यासक असल्यामुळे, त्यांनी मराठी वाङ्मयांत प्रकट होणाऱ्या प्रवृत्तींची नाडीपरीक्षा करून,

महाराष्ट्राच्या प्रकृतीची जी चिकित्सा व जें निदान केलें आहे, तें जरी कोणाला सर्वस्वीं पटलें वा रुचलें नाही, तरी तें विचारणीय नाही, असें कोणीच म्हणूं शकणार नाही. अशी स्थिति असल्यामुळे, श्री. शेजवलकर यांच्या विधानांचा निरास करण्यासाठी, कोणी तात्त्विक भूमिकेवरून त्यांच्या चिकित्सेचा व निदानाचा अुत्तरपक्ष केला, तर ती चर्चा अत्यंत अुद्बोधक व अुपयुक्त होईल, या अपेक्षेनेच श्री. शेजवलकरांचा हा "शय्येवरून–" केलेला सावेश हल्ला मुद्दामच त्यांच्या अनुमतीने या अंकांत अुद्धृत केला आहे.

अंकाचीं सोळा पानें खर्ची घालून शिल्लक असलेलीं मागील सर्व स्वीकृत पुस्तक-परीक्षणें या अंकांत संपविलीं आहेत. साहित्यपत्रिकेच्या कोणत्याहि एका त्रैमासिक अंकाची पृष्ठसंख्या ६४ ते ७२ ची मर्यादा ओलांडणें, आर्थिक दृष्टया परवडण्यासारखें नसल्यामुळे, या मर्यादेत विस्तृत, विपुल आणि विविध स्वरूपाचे अितर लेख द्यावयाचे म्हटलें तर परीक्षणांचें सध्याचें स्वरूप पालटणें अगदी भागच आहे. यापुढे केवळ परिचयात्मक, वर्णनात्मक, रसग्रहणात्मक किंवा सारांशात्मक अशा विस्तृत परीक्षणांना साहित्यपत्रिकेंत जागा मिळणें दुरापास्त होअील. अशा प्रकारच्या परीक्षणांना भरपूर अवसर देणारीं पुरेशीं दैनिकें, साप्ताहिकें, मासिकें, महाराष्ट्रांत पुष्कळ असल्यामुळे मोजक्या निश्चित शब्दांत ग्रंथांच्या स्वरूपांची ओळख व त्यांचें वैचारिक व साहित्यिक मूल्यमापन करणारीं परीक्षणें, महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेचा विशेष म्हणून राहावा, अशी अपेक्षा आहे या सामान्य नियमाला अपवाद निर्माण करणें न्याय्य वाटण्यासारखे जे महत्त्वाचे ग्रंथ मराठींत अुत्पन्न होतील, त्यांचीं चर्चात्मक स्वरूपाचीं विस्तृत अशीं स्वतंत्र परीक्षणें देण्यालाहि माझी हरकत नाही (व असे अपवाद करण्यास योग्य असे प्रसंग वारंवार अुत्पन्न व्हावेत, अशीच माझी सदिच्छा आहे). पण तोंपर्यंत वर सांगितलेल्या स्वरूपाच्या छोट्या पुस्तकपरीक्षणांचीं चार ते सहापेक्षा अधिक पानें अेकाच अंकांत शक्यतोंवर द्यावयाचीं नाहीत, असा विचार आहे.

संशोधनात्मक टिपणें, साहित्यविषयक पृच्छा-समाधान, रद्दींतील रत्नें, शब्दचर्चा, जानपदवाङ्मयाचे नमुने वगैरे पूर्वी साहित्यपत्रिकेंतून अवतीर्ण होत असलेलीं विशेष सदरें, मिळतील तसतशीं, यथाप्रमाण, यापुढेहि दर अंकांत अवश्य समाविष्ट केलीं जातील; आणि त्यांबरोबरच नव्यानेच साहित्यशाखा म्हणून गणल्या जाअूं लागलेल्या, 'नभोवाणी' व 'चित्रपट' या दोन माध्यमांचाहि योग्य परामर्श घेण्यांत येअील. श्री. भा. वि. वरेरकर यांच्या अविरत हट्टायासांमुळे साहित्यसंमेलनाच्या ठरावांच्या साक्षीने या दोन माध्यमांवर आता परिषद्मान्यतेचा शिक्कामोर्तब झालेला आहे; तेव्हा त्यांच्याबद्दलच्या लेखांचा, साहित्य-पत्रिकेंत अंतर्भाव करण्यास आता अर्थात् कांहीच हरकत अुरलेली नाही. या दोन शाखांबाबत सर्व लहान थोर साहित्यिकांना, नाही म्हटलें तरी, कुतूहल व जिज्ञासा फार; पण त्यांच्या वास्तविक स्वरूपाची प्रत्यक्ष माहिती मात्र अगदीच तुटपुंजी, किंबहुना जवळजवळ नाहीच, अशी स्थिति असल्यामुळे, मुळापासून सुरुवात करून, या दोन विषयांतील प्राथमिक बाबींची चर्चा करणारे व माहिती देणारे लेखच आरंभीं द्यावेत, असें ठरविलें आहे. या अंकांत आलेल्या दोन लेखांचे कर्ते, प्रो. श्री. वा. रानडे व श्री. श. य. गुण्ये, हे दोघेहि आपापल्या लेखन-विषयांच्या शास्त्र व कला वा दोन्ही अंगांत अधिकारी व निष्णात असल्यामुळे, त्यांचे लेख सर्वांनाच उद्बोधक व मनोरंजक वाटतील; आणि त्या विषयांवरील अधिक तात्त्विक व तांत्रिक स्वरूपाचे लेख वाचण्यास त्यांना त्यामुळे अुत्सुकता अुत्पन्न होअील, अशी अपेक्षा आहे.

के. नारायण काळे

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटी, पुणें

१९३९-४० सालीं पहिल्या सहामाहींत बक्षिस दिलेल्या पुस्तकांची यादी

नंबर	पुस्तकाचें नांव	कर्त्याचें नांव	बक्षिसाची रक्कम रु.	शेरा
१	रत्नप्रदीप खंड २ रा	रा. म. ल. खांबेटे	६०	द. प्रा. फंडांतून
२	अनिरुद्ध प्रवाह	'कृष्णाबाअी'	३०	,,
३	विवाहितांचें नंदनवन	राजरत्न वा. वि. जोशी	४०	,,
४	नैषधसार	रा. ग. रा. हवालदार	३०	,,
५	सैन्यांतील आठवणी	कॅप्टन गो. गं. लिमये	४०	,,
६	रसायनशास्त्रांतील नवलकथा	रा. रा. ना. भागवत	४०	,,
७	अुपनिषद्रहस्य	प्रो. कृ. वें. गजेंद्रगडकर	७५	,,
८	वैवाहिक जीवन भाग १ ला	रा. ल. के. भावे	३०	,,
९	महाराष्ट्र शब्दकोश भाग ७ वा	रा. य. रा. दाते	१२५	,,
१०	हिंदी मराठी व्यवहार कोश	रा. ग. र. वैशंपायन	४०	,,
११	कफक्षय व त्यावरील अुपचारांची दिशा	डॉ. वा. कृ. जोशी	४०	,,
१२	मार्क्सवादाचा प्रयोग	रा. स. रं. सुंठणकर	७५	देशमूख फंडांतून
१३	अिंग्रजांनीं हिंदुस्थान कसा घेतला	रा. रा. गो. भिडे	३५	,,
१४	भडकत्या ज्वाला अर्थात् आगामी महायुद्ध	रा. श्री. रा. पोतनीस	४०	संस्थेचे फंडांतून
१५	मूर्तिविज्ञान	रा. ग. ह. खरे	६०	,,
१६	रत्ना	प्रो. वि. मा. दीक्षित पटवर्धन	५०	,,
१७	प्लेटोची आदर्श राज्यघटना	रा. ज. ग. जोगळेकर	३५०	,,

नंबर	पुस्तकाचें नांव	कर्त्याचें नांव	बक्षिसाची रक्कम रु.	शेरा
१८	तुलनात्मक निबंध	प्रो. ग. स. दीक्षित	२१	दि. बे. गोडबोले प्राईझ
१९	जवानमर्द बापू गोखले चरित्र	रा. मा. शि. गोखले	४०	मुळे प्राईझ
२०	रशियांतील राज्यक्रांति	रा. पां. वा. गाडगीळ	४०	देशमुख फंडांतून

१९३९-४० सालांत पहिल्या सहामाहींत डे.व्ह.ट्रा. सोसायटी, पुणें–शिफारसपत्र दिलेल्या पुस्तकांची यादी

अ. नं.	पुस्तकाचें नांव	कर्त्याचें नांव	शिफारस पत्र
१	विषूचिका (कॉलरा)	वैद्य अ. वा. सहस्त्रबुद्धे	शिफारसपत्र
२	मानवी हृदय	रा. गं. रा. साने	,,
३	वनस्पतिशास्त्र	रा. बा. श्री. कोल्हटकर	,,
४	आराधना	रा. वा. ना. देशपांडे	,,
५	फॅसिझम	रा. वा. कृ. गलगली	,,
६	आजकालचे साहित्यिक	रा. दा. न. शिखरे	,,
७	खाचखळगे	रा. रा. द. ब्रह्मे	,,
८	हिंदी चलनपद्धतीचा अितिहास	रा. य. वा. लोहोकरे	,,
९	साम्राज्य व स्वराज्य	रा. दा. न. शिखरे	,,
१०	स्त्रियांचे हक्क व सुधारणा	राजरत्न वा. वि. जोशी	,,
११	कलेचें मयूरसिंहासन	रा. चिं. ब. लेले	,,
१२	बडी दिदी	रा. श्री. रा. मराठे	,,

परिषद्वार्ता

[चिटणीसांकडून]

कार्यकारी मंडळ— ता. १७ डिसेंबर १९३९ या दिवशीं भरलेल्या सभेंत खालील-प्रमाणे दुखवट्याचे ठराव झाले:—

"(१) जळगांव येथील १९३६ या वर्षी भरलेल्या म. सा. संमेलनाचे अध्यक्ष, म. सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व माजी चिटणीस व म. सा. पत्रिकेचे माजी संपादक डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या ता. २९।११।३९ रोजीं झालेल्या शोचनीय मृत्यूमुळे या सभेस अत्यंत दुःख होत आहे. प्रतिभावान कवि, रसिक आणि मार्मिक टीकाकार, चिकित्सक आणि मूलग्राही छंदःशास्त्रज्ञ, परिश्रमी आणि व्युत्पन्न कोशकार, फारशी भाषेचे पारंगत अभ्यासक, मराठी भाषेचे निःसीम अभिमानी, प्रेमळ आणि व्यासंगी प्राध्यापक, समंजस व निर्भय समाज-सुधारक, आणि तेजस्वी व सच्छील व्यक्ति या नात्यांनी डॉ. माधवराव पटवर्धन याची थोर योग्यता होती. अशा थोर व्यक्तीच्या अकाली निधनाने मराठी भाषेची, वाङ्मयाची आणि अखिल महाराष्ट्रीय जनतेची अपरिमित हानि झाली आहे."

"(२) मिरज (थोरली पाती) या संस्थानचे वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध राजे श्रीमंत सर गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन, के. सी.आय.ई., यांना मिरज येथे सोमवारीं (११।१२।३९) देवाज्ञा झाली हें ऐकून म.सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळास अत्यन्त दुःख होत आहे. श्रीमंत राजे बाळासाहेब पटवर्धन हे मोठे साहित्यप्रेमी आणि कीर्तनसंस्थाभिमानी असून ज्ञानाभि-वृद्ध्यर्थ त्यांनी अनेक ग्रंथांना आणि शाळांना वगैरे आर्थिक साहाय्य केलें होतें. ते स्वतः नीतिबलोत्साहवर्धक, विद्वत्ताप्रचुर आणि वक्तृत्वयुक्त कीर्तनें करीत आणि १९१५ सालीं मुंबई येथे झालेल्या म. सा. संमेलनाचें अध्यक्षस्थान त्यांनी भूषित केलें होतें. त्यांच्या निधनाने त्यांच्या प्रजाजनांस आणि आप्तेष्टमित्रांस होणाऱ्या दुःखांत म. सा. परिषदेचें कार्यकारी मंडळ आणि विद्याप्रेमी सकल महाराष्ट्रीय जनता सहभागी आहे."

"(३) गीताधर्ममंडळाचे संस्थापक आणि चालक गीतावाचस्पति सदाशिवशास्त्री भिडे यांचें शनिवार ता. ९ डिसेंबर रोजीं निधन झालें हें ऐकून म. सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळास दुःख होत आहे. त्यांनी 'उपनिषत्प्रकाश', 'रहस्यदीपिका' नांवांचे ग्रंथ लिहून आणि गीतेच्या अर्थासंबंधाने आणि उपदेशासंबंधाने प्रवचनें देऊन तत्त्वचिकित्सक वाङ्मयाची केलेली सेवा चिरस्मरणीय आहे. लहानपणींच अंधत्व आलें असूनदेखील अितकी विद्वत्ता संपादन केली आणि आपल्या विद्येचा समाजांतील ज्ञान वृद्धिंगत करण्याच्या कामीं अुपयोग केला हें त्यांना अत्यंत भूषणावह होतें. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या आप्तस्वकीयांस झालेल्या दुःखांत म. सा. परिषदेचें कार्यकारी मंडळ अंशभाक् आहे."

"(४) नाटककार, कथालेखक, कादंबरीकार आणि कवि श्री. गणेशशास्त्री फाटक यांना २५।१०।३९ रोजीं देवाज्ञा झालेली ऐकून म. सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळास दुःख होत आहे. त्यांचीं नाटकें आणि कादंबऱ्या बऱ्याच लोकप्रिय होत्या. साहित्य, न्याय, व्याकरण,

वेदान्त वगैरे विषयांचें त्यांनी चांगलें अध्ययन केलें होतें. त्यांच्या निधनानें त्यांच्या आप्तेष्ट-मित्रांस होणाऱ्या दुःखांत म. सा. परिषदेचें कार्यकारी मंडळ सहभागी आहे."

"(५) जळगांवचे महाराष्ट्र शाहीर श्री. दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांचें गेल्या विजया-दशमीच्या दिवशीं देहावसान झालें हें अैकून परिषदेच्या कार्यकारी मंडळास दुःख होत आहे. त्यांनी मराठ्यांचीं संग्रामगीतें, झांशीची संग्रामदेवता, मान्यांची यमुना, महाराणा प्रताप, अभंग-माला, शिवप्रताप अित्यादि काव्यग्रंथ आणि अितर टीकात्मक लेख लिहून मराठी भाषेंत अुल्लेखनीय आणि भूषणास्पद भर घातली आहे. त्यांच्या निधनामुळे होणाऱ्या दुःखांत त्यांच्या आप्तेष्ट-मित्रमंडळीला जें दुःख झालें आहे त्यांत कार्यकारी मंडळ सहभागी आहे."

"(६) सुप्रसिद्ध मीमांसक श्री. वामनशास्त्री किंजवडेकर यांस ता. १६।१०।३९ रोजीं देवाज्ञा झाली हें अैकून कार्यकारी मंडळास दुःख होत आहे. पूर्वमीमांसाशास्त्राचें त्यांनी अुत्तम अध्ययन केलें होतें आणि पुण्यांत सर परशुरामभाऊ कॉलेजांत मीमांसाविद्यालय स्थापून या शास्त्राच्या अध्यापनाची त्यांनी अुत्तम व्यवस्था केली हें त्यांना भूषणावह होतें. त्यांच्या निधनानें त्यांच्या आप्तेष्ट मित्रमंडळीस झालेल्या दुःखांत कार्यकारी मंडळ सहभागी आहे."

श्रीमंत सरकार, अिचलकरंजी, यांनी परिषदेच्या नांवें रु. २००० चे स्वतंत्र रीत्या ठेविलेले रोखे परिषदेच्या ताब्यांत देण्याची श्रीमंतांची अिच्छा असल्यावरून परिषदेच्या ट्रस्टींच्या नांवें बदलून घ्यावेत असें सभेनें ठरविलें.

ता. २४ डिसेंबर १९३९ या दिवशीं १९४०-४२ या वर्षांकरिता निवडून आलेल्या नवीन कार्यकारी मंडळाची सभा झाली. या सभेंत श्री. य. रा. दाते व श्री. वा. दा. गोखले यांना कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून स्वीकृत करण्यांत आलें.

ता. १ जानेवारी १९४० या दिवशीं भरलेल्या सभेंत चिटणीस म्हणून डॉ. अ. ना. भालेराव व रा. सा. र. शु. जोशी व संपादक म्हणून श्री. के. ना. काळे यांची निवड करण्यांत आली. परिषदेचे अेक आस्थेवाअीक सभासद कै. द. वि. देशमूख यांजबद्दल दुखवट्याचा ठराव करण्यांत आला.

मुंबअी विद्यापीठानें फर्स्ट अियर व अिंटरमीजिअेट या परीक्षांस ठेविलेल्या प्रांतिक भाषांतील निबंधप्रश्नपत्रिकेबाबत जें धोरण ठरविलें आहे त्याबाबत खालील ठरावे करण्यांत आला:—
"मुंबअी विद्यापीठाच्या प्रथमवर्ष व अिंटरमीजिअेट या परीक्षांना बसणाऱ्या अुमेदवारांना प्रांतिक भाषेंतील जी अेक निबंधप्रश्नपत्रिका असते तिला देण्यांत येणारे गुण व कालावधि अर्ध्यानें कमी करण्याचा मुंबअी विद्यापीठाकडून विचार चालू आहे ही बातमी म. सा. परिषदेस चिंताजनक वाटते. मुंबअी विद्यापीठापुढे विचारार्थ आलेल्या ह्या योजनेचे परिणाम पुष्कळ दूरगामी होतील; तीमुळे प्रांतिक भाषांच्या अभ्यासाचें पाअूल मागें पडेल आणि त्यांचें स्थानहि खालच्या दर्जाचें ठरूं पाहील. असल्या प्रकारच्या प्रतिगामी योजनेला विद्यापीठानें मान्यता देअूं नये अशी परिषदेची आग्रहाची व जोराची मागणी आहे."

संमेलन— रत्नागिरी येथें भरणाऱ्या २४ व्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या कार्यास आता जोरानें चालना मिळूं लागली आहे. आतापर्यंत संमेलनकार्यकर्त्यांनी ५० स्वागतसभासद केले असून ही संख्या १०० वर जातांच रीतसर स्वागतमंडळ स्थापन करण्यांत येअील. संमेलन २७ ते २९ अेप्रिल या तारखांस भरविण्याचा संमेलनचालकांचा मानस आहे, परंतु अुत्तर हिंदुस्थान वगैरे दूरच्या भागांतील संमेलनास हजर राहूं अिच्छिणाऱ्यांस ह्या तारखा सोयीच्या

पडत नसल्याने मेच्या पहिल्या आठवड्यांच्या अखेर संमेलन भरवावें अशी सूचना कार्यालयाने संमेलनकार्यकर्त्यांस केली आहे.

अहमदनगर संमेलनाचा अहवाल पक्का लिहून झाला असून तो रत्नागिरी संमेलनापूर्वी प्रसिद्ध होईल.

कै. पैठणकर पारितोषिक— अहमदनगर संमेलनप्रसंगीं पारनेरचे श्री. द. ग. काळे वकील यांनी कै. पैठणकर यांच्यां नांवें पारितोषिक देण्यासाठी रु. १०० ची रक्कम परिषदेच्या स्वाधीन केली. वाङ्मयसमीक्षणशास्त्र (Literary Criticism) या विषयावर आजपर्यंतची प्रगति विशद रीतीने दाखविणाऱ्या आणि शक्य झाल्यास नवीन कांही तरी सांगणाऱ्या ग्रंथांस हें पारितोषिक दिलें जाईल. हें पारितोषिक ३१ डिसेंबर १९३९ पर्यंत लिहिल्या जाणाऱ्या ग्रंथास द्यावयाचें होतें, परंतु अद्याप ह्या तऱ्हेचा ग्रंथ कोणाकडूनहि लिहून न आल्यामुळे ही मुदत वाढविण्याची व्यवस्था होत आहे.

परीक्षा— १९४०-४२ या वर्षाकरिता जो परीक्षाविषयक अभ्यासक्रम, निश्चित करण्यांत आला आहे तो याच अंकांत अितरत्र प्रसिद्ध केला आहे. हा अभ्यासक्रम, परीक्षाविषयक अितर माहिती व मागील वर्षाच्या प्रश्नपत्रिका समाविष्ट केलेलें माहितीपुस्तक स्वतंत्र रीतीने प्रसिद्ध केलें असून त्याची किंमत तीन आणे ठेविली आहे.

१९३९ च्या नोव्हेंबरांत झालेल्या परीक्षांत खालीलप्रमाणे अमेदवार यशस्वी झाले—

प्राज्ञ परीक्षा

दुसरी कक्षा (गुणानुक्रमें)

(१) दाढे श्रीधर गणेश, पुणें, (२) कुलकर्णी पांडुरंग विष्णु, सांगली, (३) आघारकर बाळकृष्ण दिनकर, पुणें, (४) भिडे श्रीपाद रघुनाथ, पुणें, (५) क्षीरसागर शांताराम कृष्ण, पुणें, (६) यादव जगन्नाथ गणेश, सांगली.

तिसरी कक्षा (वर्णानुक्रमें)

(१) अिंगळे नारायण पुनाजी, पुणें, (२) अेरंडोलीकर विनायक दत्तात्रेय, सांगली, (३) कुलकर्णी प्रभाकर शंकर, मुंबअी, (४) कुलकर्णी विष्णु सखाराम, पुणें, (५) गद्रे केशव बाळकृष्ण, पुणें, (६) गोडबोले लक्ष्मण रामचंद्र, पुणें, (७) जैन भिसीकर माणिकचंद जयवंतसा, नागपूर, (८) जैन रवींद्रनाथ रतनसा, नागपूर, (९) जैन शांतिलाल रामलाल, नागपूर, (१०) जोशी रघुनाथ गोपाळ, पुणें, (११) जोशी हरि गणेश, सांगली, (१२) तेली बळवंत सीताराम, सांगली, (१३) थोरात त्र्यंबक पुरुषोत्तम, मुंबअी, (१४) देवधर दिनकर सदाशिव, सांगली, (१५) देवळे शंभूराव रामचंद्र, पुणें, (१६) देसाअी गजानन बाबूराव, मुंबई, (१७) धुरंधर विमल वा., मुंबअी, (१८) नामजोशी शिवराम बाळकृष्ण, नागपूर, (१९) नारळकर बाळ नारायण, पुणें, (२०) परळकर मालती श्रीधर, मुंबअी, (२१) पालकर विठ्ठल हरि, पुणें, (२२) पुजारी सीताराम पांडुरंग, पुणें, (२३) पुराणिक हरि दामोदर, मुंबअी, (२४) पेठे मधुसूदन परशुराम, पुणें, (२५) भाटे कमल गंगाधर, पुणें, (२६) मराठे नारायण हरि, मुंबई, (२७) रुअीवाले चंद्रशेखर शिवसा, नागपूर, (२८) वैद्य दत्तात्रेय विष्णु, मुंबअी, (२९) वैद्य सुशीला श्रीराम, नागपूर, (३०) शहा प्रेमचंद देवचंद, नागपूर, (३१) शेंबेकर श्रीकृष्ण पुरुषोत्तम, पुणें.

या परीक्षेसाठी ६१ उमेदवारांकडून अर्ज आले होते, परंतु ४४ च उमेदवार परीक्षेस बसले होते.

विशारद परीक्षा

दुसरी कक्षा— शेणोलीकर हरि श्रीधर, पुणें.

तिसरी कक्षा (वर्णानुक्रमें)

(१) अिंगळे नारायण पुनाजी, पुणें, (२) दसनूरकर स्नेहलता, पुणें, (३) मोने वासुदेव काशीनाथ, मुंबअी, (४) वैद्य भालचंद्र महादेव, मुंबअी.

बारा अुमेदवारांपैकी आठच अुमेदवारांस या परीक्षेस बसतां आलें.

निवडणूक— १९४०-४२ या वर्षांकरिता नियामक मंडळ, कार्यकारी मंडळ वगैरेंच्या निवडणुकी आता पूर्णपणें झाल्या आहेत. मागील अंकीं स्वीकृत सभासदांशिवाय नियामक मंडळांत असलेल्या सभासदांची यादी छापली आहेच. त्यानंतर नियामक मंडळांत स्वीकृत म्हणून खालील सभासद निवडून आलेः—

(१) श्री. दत्तो अप्पाजी तुळजापुरकर, (२) श्री. दिनकर विनायक काळे, (३) प्रो. श्रीनिवास नारायण बनहट्टी, (४) श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर, (५) श्री. श्रीपाद सदाशिव शेवडे, (६) प्रो. रामचंद्र श्रीपाद जोग, (७) सौ. मुक्ताबाअी दीक्षित, (८) प्रो. वासुदेव गोविंद मायदेव, (९) डॉ. रामकृष्ण गणेश हर्षे, (१०) श्री. ग. गं. जांभेकर.

१९४०-४२ या वर्षांकरिता जें कार्यकारी मंडळ निवडून आलें तें याच अंकांत अितरत्र प्रसिद्ध केलें आहे.

परिभाषामंडळ— साहित्य परिषदेमार्फत व तिचेंच कार्य म्हणून मराठी शास्त्रीय परिभाषेची निश्चिति आणि निर्मिति करण्यासाठी पुणें येथे अस्तित्वांत असलेल्या परिभाषा-मंडळाच्या सहकार्यानें महाराष्ट्र साहित्य परिषदेने आपलें स्वतःचें म्हणून अेक परिभाषाचर्चा-मंडळ स्थापन करण्याबाबत काय योजना करावी याबद्दल वरील मंडळाच्या सदस्यांची ता. २६।१२।३९ रोजीं अेक सभा झाली. सभेस डॉ. दि. धों. कर्वे, प्रो. श्री. ल. आजरेकर, डॉ. म. वि. आपटे, प्रो. द. बा. लिमये, श्री. शेडाणीकर वैद्य, प्रो. स. वि. आपटे, श्री. द. वि. आपटे व श्री. त्र्यं. गो. ढवळे हे सभासद अुपस्थित होते. सभेंत निर्णय झाला तो असाः—

"परिषदेमार्फत अेखादें 'परिभाषा चर्चा मंडळ' स्थापलें जावें व महिन्यांतून अेका सोयिस्कर गुरुवारीं त्याची बैठक व्हावी. या बैठकींत शास्त्रीय विषयांतील अेखाद्या शाखोपशाखेंतील परिभाषेची, त्या विषयावरील अेखादें पुस्तक किंवा पुस्तकसमुच्चय घेअून तदनुषंगानें चर्चा करावी आणि चर्चेतून निष्पन्न होणारे निर्णय पत्रिकेंतून प्रसिद्ध केले जावे. विशेषतः शालेय शास्त्रीय वाङ्मय मराठींत पुरेसें झालें असल्यामुळे त्यांतून प्रवेशपरीक्षेपर्यंत तरी अुपयोगी पडेल अशी परिभाषा निवडून काढणें शक्य असल्यामुळे तूर्त हा चर्चोत्पन्न परिभाषा मांडण्याचा मार्ग घेतला जावा. अुपस्थित सभासदांपैकी श्री. ढवळे, प्रो. आपटे, डॉ. कर्वे, प्रो. आजरेकर, प्रो. लिमये हे अशा चर्चेत भाग घेतील. इतरांसहि मोकळीक असावी."

यासंबंधी कार्यकारी मंडळानें ठराव केला तो असाः—

'शास्त्रीय विषयांस अवश्य असणारी योग्य परिभाषा मराठींतून निर्माण व्हावी या उद्देशाने ही सभा खालील सभासदांचें परिभाषामंडळ नेमीत आहे. या मंडळास अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार देण्यांत देत आहे:—

(१) श्री. त्र्यं. गो. ढवळे (संयोजक), (२) प्रो. स. वि. आपटे, (३) डॉ. दि. धों. कर्वे, (४) प्रो. श्री. ल. आजरेकर व (५) प्रो. द. बा. लिमये.'

इतर— कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या शोचनीय निधनाबद्दल दुखवट्याची सभा टिळक स्मारक मंदिरांत मंगळवारी (ता. ५।१२।३९) भरविण्यांत आली. स्मारकाची योजना करण्यास व तत्संबंधी द्रव्यसाहाय्य मिळविण्यास खालील समिति नेमण्यांत आली:—

अध्यक्ष
श्री. नरसिंह चिंतामण केळकर

खजिनदार
रा. सा. र. लु. जोशी

चिटणीस
प्रो. शंकर केशव कानेटकर
डॉ. अमृत नारायण मालेराव
श्री. विठ्ठलराव दत्तात्रेय घाटे

सभासद
प्रि. धनंजय रामचंद्र गाडगीळ
प्रो. वामन मल्हार जोशी
प्रो. दत्तो वामन पोतदार
प्रि. प्रल्हाद केशव अत्रे
श्री. गंगाधर बाळकृष्ण गरुड
श्री. यशवंत दिनकर पेंढरकर
श्री. मोहन ज्ञानेश्वर शहाणे
श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर
श्री. दत्तात्रेय लक्ष्मण गोखले
सौ. गंगूबाई पटवर्धन

देणग्या— मुंबअीचे डॉ. आनंद श्रीधर परांजपे यांनी स्वयंस्फूर्तीने परिषदेच्या इमारत-निधीस रु. ५० देणगी दिली आहे. श्रीमंत सौ. मातोश्री अिंदिराबाअी महाराणीसाहेब होळकर यांजकडून त्यांनी देअूं केलेल्या देणगीचा रु. २०० चा दुसरा हप्ता कार्यालयांत आला आहे.

नवीन सभासद

तहहयात
श्री. रामचंद्र गणेश प्रधान, हैदराबाद (द.)
श्री. वासुदेव दामोदर गोखले, पुणें

साधारण
श्री. त्र्यंबक शिवराम देशपांडे, विजापूर
श्री. गणेश शंकर देव, धुळें
श्री. रामकृष्ण वासुदेव सबनीस, पुणें
श्री. रघुनाथ बी. चितळे, दापोली
श्री. सदाशिव हरि मोडक, मुंबअी
श्री. विठ्ठल रामचंद्र नेने, मिरज
श्री. गणेश बाळकृष्ण चौबळ, मुंबई

सांगली
श्री. गुंडो दासो कंपली
श्री. विष्णु नारायण जोशी कॅपवाडकर
श्री. हणमंत सदाशिव गोखले
श्री. वामन विष्णु बाटवे
श्री. गणेश विनायक करमरकर
कु. मनूताअी पाडळकर
श्री. सदाशिव गणेश फडके
श्री. पंडितराव दांडेकर
श्री. यशवंत कृष्ण भेडसगांवकर
प्रो. रघुनाथ विनायक बर्वे

हैदराबाद (द.)
श्री. दत्तात्रेय कृष्ण लेले
श्री. गोविंद वामन हर्डीकर
श्री. भिकाजी अण्णाजी पाटील

प्रो. रघुनाथ महारुद्र भुसारी
श्री. शंकर बळवंत माढेकर
श्री. मोरेश्वर बाळकृष्ण जोशी
डॉ. शांताबाअी सातवळेकर
डॉ. अुत्तमराव पारगांवकर
सौ. सुशीलाबाई फाटक
श्री. माधव हरि माढेकर
श्री. वासुदेव नारायण नाखरे
श्री. सीताराम गणपतराव मनाठकर

साधारणांतून तहहयात

श्री. महादेव विष्णु गोखले, पुणें
डॉ. आनंद श्रीधर परांजपे, मुंबअी

संलग्न संस्था व शाखासभावृत्त

मध्यप्रांत शाखा

म. सा. परिषदेच्या मध्यप्रांत शाखेची सर्वसाधारण सभा १५-१०-१९३९ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां सेवासदनांत भरली होती. सभेस सोळा सभासद हजर होते. सभेंत खालील कार्य झालें.

(१) जानेवारी १९३८ ते १५ आक्टोबर १९३९ पर्यंतचा अहवाल सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला. (सूचक प्रो. शं. दा. पेंडसे; अनुमोदक श्री. दा. के. ओक)

(२) वरील मुदतीचा जमाखर्चाचा खर्डा सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

(३) नियामक मंडळावर शाखा सभेतर्फे खालील तीन प्रातिनिधींची निवड करण्यांत आली:—

प्रो. शं. दा. पेंडसे, श्री. दा. के. ओक, सौ. विमलाबाई देशपांडे.

(४) "चौदा जिल्हे व अेक कोटि लोकसंख्या असलेल्या या शाखेच्या नियामक मंडळावरील प्रतिनिधींची संख्या ७ वरून ३ वर आणण्यांत आली याबद्दल मध्यप्रांत शाखेस अत्यंत खेद होत आहे व हा अन्याय ताबडतोब दूर करण्यांत यावा अशी तिची जोराची मागणी आहे. या शाखेंत निव्वळ मराठी बोलणारे पांच संपूर्ण जिल्हे अंतर्भूत असून शिवाय बाकीच्या नअू जिल्ह्यांतहि मराठी बोलणारांची संख्या बरीच मोठी आहे. अशा परिस्थितींत या प्रांताच्या प्रतिनिधींची संख्या अितकी अल्प करण्यांत यावी हा खेदकारक अन्याय होय"

(ठराव— अध्यक्षांकडून. सर्वानुमतें मंजूर)

(५) या प्रांतांतील मराठी भाषेचे विद्वान प्राध्यापक, अधिकारी संशोधक आणि नामांकित वक्ते प्रो. शं दा. पेंडसे, अेम्. अे., अेम्. ओ. अेल्., शास्त्री, वेदान्ततीर्थ, यांनी 'ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञाना'वर प्रबंध लिहिला आणि त्यांच्या त्या व्यासंगी व संशोधक प्रबंधावर त्यांना नागपूर विद्यापीठाने पीअेच्.डी. पदवी दिली याबद्दल या सभेस अत्यंत आनंद होतो व अभिमान वाटतो. आणि या सन्मानाबद्दल डॉ. शं. दा. पेंडसे यांचें ही सभा मनःपूर्वक अभिनंदन करते व मराठी भाषेचे पहिले पीअेच्.डी. म्हणून त्यांचें अुदाहरण अितर मराठी भाषाभक्तांना अनुकरणीय वाटेल अशी ही सभा अुमेद बाळगते (सूचक प्रो. ना. के. बेहेरे; अनुमोदक श्री. पु. य. देशपांडे) ठराव सर्वानुमतें मंजूर.

(६) कार्यकारी मंडळाची नवी त्रैवार्षिक निवडणूक करण्यांत आली. जुन्या कार्यकारी मंडळाची अधिकारव्याप्तीची मुदत नियमाने आक्टोबर १९४० पर्यंत असली तरी नव्या कार्यकारी मंडळाने १ जानेवारी १९४० पासून अधिकारस्वीकार करावा व मध्यवर्ती संस्थेप्रमाणे अधिकारकालगणना ठेवावी असें ठरलें.

नवें कार्यकारी मंडळ

अध्यक्ष— श्री. पु. य. देशपांडे, अेम्. अे. अेल्अेल्. बी.
उपाध्यक्ष— १ प्रो. सौ. कुसुमावती देशपांडे, अेम्. अे.
२ श्री. दा. के. ओक, बी. अे.
खजीनदार— डॉ. वि. ना. यत्ते, डी. अेस्सी.
सरचिटणीस— श्री. र. वि. कुलकर्णी.
चिटणीस— १ श्री. ना. शं. हडस, बी. अेस्सी., अेल्अेल्. बी.
२ श्री. श. वा रानडे, बी. अे.
सभासद— १ श्री. के. वि. फणसे (सिहोरा)
२ श्री. ह. ना. नेने, अेम्. अे.
३ डॉ. ल. जा. कोकर्डेकर
४ डॉ. शं. दा. पेंडसे, अेम्. अे., पीअेच्. डी.
५ श्री. अ. रा. गोखले, अेम्. अे.
६ श्री. मो. श. शहाणे, बी. अे.
७ श्री. वि. म. अत्रे.

नागपूर
१५-१०-३९

ना. के. बेहेरे
अध्यक्ष,
म. सा. परिषद्, मध्यप्रांत शाखा

[नियामक मंडळांत निवडून येणाऱ्या प्रतिनिधींची संख्या आता लोकशाहीच्या तत्वाप्रमाणे त्या गटांतील सभासदांच्या संख्येवर अवलंबून आहे. एकं कोट लोकसंख्या असलेल्या गटांत परिषदेस आणखी शे सवाशे सभासद मिळविणें हें फारसें अवघड नाही. शाखासभेने या मार्गाने आपल्या प्रतिनिधींची संख्या १० पर्यंत वाढवावी अशी प्रेमाची सूचना आहे. —र. लु. जोशी.]

संलग्न संस्था वृत्त

(१) आपटे वाचनमंदिर, अिचलकरंजी, या संलग्न संस्थेची वार्षिक सभा ता.२४।१२।३९ या दिवशीं होअून त्या सभेंत मान्य झालेला अहवाल व जमाखर्चाचा तक्ता कार्यालयांत आला आहे. ह्या संस्थेचें पाअूल बरेंच पुढे पडलें असून नवीन संदर्भग्रंथांची चांगलीच भर संग्रहांत पडली आहे. वर्गणीदारांची संख्या २३४ वरून २४५ वर गेली आहे. संस्थेचा अुत्साह व कार्यतत्परता अभिनंदनीय आहे.

(२) स्नेहसंवर्धक संघ, मिरज, या संस्थेतर्फे गेल्या ऑक्टोबरांत सरस्वती अुत्सव साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं डॉ. श्रीखंडे यांचें 'कालिदासाची सृष्टि' या विषयावर व रा.वि.गो.साठये यांचें 'कांचनमृग' या विषयावर व्याख्यानें झालीं. नोव्हेंबर महिन्यांत श्री. विनायकबुवा पटवर्धन यांचें 'संगीतांतील नवमतवाद' या विषयावर सप्रयोग व्याख्यान झालें. ता. ३।१२।३९ रोजीं कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या मृत्यूबद्दल दुखवट्याची सभा प्रो. जोग यांच्या अध्यक्षतेखालीं झाली.

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या परीक्षा

(१९४० ते १९४२)

मराठी भाषेचा अभ्यास वाढावा या दृष्टीने म. सा. परिषदेने प्रतिवर्षी प्राज्ञ, विशारद व आचार्य अशा तीन परीक्षा घेण्याची योजना केली आहे. सामान्यतः, नोव्हेंबर महिन्यांतील तिसऱ्या सोमवारीं परीक्षांस आरंभ केला जाईल. परीक्षांचा कार्यक्रम येणेंप्रमाणेः—

प्राज्ञ परीक्षा

सोमवार	१० ते १	(गद्य)	प्रश्नपत्रिका	१
,,	२ ते ५	(पद्य)	,,	२
मंगळवार..................	१० ते १	(भाषा, व्याकरण, निबंध)	,,	३

विशारद परीक्षा

बुधवार	१० ते १	(गद्य)	प्रश्नपत्रिका	१
,, ...	२ ते ५	(गद्य)	,,	२
गुरुवार	१० ते १	(पद्य)	,,	३
,, ...	२ ते ५...	(भाषा-साहित्य)	,,	४
शुक्रवार	१० ते १...	(निबंधलेखन)	,,	५

आचार्यपरीक्षा १९४० या वर्षी घेण्यांत येणार नाही. या परीक्षेची योजना निश्चित झाल्यावर परीक्षेच्या तारखा व अितर माहिती पत्रिकेंतून व अितर प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत येअील.

[**टीप**— विशेष कारणामुळे अेखाद्या वर्षी तारखा बदलणें झाल्यास तसें आगाअू जाहीर करण्यांत येअील.]

केंद्रें— मुंबअी, पुणें व नागपूर या शहरीं केंद्रें ठेवण्यांत येतील. कमींत कमी पांच अुमेदवार असतील व केंद्रविषयक व्यवस्था समाधानकारक करणें शक्य असेल तर अितर ठिकाणींहि केंद्रें अुघडण्यांत येतील.

शुल्क— प्राज्ञपरीक्षा- रुपये पांच; विशारदपरीक्षा- रुपये दहा; आचार्यपरीक्षा- रुपये पंचवीस.

अर्जाचा तक्ता अुमेदवारांनी परिषदेच्या कार्यालयांतून मागवून घ्यावा. तक्ता व शुल्क हीं १० आक्टोबर या तारखेपूर्वी कार्यालयांत आलीं पाहिजेत. या तारखेनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

शुल्काची रकम कोणत्याहि कारणास्तव परत केली जाणार नाही. अेखादा अुमेदवार आजारामुळे किंवा अन्य महत्त्वाच्या अडचणीमुळे परीक्षेस न बसल्यास व त्याने दाखविलेलें कारण म. सा. परिषदेच्या कार्यकारी मंडळास योग्य वाटलें तर त्याने भरलेल्या शुल्काची रकम त्यानंतर दुसऱ्याच वर्षी होणाऱ्या परीक्षेसाठी त्याच्या नांवाने राखून ठेवण्यांत येअील.

परीक्षांसंबंधी अटी व अितर माहिती

अुमेदवारांनी वार्षिक वर्गणी ३ रुपये भरून परिषदेचे सभासद व्हावें हें अिष्ट आहे. त्यांना साहित्यपत्रिकेचे अंक नियमाने मोफत मिळून संस्थेशीं त्यांचा निकट संबंध राहील व पात्रिकेंत परीक्षांसंबंधी वेळोवेळीं प्रसिद्ध होणारी माहिती त्यांस मिळण्यास अडचण पडणार नाही.

(१) अभ्यासविषयक ग्रंथांबरोबर त्या त्या ग्रंथकारांची चरित्रविषयक माहिती, त्यांच्या लेखनाचें वैशिष्ट्य, त्यांची लेखनशैली, भाषापद्धति वगैरे अनुषंगिक माहिती अुमेदवारांस असली पाहिजे.

(२) अेकंदर परीक्षेंत शेकडा ४० गुण व प्रत्येक प्रश्नपत्रिकेंत शेकडा किमान ३० गुण मिळविणारा अुमेदवार परीक्षेंत तिसऱ्या कक्षेंत अुत्तीर्ण झाला असें समजलें जाअील. सर्व प्रश्न-पत्रिका मिळून शेकडा ५० गुण मिळविणारा अुमेदवार दुसऱ्या कक्षेंत व शेकडा ६५ गुण मिळविणारा विद्यार्थी पहिल्या कक्षेत उत्तीर्ण झाला असें मानण्यांत येअील.

(३) परीक्षांचा निकाल परीक्षा संपल्यानंतर सामान्यतः सहा आठवड्यांच्या आंत प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केला जाईल. परीक्षांचा निकाल जाहीर झाल्यानंतर अेक महिन्याच्या आंत गुणांच्या केवळ बेरजांसंबंधी फेरतपासणीसाठी अुमेदवारांनी अर्ज केल्यास तेवढ्यापुरती तपासणी करून निकाल अुमेदवारास कळविला जाअील. अशा फेरतपासणीस ५ रुपये अधिक शुल्क द्यावें लागेल. अुत्तीर्ण झालेल्या अुमेदवारांस प्रमाणपत्रें देण्यांत येतील.

(४) कोणत्याहि अुमेदवारास तशी अिच्छा असल्यास प्राज्ञ व विशारद या परीक्षांस अेकाच वर्षी बसतां येअील; मात्र प्राज्ञ परीक्षा अुत्तीर्ण झाल्याशिवाय विशारद ही पदवी मिळणार नाही. मराठी अैच्छिक विषय घेअून बी. अे. किंवा जी. अे. ह्या परीक्षा अुत्तीर्ण झालेल्या अुमेदवारांस प्राज्ञपरीक्षेस न बसतां सरळ विशारद या परीक्षेस बसण्याची सवलत देण्यांत आली आहे. विशारदपरीक्षा अुत्तीर्ण झाल्याशिवाय कोणासहि आचार्य परीक्षेस बसतां येणार नाही.

(५) अुमेदवारांनी म. सा. परिषदेने मान्य केलेल्या शुद्धलेखनाच्या नियमानुसार अुत्तरें लिहिलीं पाहिजेत. या नियमांचीं पुस्तकें कार्यालयांतून विकत मिळतील (किंमत २॥ आणे)

(६) मागील प्रत्येक वर्षाच्या प्रश्नपत्रिकांस दोन आणे किंमत ठेविली आहे.

टिळक रस्ता, पुणें २.
२० डिसेंबर १९३९.

ना. के. बेहेरे
र. लु. जोशी
चिटणीस,
महाराष्ट्र-साहित्य-परिषद्.

परीक्षांचा अभ्यासक्रम

१९४० ते १९४२ या तीन वर्षी होणाऱ्या परीक्षाचा अभ्यासक्रम खाली दिला आहे.

प्राज्ञपरीक्षा

(प्रत्येक प्रश्नपत्रिकेस १०० गुण)

प्रश्नपत्रिका १ ली (गद्य)

१ यशवंतराव खरे (ह. ना. आपटे)
२ न्या.मू.रानडे यांचें चरित्र(न.र.फाटक)
३ सभासदाची बखर(साने यांनी संपादिलेली)
४ 'ज्ञान हें विष का अमृत' (वा. म. जोशी)

प्रश्नपत्रिका २ री (पद्य)

१ रसतरंगिणी (१८१८ पूर्वीचे कवि)
२ रसवंती (शेवटचा भाग) रानडे-खानोलकर

प्रश्नपत्रिका ३ री (भाषा-व्याकरण व निबंध)

१ व्याकरण (ना. वि. आपटे)
२ पद्यप्रकाश (डॉ. पटवर्धन)
३ अलंकार (रा. भि. जोशी)

विशारदपरीक्षा

(प्रत्येक प्रश्नपत्रिकेस १०० गुण)

प्रश्नपत्रिका १ ली (गद्य)

१ सुशीलेचा देव (वा. म. जोशी)
२ जादूगार (ना. सी. फडके)
३ सौभद्र (किर्लोस्कर)
४ भाऊबंदकी (खाडीलकर)
५ भावबंधन (गडकरी)
६ हाच मुलाचा बाप (वरेरकर)

प्रश्नपत्रिका २ री (गद्य)

१ टिळक चरित्र भाग १ (केळकर)
२ अच्युतराव कोल्हटकरांचे लेख भाग १
३ भाऊसाहेबांची बखर
४ वासुदेवशास्त्री खरे यांच्या थोरेले माधवराव पेशवे यांच्यासंबंधीच्या प्रस्तावना
५ सुदाम्याचे पोहे (कोल्हटकर)

प्रश्नपत्रिका ३ री (पद्य)

१ मोरोपंत (कर्णपर्व—शेवटले १० अध्याय)
२ ज्ञानेश्वरी (१८ वा अध्याय)
३ तुकाराम (महाराष्ट्र वेद—टिपणीसकृत)
४ केशवसुतांची कविता
५ तांबे यांची कविता (डॉ. पटवर्धन)

प्रश्नपत्रिका ४ थी (भाषा-साहित्य)

१ व्याकरणावरील निबंध (चिपळूणकर)
२ मराठी भाषा : उद्गम व विकास (कृ. पां. कुलकर्णी)
३ महाराष्ट्रसारस्वत (भाग १ ला तृतीयावृत्ति व भाग २ रा द्वितीयावृत्ति)
४ मराठी गद्याचा इंग्रजी अवतार (पोतदार)
५ अभिनव काव्यप्रकाश (रा. श्री. जोग)

प्रश्नपत्रिका ५ वी (दोन निबंध)

या दोन निबंधांपैकी एक अभ्यासक्रमाशी संलग्न असणाऱ्या विषयावर असेल.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिति

ता. २५-२६ फेब्रुवारी १९३९ रोजीं मिरज येथे दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाची पहिली बैठक झाली. तींत पुढील ठराव पास झाला होताः—

ठराव १३ वा— "दक्षिण महाराष्ट्रांतील साहित्यिकांना अुत्तेजन देण्यासाठी दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या वतीने साहित्यपुरस्कार करणारी अेक मध्यवर्ती संस्था निर्माण करण्यासाठी, त्या संस्थेच्या कार्याची व ग्रंथपुरस्काराची रूपरेषा निश्चित करण्यासाठी या साहित्यसंमेलनप्रसंगीं पुढील सद्गृहस्थांची अेक समिति नेमण्यांत येत आहेः—

(१) प्रो. ना. सी. फडके, कोल्हापूर. (२) श्री. डॉ. के. वा. साठे, बेळगांव.
(३) प्रा. डॉ. माधवराव पटवर्धन, कोल्हापूर. (४) श्री. शं. वा. किर्लोस्कर, किर्लोस्करवाडी.
(५) श्री. भा. वा. मराठे, मिरज. (६) श्री. गं. गो. कानेटकर, सांगली(कार्यवाह).

अवश्य तर अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार या समितीस देण्यांत येत आहे."

वरील ठरावानुसार ता. २-४-१९३९ रोजीं सांगली येथे प्रो. गं. गो. कानेटकर यांचे घरीं समितीची पहिली बैठक भरली व या बैठकींत समितीचें स्वरूप, घटना व कार्यपद्धति यांविषयी कांही महत्त्वाचे ठराव पास झाले. त्यांपैकीं महत्त्वाचे ठराव पुढे दिले आहेतः—

(१) मिरज येथील साहित्यसंमेलनाच्या ठरावान्वये ही समिति अस्तित्वांत येत आहे. तथापि यापेक्षा संमेलनाशीं समितीचा कांही संबंध नाही. तिचें काम स्वतंत्रपणें चालावें. मात्र दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षास (पुढील संमेलनापर्यंत) स्वीकृत सभासद म्हणून समितीवर घेण्यांत यावें.

(२) वाङ्मयोत्तेजनासाठी द. म. सा. पु. समितीकडून प्रतिवर्षी अेक पारितोषिक देण्यांत यावें. दरसालच्या पारितोषिकाची रक्कम रु. ५०० ही असावी. मात्र परीक्षणार्थ आलेल्या ग्रंथांच्या गुणांवरून पारितोषिक दोन किंवा अधिक ग्रंथांत विभागण्यास समितीस अधिकार राहावा.

(३) समितीच्या कार्याच्या सोयीसाठी साहित्याचे दोन विभाग कल्पिण्यांत यावे; (१) ललित वाङ्मय, व (२) शास्त्रीय वाङ्मय. या दोन विभागांतील ग्रंथांस आळीपाळीने पारितोषिक देण्यांत यावें.

(४) मिरज साहित्यसंमेलनांतील ठरावांत "दक्षिण महाराष्ट्रांतील साहित्यिकांना उत्तेजन देण्यासाठी" असे शब्द आहेत. तथापि या विषयावरील चर्चेत असें दिसून आलें की, अशी संकुचित भौगोलिक मर्यादा घातल्याने, अभिजात वाङ्मयनिर्मितीस योग्य तो अवसर मिळणार नाही. म्हणून ही भौगोलिक मर्यादा अजीबात काढून टाकावी; परीक्षणार्थ ग्रंथ— अर्थात् मराठी— कोठूनहि आला तरी चालेल; मात्र या समितीचें नियामक मंडळ व तिचा निधि हीं होतां होअीतों दक्षिण महाराष्ट्रीय असावीं असें ठरलें.

(५) पहिल्या १९४० च्या बक्षिसाचें अभिवचन अध्यक्ष प्रो. ना. सी. फडके यांनी मिरजेस संमेलनप्रसंगीं दिलें होतें. संपूर्ण पारितोषिक व्यक्तिशः प्रो. फडके यांनीच दिलें असल्याने या पारितोषिकास "प्रो. ना. सी. फडके पारितोषिक" असें नांव द्यावें असें ठरलें.

(६) दुसरें १९४१ सालचें पारितोषिक देण्याची जबाबदारी मिरजेचे डॉ. गोसावी यांनीं पत्करली आहे. व तिसरे व चौथे पारितोषिकाची व्यवस्था करण्याची जबाबदारी जमखिंडीचे रावसाहेब भास्करराव महाबळ (मिरज साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष) व प्रो. गं. गो. कानेटकर (सांगली) यांनी स्वीकारली आहे.

वरील निर्णयांप्रमाणे समितीची घटना व नियम यांचें पत्रक छापून घेण्यांत आलें आहे व तें कोणासहि मागवून घेतां येतें.

१९४० सालच्या "ना. सी. फडके पारितोषिका"ची जाहिरात आतापर्यंत दोन वेळां नियतकालिकांतून देण्यांत आली आहे. हें पारितोषिक या वर्षी उत्कृष्ट कादंबरीस देण्यांत येणार आहे. कादंबरी स्वतंत्र अगर भाषान्तरित कशीहि चालेल. १९३८ जानेवारीपासून फेब्रुआरी १९४० पर्यंत प्रकाशित झालेली कादंबरी समितीकडे पाठवितां येईल. प्रकाशित कादंबरीच्या सहा प्रती परीक्षणार्थ फेब्रुआरी १९४० अखेर समितीकडे आल्या पाहिजेत. बक्षिसासाठी येणाऱ्या कादंबऱ्यांचें परीक्षण समितीचे सभासद करणार नाहीत. त्या कामासाठी योग्य तज्ज्ञांचे परीक्षकमंडळ नेमण्यांत येत आहे. परीक्षकांचीं नांवें मात्र निकालाबरोबर (मे १९४० अखेर) जाहीर करण्यांत येतील.

सारांश, मिरज संमेलनाच्या आदेशानुसार प्रस्तुत समितीनें आपल्या कार्यास सुरवात केली आहे. निदान तीन चार वर्षें हा पारितोषिकांचा क्रम अव्याहत चालेल असा विश्वास वाटत आहे. व दहा एक वर्षांची तरतूद करण्याची समितीस उमेद वाटत आहे. तिच्या सत्यसंकल्पास मूर्त स्वरूप देणें व साहित्यपुरस्काराचें पुण्य संपादन करणें, हें उदार साहित्यप्रेमी लोकांच्या सक्रिय सहानुभूतीवरच अवलंबून आहे.

समितीच्या कार्यासंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास ती खालील पत्त्यावर मिळेल.

गं. गो. कानेटकर
कार्यवाह, दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिति,
अेक्स्टेन्शन्, पो. सांगली.

महाराष्ट्र वाङ्मय मंडळ, अुज्जयिनी

आठवा वार्षिकोत्सव

महाराष्ट्र वाङ्मय मंडळ, अुज्जयिनी, या संस्थेचा आठवा वार्षिकोत्सव ता.६-७ जानेवारी रोजीं सुप्रसिद्ध कादंबरीकार, टीकाकार व वृत्तपंडित श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली माधव कॉलेजच्या भव्य दिवाणखान्यांत साजरा करण्यांत आला. शनिवार ता. ६ रोजीं सायंकाळीं ४·३० वाजतां अुत्सवास सुरवात झाली. अध्यक्षांचें सुमारें तासभर अत्यंत सुश्राव्य व माहितीने भरलेलें असें व्याख्यान झालें. महाराष्ट्राचें विलगीकरण झाल्यामुळे निरनिराळ्या प्रांतांतील महाराष्ट्रीयांची दृष्टि कशी संकुचित झाली आहे व याचा मराठी भाषेवर कसा परिणाम झाला आहे; मध्यप्रांत, मध्यहिंदुस्थान व मुंबअी या प्रांतांत हिंदी व गुजराती या भाषांचें मराठीवर आक्रमण कसें होत आहे, याचें त्यांनी विस्तृत विवेचन केलें.

रविवार ता. ७ रोजीं सकाळीं 'आजच्या मराठी ललितवाङ्मयासंबंधी आक्षेप' या विषयावर चुरशीची चर्चा झाली. चर्चेत प्रो. माचवे, प्रो. जोशी, अिंदूरचे श्री. खंडकर, श्री. डांगे अित्यादिकांनी भाग घेतला होता. आजच्या मराठी लेखकांची दृष्टि आपल्या वर्गापुरती मर्यादित आहे, त्यांना विविधप्रकारचा अनुभव नाही, त्यांची दृष्टि समाजाभिमुख नसून व्यक्तिनिविष्ट आहे, अित्यादि मुद्यांवर आक्षेपकांनी भर दिला.

सायंकाळीं मंडळातर्फे अध्यक्षांना अल्पोपाहार झाल्यानंतर 'आमचे टीकाकार' या विषयावर त्यांचें जोरदार व कळकळीचें भाषण झालें. आम्हांला विविधप्रकारचा अनुभव नाही हा आमचा दोष नसून परिस्थितीचा आहे, मध्यमवर्गीयांनी आपल्या वर्गाचींच चित्रें रंगविलीं तर त्यांत दोषास्पद असें कांहीच नाही, लेखकांना लोकाभिरुचीकडे दुर्लक्ष्य करून चालत नाही, अित्यादि मुद्दे मांडून त्यांनी लेखकांतर्फे कैफियत सादर केली. भाषणानंतर खाजगीरीत्या विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले व वक्त्यांनी अुत्तरें देअून त्यांचें समाधान केलें. अशा रीतीने दोन दिवस चाललेला हा समारंभ संपला.

आर्यसंस्कृति मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणें, येथे लक्ष्मण नारायण चाफेकर यांनीं छापिलें व पुणें येथें महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यालयांत परिषदेकरिता वामन मल्हार जोशी यांनी प्रसिद्ध केलें.